No. S-66-B-S-L 1102 Date 17th March 1954
आठवीच्या विद्यार्थ्यांना पुरवणी वाचनासाठीं सरकारनें मंजूर केलेलें

# कळस

( हृदय थरारून सोडणाऱ्या इतिहास – कथा )

लेखक :— वि. गं. लेले

हिंदु-संघटन, दुर्दैवी मोहरे, मराठ्यांच्या वीरकथा, सुरजमल जाट,
नानाचें चातुर्य, शिवशाहीचा अस्त, मयूरसिंहासन इत्यादि पुस्तकांचे कर्ते

‘ विश्व-मंगल ’ प्रकाशन पुणें २

किंमत सव्वा रुपया

प्रकाशक :
विश्वनाथ विनायक लेले
' विश्व-मंगल ' प्रकाशन
५२७ सदाशिव, पुणें २.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रमुख विक्रेते
वा. रा. पेंडसे,
पेंडसे आणि मंडळी, पुणें.

मुद्रक :
गंगाधर शंकर दाते
कलागृह प्रेस,
६६६ सदाशिव, पुणें २.

विद्वद्वर्य, श्री. के. वि. उर्फ बापुसाहेब गोडबोले

माजी दिवाण, संस्थान फलटण

व

त्यांच्या सुविद्य पत्नी

सौ. जानकीबाई उर्फ वहिनीसाहेब

या उभयतांच्या माझ्यावरील आत्यंतिक लोभाचें

अल्पसें प्रतीक म्हणून

सादर समर्पण

— लेखक

# प्रस्तावना

श्री. वि. गं. लेलें यांनीं लिहिलेलें हें पुस्तक म्हणजे त्यांच्या सात लघु-कथांचा संग्रह आहे. पण या लघुकथा आपण रोज वाचतों त्या प्रकारच्या नाहींत. या लघुकथा ऐतिहासिक लघुकथा आहेत. त्या सत्यार्थानें सत्य-कथा आहेत.

आटपाट नगरांतल्या आजीबाईच्या गोष्टीपासून तों तहेते आजच्या लघु आणि लघुतम कथा तसेंच गुजगोष्टी व त्यांचें तंत्र आज ना[illegible] ज्यांना अभ्यासावें लागणारच आहे अशा संस्कारक्षम वाचकांच्या मनावर [illegible] तेच संस्कार घडवून आणणाऱ्या या ऐतिहासिक लघुकथा लिहून कथा-कथनाच्या प्रान्तांत हें नवें दालन उघडून श्री. लेले यांनीं वाङ्मयाची थोर सेवा केली आहे.

ऐतिहासिक सत्यापासून यत्किंचितहि न चळतां गोष्टीरूपानें इतिहास ऐकविणें हें कार्य या गोष्टींनीं साधणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासांत डोंगराडोंगरांतून ठायींठायीं रत्नें सांपडतात. येथें रत्नांची उणीव नाहीं, पण रत्नपारख्यांची मात्र आहे.

हा 'कळस' नुसत्या दुरून दर्शनाकरतां नाहीं. इतिहासाच्या मंदिरा-कडे पावलें वळविण्याकरितां तो उंच उभा आहे. मंदिरप्रवेश व्हावा, इतिहासाच्या गाभ्यांत वाचकांनीं शिरावें, इतिहासाला ललामभूत झालेल्या स्वातंत्र्यरवीच्या तेजाचे स्रोत बनलेल्या – वैभवराशि सर्वत्र विखुरणाऱ्या – शूर, वीर, मुत्सद्दी, राजकारणधुरंधर म्हणून गाजलेल्या मूर्तींचें पावन दर्शन घडावें, त्यांच्या अन्तःकरणाचा त्यांनीं ठाव घ्यावा—म्हणून हा 'कळस' लिहिला गेला आहे. वाचकांनीं त्या दृष्टीनें तो वाचावा व आत्मसात् करावा अशी ही चीज आहे.

आज कित्येक वर्षे आपण पारतंत्र्यांत खितपत होतों. ५७ च्या स्वातंत्र्य-संग्रामापासून तों तहत आजवर देशांत कित्येक थोरांनीं आमच्यांतील प्रसुप्त अग्नि फुलविण्याकरितां छाती फुटेतोंवर फुंकरा घातल्या,—पण हा अग्नि अजूनहि कां धगधगत नाहीं न कळे !

ज्यांच्या इतिहासांत शूर वीरांनीं रणें गाजविलीं, थोर मनसुबे केले, राजकारणें लढविलीं, छातींचे कोट केले, नाना तऱ्हेच्या हिकमती लढविल्या,—जेथें राजकारणधुरंधर असे निपजले कीं त्यांच्या वीरपत्नींनीं, सुना-लेकींनीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या राखांनींसुद्धां कच न खातां मसनदी हालविल्या आणि राज्यधुरा जोखल्या, ज्यांना बाळपणापासूनच राजकारणाचें, स्वाभिमानाचें, स्वातंत्र्याचें बाळकडू मिळालें,—त्यांच्या इतिहासांत कोणती म्हणून 'चीज' नाहीं ? पण हे वारे हालवूनसुद्धां संचरत कां नाहीं तेंच कळत नाहीं !

आतां स्वातंत्र्याच्या काळांत तरी आपला वैभवशाली इतिहास आम्हांला चेतवील अशा रीतीनें त्याचा अभ्यास झाला नाहीं, त्या दृष्टीनें तिकडे ढुंकलें नाहीं तर कळसच झाला असें म्हणावें लागेल !

शत्रूशींहि वीरोचित औदार्य, हिकमतीपणा, बांक्या प्रसंगीं न चळणारी बुद्धि, हृदयाचें पाणी पाणी करून सोडणारे दुर्धर प्रसंग, रोमहर्षक घटना, या व अशा गोष्टींचीं वर्णनें या संग्रहांत आहेत, व तीं वाचकांचीं मनें रंजवितीलच; पण त्यापेक्षां एका विशिष्ट बाण्यानें, अवसानानें तीं रंगविलीं जातील अशी खात्री वाटते.

वाचकांना अगदीं विश्वासांत घेऊन त्यांच्याशीं हितगुज करण्याच्या हातोटीनें कथा सांगण्याची श्री. लेले यांची लकब फारच नामी आहे.

एकाहि गोष्टींत कथानकाच्या सोयीसाठीं इतिहासाशीं विसंगति येथें आढळणार नाहीं. शृंगाराच्या येथें गांठी नाहींत आणि भेटीहि नाहींत. कथासूत्रें तलम रेशमी नाहींत, पण ओबडधोबड पासोड्यांचे दोरवेहि नाहींत. आणि इतकें असून सर्वच्या सर्व गोष्टी खेचक झाल्या आहेत. कारण त्यांतील ऐतिहासिक धाग्यांचा ताण कोठेंहि ढिला नाहीं. बुद्धीचा

धोटा उजवीकडून डाव्या व डावीकडून उजव्या किनारीकडे गतकालांतून भविष्याकडे जणुं काय फटाफट फटके मारून, सरासर वर्तमानाचा ' मध ' ( मध्य ) ठसठशीतपणें ठासून भरीत आहे. गतकालीनाकडील किनार भरजरीची सुंदर व दिलखेचक तर आहेच, पण भविष्यकालीनाकडील किनारसुद्धां आकर्षक कलाकुसरींत भरण्याचा घाट आहे; अशी ही गंगाजमनी कला थाटदार आहे.

नुसतें इतिहास-वाचन आज ज्या पद्धतीनें चाललें आहे तें ऐतिहासिक दृष्टि देण्यास अपुरें आहे. गतकालीन इतिहास बनविणाऱ्या, कालचक्रास गति देणाऱ्या हातांच्या मागील मनाचा मागोवा घेऊन, त्यांच्याशीं समरस होऊन, तत्कालीन कल्पना, आचार–विचार, रूढी, राहणी, वातावरण, इत्यादि गोष्टींचें परिशीलन केल्याविना स्वातंत्र्य, स्वराज्य यांतील जादूची जाणीव होणार नाहीं. त्यांतील रुचि चाखतां येणार नाहीं. प्रस्तुत गोष्टींतील पात्रांची ओळख त्या अपूर्व जादूचें दर्शन घडवील अशी आशा आहे.

' दुर्दैवी मोहरे ', ' मराठ्यांच्या वीरकथा ', ' शिवशाहीचा अस्त ' हीं यापूर्वींचीं याच लेखकाचीं पुस्तकें व प्रस्तुत पुस्तक हीं सर्व त्या दृष्टीनें अभ्यासलीं जावींत, म्हणजे नुकत्याच प्राप्त झालेल्या आपल्या स्वराज्याचे कोट, बुरूज आणि तट अभेद्य होतील.

जुन्नर

वर्षप्रतिपदा, शक १८७२ — वि. रा. नगरकर

# दोन शब्द

'विश्व-मंगल' या प्रकाशन संस्थेमार्फत माझ्या ऐतिहासिक कथांचा हा दुसरा कथा–संग्रह प्रकाशित होतांना पाहून मनाला निरतिशय आनंद होत आहे.

'मराठ्यांच्या वीरकथा' या माझ्या पहिल्या कथासंग्रहास वाचकांनीं जसा उदार आश्रय दिला तसाच तो याहि संग्रहास लाभेल अशी आशा आहे.

माझ्या विनंतीस मान देऊन माझे परम स्नेही जुन्नर येथील 'न्यू स्कूल'चे मुख्याध्यापक श्री. वि. रा. नगरकर यांनीं मोठ्या रसिकतेनें प्रस्तावना लिहिल्याबद्दल व अभ्यासपूर्ण स्वाध्यायानें या संग्रहाची उपयुक्तता वाढविल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेंच माझे स्नेही महादेवशास्त्री जोशी यांनीं सुप्रसिद्ध आर्टिस्ट रा. दलाल यांचेकडून पुस्तकावरील सुबक चित्र काढवून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

श्रीरामनवमी,
शक १८७२.

–वि. गं. लेले

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | दुर्गादास | १ |
| २ | मानभावाची पोर | १६ |
| ३ | काला पहाड | ३१ |
| ४ | कुलस्वामिनी | ४३ |
| ५ | अमर अमरसिंह | ५३ |
| ६ | पाणी | ६२ |
| ७ | कळस | ७८ |

# दुर्गादास : १

मुलाखतीला दाखल झाल्याचा सांगावा पाठवून तो खडा होता.

त्याच्या डोक्यांत विचारांचें काहूर माजलें होतें. कदली-दलाप्रमाणें शीतल, मऊ, गुळगुळीत व गरगरीत अशा खलभुजंगाचा पाश त्याच्या गळ्याभोंवतीं होता. तांत केव्हां आवळली जाईल याचा नेम नव्हता ! तो खाशांच्या खास मुलाखतीला दाखल झाला होता. गांठ कोणाशीं आहे हें त्यास पुरेपूर माहीत होतें. त्यानें आपणाकडून कडेकोट बंदोबस्त केला होता, व दैवाचा अनुकूल टोला बसतो कीं नाहीं याची वाट पाहात तो खडा होता; तोंच त्याच्या राजकारणाच्या टिकऱ्या उडविणारा निरोप आला, 'निःशस्त्र होऊन, हात बांधून मुलाखतीस दाखल व्हा !'

हा निरोप ऐकतांच त्याचें अंतःकरण झरारलें. त्वेष अनावर झाला. त्यानें समशेरीस हात घातला. आतां दंगल माजणार, तोंच दुसरा सांगावा आला– 'मुलाखतीस सशस्त्र बोलावलें आहे; जरा सबुरीनें घ्या.'


मुलाखतीस दाखल झालेला आणि मुलाखत घेणारा दोघेहि असामान्य होते. त्यांच्या तोलाचा मनुष्य मिळणें केवळ अशक्य. ते दोघेहि आपापल्या संस्कृतींचें प्रतीक ! एक आर्य संस्कृतीचा प्रणेता, तर दुसर

यावनी संस्कृतीचा त्राता. एकाचें नांव दुर्गादास, तर दुसऱ्याचें नांव औरंगजेब.

दुर्गादास सम्राट् नव्हता; त्याचें साम्राज्य नव्हतें; त्याचें सामर्थ्य अवाढव्य नव्हतें. पण या सर्वांना पुरून उरणारें त्याचें चारित्र्य होतें; त्याच्या कर्तृत्वाचा झपाटा दांडगा होता; त्याच्यापुढें 'मी' 'मी' म्हणणाऱ्या औरंगजेबासारख्या सम्राटानें हात टेकले ! दुर्गादास म्हणजे जोधपूरच्या दिवाणाचा — अजवाणीचा मुलगा. जोधपूरवर जशवंतसिंहाची कारकीर्द चालू होती. महाराजा जशवंतसिंहाचें आणि औरंगजेबाचें बरें नव्हतें. कारण जशवंतसिंह हा शहाजहानानंतर गादीवर येणाऱ्या दाराचा पक्षपाती होता. पण राजकारणाच्या जुगारींत दाराचा डाव अंगावर आला आणि औरंगजेब विजयी झाला, त्याबरोबर दाराची तळी उचलणाऱ्या लोकांचें तळपट करण्याचा कचका औरंगजेबानें चालू केला. पण जशवंतसिंहाचें सामर्थ्य अचाट ! त्यामुळें त्याच्यावर एकदम झडप घालण्यास औरंगजेब कचरत होता. तरी पण जशवंतसिंहाचा कांटा काढण्याचें काम सबुरीनें चाललें होतें. त्यानें जशवंतसिंहास बादशाही कामगिरीवर अफगाणिस्तानांत धाडलें होतें. जशवंतसिंह अफगाणिस्तानांत असतांनाच त्याची प्रकृति बिघडली व त्याचा अंत ता. १० डिसेंबर १६७८ ला झाला.

आपल्या पश्चात् जोधपूरची व्यवस्था त्यानें आपला पुतण्या पृथ्विसिंह याच्याकडे सोंपविली होती. त्याच्या देखरेखीखालीं जोधपूरचा राज्यकारभार व्यवस्थितपणें चालला होता; पण तो तसा चालावा अशी औरंगजेबाची इच्छा नव्हती. त्यानें विघ्न निर्माण करण्याचें ठरविलें व पृथ्विसिंहास मोगल दरबारचें आमंत्रण गेलें. दिल्ली-दरबारांत औरंगजेबाची व पृथ्विसिंहाची भेट थाटांत झाली. पोषाख नजर करण्यांत आले. स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला. पारितोषिकादाखल मिळालेला पोषाख परिधान करतांच पृथ्विसिंहाचा निकाल लागला ! कारण तो पोषाख विषारी होता ! !

औरंगजेबाच्या इच्छेप्रमाणें जोधपूरचें सिंहासन बेवारशी झालें त्याबरोबर तें मोगली साम्राज्यांत सामील करून टाकण्याचें ठरलें, आणि मोगली सैन्याची चाल जोधपूरवर चालू झाली. अवघ्या दोनतीन महिन्यांत जोध-



दुर्गादास भडकला ;त्यानें समशेरीला हात घातला !

पूरचा ताबा झाला. तेथील मंदिरें जमीनदोस्त झालीं. जोधपूरची राजलक्ष्मी मोगलांनीं बटकीप्रमाणें खेंचून आणली, आणि जशवंतसिंहाच्या सिंहासनाचा लिलांव छत्तीस लाखांला झाला!

पण याहि प्राणान्तिक संकटांतून जोधपूरचें राज्य वांचणार होतें. त्याची सिद्धता तिकडे चालू होती. अफगाणिस्तानांत जशवंतसिंहाबरोबर दुर्गादास होता. आपल्या धन्याची—जशवंतसिंहाची—ती दुर्दशा पाहून त्याचें अंतः-करण शतशः विदीर्ण झालें! पण त्याचें मन वज्राचें होतें. चाल करून येणाऱ्या प्रत्येक संकटाच्या ठिकऱ्या करून आपण यांतून पार होऊं अशी ग्वाही तें त्याला देत होतें!

अफगाणिस्तानांतून आतां दुर्गादासाचा परतीचा प्रवास चालू झाला. त्यानें जशवंतसिंहाच्या कुटुंबास व कुटुंबियांस नीट संभाळून लाहोरास आणिलें. त्या ठिकाणीं जशवंतसिंहाच्या दोन राण्या प्रसूत झाल्या; दोघीं-सहि पुत्र झाले, त्यांपैकीं एक निवर्तला, आणि दुसरा जिवंत राहिला त्याचें नांव अजितसिंह. त्याचें भाग्य असें थोर, कीं तो जिवंत राहिला इतकेंच नव्हे तर जोधपूरचा राजराजेश्वर म्हणून इतिहासांत गाजला! जशवंत-सिंहाला पुत्रप्राप्ति झाल्याची वार्ता औरंगजेबाला कळतांच त्याचें पित्त खवळलें, आणि आपण रचलेला डाव फसतो कीं काय असें त्यास वाटलें. त्याबरोबर त्यानें जशवंतसिंहाचा कबिला पकडून दिल्लीस आणविला, व आतां बादशहाच्या ताब्यांत तो जाणार—तोंच दुर्गादासाच्या कल्पकतेनें त्यावर मात केली! जशवंतसिंहाच्या दोन राण्या व पुत्र अजितसिंह यांनीं औरंगजेबाच्या हातावर तुरी दिल्या व ते सुरक्षित स्थळीं पसार झाले! त्या गुप्त स्थानीं अजितसिंह योग्य प्रकारें वाढीस लागला. आतां दुर्गा-दासानें रजपुतांचें सामर्थ्य जमा करून मोगलांशीं सामना देण्याचें ठरविलें, आणि तो त्या उद्योगास लागला.

औरंगजेबानें जशवंतसिंहाचा म्हणून त्याच वयाचा दुसरा एक गव-ळ्याचा पोर पैदा केला. त्यास त्यानें जशवंतसिंहाचा अस्सल वारस म्हणून जाहीर केलें! त्याचें नांव महंमदराज म्हणून ठेवण्यांत आलें, आणि मोग-लांच्या खास घराण्यांत, खास जनानखान्याच्या देखरेखीखालीं त्याचें पालन-

पोषण सुरू झालें. ह्या व्यवस्थेबरोबरच रजपूत सामर्थ्याचा धुव्वा उडविण्यासाठीं मोगल लष्कराची दणकेबाज चाल मेवाडवर पुन्हां चालू झाली. पडघमाच्या आवाजांत आणि झांजांच्या झणझणाटांत मोगल निघाला. या चढाईत एक प्रकारचा कडवेपणा होता. या लढाऊ राजकारणाचीं सूत्रें सुलभतेनें चाळवितां यावींत म्हणून दिल्लीपति औरंगजेबानें आपला मुक्काम अजमीरला टाकला, आणि या स्वारीचें प्रत्यक्ष सरसेनापतित्व शाहजादा अकबर याच्याकडे दिलें.

शाहजादा अकबर हा औरंगजेबाचा विशेष लाडका होता. तो एक महिन्याचा असतांनाच त्याची आई दिलारसबानू बेगम मरण पावली. त्यामुळें आईवेगळें हें पोर पित्याचें प्यार बनलें. औरंगजेबास त्याच्याबद्दल विशेष जिव्हाळा वाटूं लागला. अनुभवी सेनापतीच्या देखरेखीखालीं आपल्या पुत्रास स्वारीवर पाठवून त्यास लष्करी व मुलकी कामांत तरबेज करण्याचा मोगली उपक्रम औरंगजेब बादशहानें चालू ठेवला होता. त्याचा फायदा शाहजादा अकबरानें पुरेपूर घेतला. पित्याच्या मर्जीप्रमाणें वागून, हातीं घेतलेल्या हरएक कामांत फत्ते करून त्यानें लोकांत चांगलाच लौकिक संपादन केला, व तो चोखंदळ औरंगजेबाच्या विश्वासास पात्र झाला. या सर्व गोष्टींचा क्रमप्राप्त परिपोष म्हणून त्यास रजपुतांवरील या चढाईचें सरसेनापतित्व मिळालें.

रजपूत आणि मोगल एकामेकांस भिडले. प्रारंभींच्या दोन वर्षांत जोराची खणाखणी झाली. रजपुतांचा बराच खराबा झाला. कारण रजपूत व्हावा तसा संघटित झाला नव्हता. पण दोन वर्षांत अवघा रजपूत असा संजीवित व संघटित झाला, कीं राजपुतान्यांतील घरटान् घरटा अजिंक्य किल्ल्यांत रूपान्तर पावला. मिसरूड न फुटलेल्या चिमुर्‍या पोरापासून तों थेट दुर्गादासापर्यंत प्रत्येक रजपूत मोगलाच्या मनगटाला मनगट भिडवण्यास सिद्ध झाला. आणि आतां उघड मैदानांत मोगलांशीं सामना देण्याचें सोडून रजपुतांनीं गनिमी काव्याचा आश्रय केला, व मोगलांची बेजरब लांडगेतोड चालविली; चौफेर नजर राखून रसद गारद करण्याचा तडाका लावला. त्याबरोबर मोगल लष्करावर उपासमारीचा प्रसंग गुदरला.

आतां त्यास माळव्यांतून अन्नपाण्याचा पुरवठा येत होता, त्याची मोठ्या शिताफीनें बातमी काढून रजपुतांनीं त्याच्यावर झडप घातली, आणि धान्याच्या गोण्या घेऊन येणारे दहा हजार बैल ठोकून नेले;– मोंगल लष्कराच्या तोंडचा घांस पळविला ! या प्रकारानें या रेंगाळलेल्या स्वारीचा सरसेनापति शाहजादा अकबर निराश झाला. त्यानें औरंगजेबास साफच कळविलें कीं 'मला या चढाईत यशाची आशा दिसत नाहीं.' अकबराचें हें रडवें पत्र येतांच औरंगजेब खाड्कन् जागा झाला व त्यानें भरपेट कुमक पाठवून रजपुतांशीं गांठ घालण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

रजपूत नरम पडत नाहीं असें पाहतांच संकटाचे प्रयत्न चालू झाले. आणि यांतूनच एक मोठी अजब घटना निर्माण झाली.

मनाच्या अगदीं नाजुक परिस्थितींतून अकबराचे दिवस चालले होते.

रजपूत नेत्यांची आवकजावक अकबराकडे वाढली; त्यांच्या गांठीभेटी होऊं लागल्या रजपूत वीरांचे उमदे स्वभाव अकबराच्या मनांत भरूं लागले. औरंगजेबाच्या कपटनीतीची चर्चा उघडउघड होऊं लागली, त्याबरोबर न्याय कोणत्या बाजूला आहे याचा खुलासा झाला. रजपुतांनीं अकबराची खात्री करून दिली, कीं 'बादशहाला किंवा बादशाहीला इजा पोंचविण्याची आमची इच्छा नाहीं; पूर्वापार प्रघाताप्रमाणें बादशहानें आम्हांस प्रेमानें वागवावें, आमच्या राज्याचा अपहार करूं नये, म्हणजे बादशहाची सेवा निष्ठेनें करण्यास आमची समशेर नेहमींच सिद्ध आहे; त्यांत कसूर होणार नाहीं.' रजपुतांचें हें म्हणणें अकबरालाहि पटलें.

वस्तुस्थिति अशी असतां औरंगजेबानें भलतेंच आक्रमक धोरण अंगिकारलें. हिंदु धर्माचा पाडाव करण्यासाठीं रजपूत राजांचा व एकंदर हिंदूंचा उच्छेद चालविला. अलमगिरानें चालविलेली ही धर्ममार्तंडगिरी अकबरास एकदम अयोग्य वाटली. त्यानें बापास पत्रें पाठवून परोपरीनें समजूत घालण्याचा प्रयत्न चालविला. पण अलमगीर औरंगजेब असल्या पोरासोराच्या सांगण्यानें ठिकाणावर येणारा गृहस्थ नव्हता ! तो आपल्याला 'गिन्यान' शिकविणाऱ्या पोरावर उसळला. त्यानें अकबराची चांगलीच खरडपट्टी काढली व मनाला मानेल तशी त्याची निर्भत्सना केली. ते

वाग्बाण अकबरास झोंबले व त्याचें मन आमूलाग्र पालटलें. बापाविरुद्ध बंड पुकारण्याचे विचार त्याच्या डोक्यांत थैमान घालूं लागले !

अकबर त्या वेळीं तेवीस वर्षांचा तरणा जवान होता. त्याचें रक्त ताजें होतें. शरीरांतील धमनीन् धमनी नवचैतन्यानें रसरसत होती. त्याच्या मनांत अन्यायी बापाविरुद्ध बंड पुकारण्याचा विचार आला व त्या विचारानें कायमचें घर केलें. ही गोष्ट रजपुतांच्या लक्षांत येतांच त्यांनीं या गोष्टीचा पाठपुरावा चालविला. त्यांतल्यात्यांत दुर्गादासानें पुढाकार घेऊन या गोष्टीस मूर्त स्वरूप आणलें. त्यानें शहाजाद्यास सांगून टाकलें कीं, औरंगजेबाविरुद्ध सामना चालू केल्यास मेवाडच्या रजपुतांचें सर्व सामर्थ्य त्याच्या पाठीशीं खडें राहील. भगवान् एकलिंगजीच्या नांवानें आणभाक झाली. रजपुतांनीं अकबरास दिलदिलासा दिला. त्याबरोबर अकबराचा कृतनिश्चय झाला. त्यानें तारीख १–१–१६८१ ला औरंगजेबास पदच्युत केल्याचा जाहीरनामा काढला; स्वतःस मोगल साम्राज्याचा सम्राट् म्हणून उद्घोषित केलें, आणि बापाला कैद करण्यासाठीं म्हणून अजमीरवर प्रचंड चाल केली !

अकबराच्या या उठावणीची बातमी औरंगजेबाला कळतांच त्याचें धाबें दणाणलें ! त्यानें शाहजादा अकबराच्या नांवानें एक गुप्त खलिता तयार केला व तो अकबरासाठीं प्राणपणानें झुंज घेणाऱ्या रजपुतांच्या हातीं पडेल अशी व्यवस्था केली. तसें होतांच रणांगणावर विजयी होणारा अकबर पराजित झाला ! या खलित्यांतील मजकूर खालीलप्रमाणें होता—

" शाबास, बहादरा – शाबास ! तूं मला पुत्र शोभतोस. ' बापापेक्षां सवाई बेटा ' या म्हणीची सत्यता तुझ्याकडे पाहून अनुभवास येते. या तुझ्या कर्तृत्वाबद्दल तुझें कौतुक करावें तेवढें थोडें आहे. तूं आपल्या वागणुकीनें आणि मिठ्ठास वाणीनें अवघा रजपूत आपलासा केलास, आणि त्यांना माझ्या तावडींत आणून सोडलेंस ! तूं तुझें काम चोख केलेंस; आतां सूर्योदयाबरोबर मी त्यांचे फुटाणे भाजून माझी करामत दाखवीन. अच्छा बेटा ! तुझी – माझी मुलाखत आतां रणांगणावर—रजपुतांचें निर्दालन केल्यानंतर ! ! "

या खलित्यानें रजपुतांच्या लष्करांत मोठाच गोंधळ माजला. जो तो आंतल्या आवाजांनीं एकमेकांशीं कुजबुजूं लागला. 'गनीम काय करील याचा नेम नाहीं! हा तर कुटिल कारस्थानी औरंगजेबाचा पोर! काय सांगावें,– कोणाचें अंतरंग कसें असेल तें!' अशा बडबडी सुरू झाल्या. जो तो चकित झाला. शहानिशा करावी तर ती. कोणी आणि केव्हां करावी? कारण तसें करण्यास पुरेसा वेळ नव्हता. त्या रात्रीची धांव सूर्योदयाकडे धडाकून चालू होती. व उजाडतांच रणकुंड धडाडणार, आणि मग आपल्या नशिबीं काय वाढून ठेविलें असेल याची कल्पना धास्तावलेल्या रजपुतांना येईना. तेव्हां त्यांनीं पोबारऱ्याचा मार्ग स्वीकारला; आणि रजपूत लष्कर गटागटानें नाहींसें झालें. नंतर दुसऱ्या दिवशीं ता. १६-१-८१ ला सकाळीं लढाईला तोंड लागलें त्या वेळीं अकबर कमजोर ठरला. तथापि दुर्गादासानें त्यास अंतर दिलें नाहीं. त्यांनीं औरंगजेबाच्या तावडींतून निसटून प्रसंग निभावून नेला!

औरंगजेबाच्या तावडींतून दुर्गादास व अकबर निसटले हेंसुद्धां अजब झालें! देवानें खैर केली हेंच खरें. पण आतां त्या उभयतांच्यापुढें मोठाच प्रश्न उभा राहिला. त्यांतून कसें पार पडावें हेंच त्यांना कळेना. तथापि दोघेहि मोठे कल्पक व कर्तृत्ववान् होते. त्यांनीं दक्षिणेंत जाऊन संभाजीच्या मदतीनें औरंगजेबाशीं यशस्वी सामना देण्याचें ठरविलें. ही अभिनव कल्पना फारशी अशक्य नव्हती. मराठ्यांचा दबदबा तेवढा होता; त्यांनीं एक खलिता संभाजीकडे रवाना केला व ते पाठोपाठ दख्खनची वाट तुडवूं लागले.

बादशाही फौजा पाठीवर असल्याकारणानें पत्रोत्तराची वाट न पाहतां शाहजादा तसाच खानदेश–बागलाणांतून महाराष्ट्रांत आला. मराठी राज्यांत येतांच संभाजीच्या अधिकाऱ्यांनीं त्यांचें योग्य प्रकारें स्वागत केलें. रायगडाच्या उत्तरेस पंचवीस मैलांवर नागोठाण्याजवळ अंबा नदीच्या कांठीं पाली येथें शाहजाद्याची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली.

दुर्गादास व शाहजादा अकबर मोठ्या आशेनें महाराष्ट्रांत धांवले; पण त्यांची निराशा झाली! कारण भारतवर्षाच्या पूर्वपुण्याईनें चालून

आलेल्या या अपूर्व संधीचा फायदा घेण्याची कुवत छत्रपति संभाजींत नव्हती. शाहजादा ज्या तडफेनें महाराष्ट्रांत आला त्या तडफेनें पुढील कामें झालीं नाहींत. संभाजीनें दिरंगाई चालविली. पालीहून रायगडावर परस्परांमध्यें निरोपानिरोपी सुरू झाली. पंधरा दिवसांनीं नेताजी पालकर व हिरोजी फरजंद यांस शाहजाद्याच्या मुलाखतीस धाडलें; आणि त्यांजबरोबर मध्यें हिरा बसविलेला मोत्यांचा कंठा, एक जडावाचा तुरा व एक हजार होन अशी नजर अकबरासाठीं पाठविण्यांत आली. खूषखबर विचारून हिरोजी परत गेला. शाहजाद्याची विचारपूस करण्यासाठीं व बरदास्त ठेवण्यासाठीं मोगली रीतिरिवाजांची माहिती असलेल्या नेताजीस अकबराजवळ ठेवण्यांत आलें.

पण पुढें राजकारणें झटपट खेळलीं गेलीं नाहींत. दिरंगाईचा मामला चालू झाला. शाहजादा अकबरानें त्या खालावलेल्या परिस्थितींतसुद्धां आपल्या राहणीचा थाट बादशाही ठेविला. त्यामुळें संभाजीचें मन प्रथमपासूनच साशंक होतें. न जाणो, औरंगजेबाचा हा पुत्र आपणास गोत्यांत आणण्यासाठीं कशावरून आला नसेल, असें त्यास वाटलें. पुढें संशयनिवृत्ति होऊन संभाजीनें शाहजाद्यास रोज खर्चासाठीं साठ होन (३०० रुपये) तनखा चालू केला. पांच महिने झाल्यावर कार्तिक शुद्ध ११ रविवार ता. १३-११-१६८१ रोजीं पालीस जाऊन संभाजीनें अकबराची व दुर्गादासाची मुलाखत घेतली. भेट थाटाची झाली.

दिल्लीची राजलक्ष्मी शेंकडों कोसांचें रान तुडवून दख्खनमध्यें आश्रयासाठीं आली, आणि मोठ्या उमेदीनें ती मराठ्यांच्या राजराजेश्वराकडे पाहत होती; पण कमनशिबी मराठ्यांचा राजराजेश्वर घरगुती खेकस्यांत गुंतला होता! संभाजीला बाजूला सारून त्याच्या जागीं राजारामास गादीवर आणण्याचा खटाटोप चालू होता, तो उघडकीस आला. त्याबरोबर भडक माथ्याचा संभाजी भडकला! त्यानें छत्रपति शिवाजीमहाराजांनीं समुद्रमंथनाच्या सायासांनीं जमा केलेल्या नर-रत्नांची खांडोळी केली. अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फरजंदासारखीं कर्तृत्ववान माणसें आपल्याच हातांनीं मातींत गाडलीं, आणि रायगडावरील टिचभर

सिंहासनावर आपलें आसन स्थिर केलें ! त्यापेक्षां उदार अंतःकरणानें या सर्व मंडळींना अंकित करून त्या नरपुंगवांचा तांडाच्या तांडा 'चलो दिल्ली' या एकाच हुकमानें दिल्लीकडे वळविला असता तर मराठ्यांचें मंगल झालें असतें ! हिंदुस्थानचा इतिहास बदलला असता, आणि शेवटच्या आत्मबलिदानानें उजळून दिसणारें छत्रपति संभाजी महाराजांचें चारित्र्य आणखीच भव्यतम झालें असतें ! ! रायगडाच्यास्त्र काय—पण दिल्लीच्या तक्तावर कोणी बसावें याचा अंतिम निर्णय रायगडच्या राजराजेश्वरानें दिला असता ! पुढें साठ वर्षांनीं स. १७३९ त दिल्लीचें मयूरसिंहासन नादिरशहानें खणत्या लावून इराणांत नेलें तें कदाचित मराठ्यांनीं रायगडीं आणिलें असतें,—व त्याच्यावर क्षत्रियकुलावंतस श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचे प्रपौत्र स्थानापन्न झाले असते !! श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या वेळीं हा प्रसंग येता तर फार नामी झालें असतें. पण तें झालें नाहीं हेंच दुर्दैव ! कारण तो मोकाच तसा अजब होता. औरंगजेबाच्या विश्वासघातकी व क्रूर वागणुकीनें त्याचे जातभाई त्याच्यावर उसळले होते. धर्मछल सुरू केल्यानें रजपुतासकट अवघा हिंदु खडबडून जागा झाला होता. अशा ऐन वेळीं सिंहप्रताप छत्रपति संभाजीमहाराज, आर्यसंस्कृति-आदर्श दुर्गादास, आणि पाक दिलाचा शाहजादा अकबर,—या तीन महान् शक्ति ब्रह्मा-विष्णु-महेशाप्रमाणें एकत्रित झाल्या असत्या तर भारताचें गोमटें झालें असतें. पण दुर्दैवानें ही अघटित घटना घडून आली नाहीं !

लक्षावधि समशेरींच्या सामर्थ्यानें औरंगजेबास मुरगळून टाकण्यास सिद्ध झालेला रजपूत जागच्या जागीं मनगटें चावीत बसला. औरंगजेबाच्या कपटानें त्याची फसगत झाली. वचनभंगाचें लांछन रजपुतांच्या कपाळीं लागलें. त्यामुळें अवघा रजपूत हळूहळूं लागला, व तें धुवून काढण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला. "आतां अकबरानें व दुर्गादासानें काय वाटेल तें करून मेवाडांत यावें, म्हणजे आपण त्यांच्या नेतृत्वाखालीं औरंगजेबाशीं प्राणपणानें झुंज घेण्यास सिद्ध आहोंत. मारूं किंवा मरूं!" या अर्थाचे निरोपामागून निरोप मेवाडांतून महाराष्ट्रांत अकबरास व दुर्गादासास जाऊं लागले. पण रजपुतांच्या या उसळत्या अवसानाचा आतां कांहींएक उपयोग नव्हता.

कारण अकबर आणि दुर्गादास दक्षिणेंत दूर अंतरावर फेंकले गेले होते. त्या दोघांचें राजकारण विजयी झाल्यास आपणांवर कोणता प्रसंग ओढवेल याची जाणीव औरंगजेबास सोळा आणे होती. म्हणून त्यांचा पाडाव करण्यासाठीं तो आपल्या सर्व पार्श्वगणांसह दख्खनमध्यें दाखल झाला होता. त्यानें मार्‍यांचीं सर्व ठाणीं रोखून धरलीं होतीं. तेव्हां चौक्या मारून पुन्हा मेवाडांत दाखल होणें तितकेंसें सोपें नव्हतें. आतां अकबर व दुर्गादास या दोघांपुढें एकच मार्ग शिल्लक होता. तो म्हणजे छत्रपति संभाजी महाराजांच्या मदतीनें औरंगजेबाशीं दक्षिणेंत कोठें तरी गांठ घालून त्याचा टोलेजंग पराभव करावयाचा, व मग रजपुतांच्या सामर्थ्यानें या राजकारणाचा शेवट लावावयाचा. ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं अकबर आणि दुर्गादास यांनीं सहासात वर्षे जोराची खटपट केली. पण संभाजीच्या अंगीं तितकें कर्तृत्व व धडाडी नसल्याकारणानें उभयतांची दारुण निराशा झाली. शेवटीं नाइलाज होऊन व दैवावर चिडून अकबर सन १६८७ च्या फेब्रुवारींत एका इंग्रज गलबताच्या साहाय्यानें इराणांत पसार झाला, व खुरासानांत सन १७०४ मध्यें मरण पावला.

अकबराची पाठवणी केल्यानंतर दुर्गादासानें आपला मोर्चा मेवाडकडे वळविला. त्या ठिकाणीं तो जातांच कुडींत प्राण यावा तसें झालें. रजपुतांचा राजपुताना संजीवित झाला. त्याच्या समशेरी एकलिंगजीचा जयजयकार करीत म्यानाबाहेर निघून रजपूत व मोगल यांच्यामधील अभूतपूर्व संग्रामास प्रारंभ झाला. सैन्यें एकमेकांस भिडलीं. भयंकर कापाकापी झाली. असे प्रकार तर चालू होतेच, पण रजपुतांनीं आतां गनिमी काव्याचा आश्रय केला, आणि मोगली सैन्याभोंवतीं घिरट्या घालून वेळ वखत न पाहतां छापे घालून, रसद लुटून फस्त करण्याचा सपाटा लावला. त्याबरोबर मोगल घाईला आला, व 'भीक नको पण कुत्रा आवर' असें त्यास झालें. शुजायतखान नांवाचा एक हुशार गृहस्थ या वेळीं गुजरातचा सरसुभा होता. त्याच्याकडे मारवाडची अखत्यारी होती. तो या रजपुतांच्या कडव्या प्रतिकारास कंटाळला. त्यानें समेटाचें धोरण स्वीकारून मेवाडमध्यें मोगलाचा आब राखला इतकेंच.

जशवंतसिंहाचा कांटा काढून जोधपूरचें राज्य घशांत टाकण्याचा औरंगजेबाचा डाव फसला. तो त्याच्या अंगावर उलटला! त्याच्यापायीं त्याला त्याच्या लाडक्या लेकास—अकबरास—कायमचें मुकावें लागलें! रजपुतांच्याबरोबर कडव्या झुंजी घेऊनसुद्धां जोधपूरच्या राजवंशाचा नायनाट झाला नाहीं, तर तो कंसाच्या हातून कृष्ण सुटावा व नंदाच्या घरीं वाढीस लागावा तसें झालें! तो कुलदीपक स्वस्थानीं सुखानें नांदत होता. जोधपूरचें राज्य मोगलांच्या हातून हिसकावून घेण्याचें काम चालू होतें. राज्य हातीं आल्याशिवाय क्षणाचीहि उसंत न घेण्याची घोर प्रतिज्ञा दुर्गादासाची होती; आणि त्या दिशेनें त्याचे भगीरथ प्रयत्न चालू होते. या सर्व भानगडींत आणखी एक गोष्ट अशी चमत्कारिक झाली होती, कीं त्यामुळें औरंगजेब हैराण झाला होता; त्याला एकसारखी चिंता वाटत होती,—ओढणी लागली होती,—तो तंतु मोठा नाजुक होता; आणि तो दुर्गादासाच्या हातीं होता!

सन १६८१ त दुर्गादास आणि शाहजादा अकबर दक्षिणेंत आले त्या वेळीं अकबराचीं मुलें त्यानें राठोड सरदारांच्या ताब्यांत दिलीं होतीं. पुत्र बुलंद अख्तार आणि कन्यका राफियतून्निसा या दोन्ही बालकांची निगा दुर्गादासानें फारच छान ठेविली होती. दुर्गादासाच्या अत्यंत विश्वासांतील गिरिधर जोशी नांवाचा एक नोकर होता. त्याकडे ही व्यवस्था सोंपविण्यांत आली होती. गिरिधर जोश्यानें हें काम कल्पनेबाहेर बजाविलें. त्या बालकांचा सांभाळ काळजीकाळ्यानें व प्रेमानें केला; इतकेंच नव्हे तर त्यांत कोणत्याच प्रकारचें न्यून उरलें नाहीं. त्यांना धार्मिक व व्यावहारिक शिक्षण देण्याची मुद्दाम व्यवस्था करण्यांत आली होती. त्यामुळें तीं हुशार व चणचणीत झालीं होतीं. दुर्गादासाच्या या अभूतपूर्व वागणुकीची औरंगजेबास कल्पना नव्हती. त्यास वाटत होतें कीं, काफरांच्या तावडींत आपलीं नातवंडें सापडलीं आहेत, तेव्हां त्यांची काय दशा झाली असेल कोण जाणे! सम्राटाचा राजदंड धारण करणारा मी अलमगीर औरंगजेब—पण मला माझ्या नातवंडांची शत्रूच्या तावडींतून सुटका करतां येऊं नये, यापेक्षां नालायकी कोणती? या विचारानें औरंगजेब हैराण होई. दक्षिणेंत

असतांना त्याच्या मनास या नांगीचे फणकारे एकसारखे बसत. तेव्हां ‘ काय वाटेल तें करून आमचीं नातवंडें दख्खनमध्यें धाडा !’ असा लकडा त्यानें शुजायतखानाच्यामागें लाविला होता. शुजायतखानानें या गोष्टीचा फायदा घेतला व दुर्गादासाच्याकडे वळण असणाऱ्या ईश्वरदास नागर नांवाच्या ब्राह्मणांमार्फत समेट घडवून आणला.

जोधपूरचें राज्य पूर्ववत् चालविण्याचें लेखी आश्वासन शुजायतखाना-मार्फत मिळाल्यावर दुर्गादास अकबराच्या मुलीसह शुजायतखानास भेटला. सर्व बोलणीं पुरीं झाल्यानतर खानानें ईश्वरदासाबरोबर औरंगजेबाच्या नातीस दक्षिणेंत पाठविलें. बादशहांचा मुक्काम सोलापुराजवळ ब्रह्मपुरीस असतां सन १६९६त त्या उभयतांची भेट मोठी हृदयस्पर्शी झाली अथांग समुद्राच्या पोटांतून माणिक बाहेर पडावें तसें झालें. ती उमदी व देखणी नात पाहून औरंगजेब चकित झाला. इकडचे तिकडचे कुशल प्रश्न होतांच धर्मात्मा औरंगजेबानें प्रश्न केला, “ बाळ, आजपर्यंतचें तुमचें आयुष्य काफिरकडे गेल्यानें तुम्हांला बादशाही रीतिरिवाजांची व इस्लामी धर्माची कांहींच माहिती नसेल. तेव्हां तें शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. ”

बादशाहाचे हे बोल ऐकतांच त्याची नात उसळून उद्गारली, “ दुर्गा-दासांनीं आमची निगा घरच्यापेक्षांहि जास्त ठेवली. अजमीरची एक विद्वान शिक्षिका ठेवून त्यांनीं आम्हांस सर्व प्रकारचें शिक्षण दिलें. इतकेंच काय, पण आमच्या धर्माशिक्षणाचीसुद्धां आबाळ होऊं दिली नाहीं. मला कुराण तोंडपाठ येतें. दुर्गादासाची योग्यता फार मोठी आहे; तो धर्मात्मा आहे ! ”

नातीच्या तोंडचे हे उद्गार ऐकतांच औरंगजेबास आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला ! तो मनांतल्या मनांत खजील झाला. त्याच्या नीतिशास्त्रांत हा प्रकार नव्हता. त्याला कळेना, कीं दुर्गादासाचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावेत ? त्याचें उतराई कसें व्हावें ? त्याच्या मनांत आतां विचारांचें काहूर माजलें. मी माझ्या नियतीप्रमाणें वागलों; दुर्गादासहि आपल्या नियतीप्रमाणें वागला;— यांत श्रेष्ठ नियत कोणाची ? दुर्गादासाची कां माझी ? या प्रश्नाचें मनोमन उत्तर येण्याच्या आंतच नातीस उद्देशून

पुढील उद्गार त्याच्या मुखावाटे निघाले, " दुर्गादासाला याबद्दल कोणतें पारितोषिक द्यावें ? "

" तें ईश्वरदासाला विचारा. त्यांना सर्व माहिती आहे. "

नातीच्या या म्हणण्याबरोबर ईश्वरदासास बोलावून सर्व हकीगत विचारण्यांत आली. ती ऐकून बादशहा संतुष्ट झाला. त्यानें दुर्गादासाला मेडत्याची जहागीर व कांहीं नक्त नेमणूक करून दिली. ईश्वरदासासहि बक्षीस देऊन संतुष्ट करण्यांत आलें.

नात आली, पण नातू अजून दुर्गादासाच्या ताब्यांत होता. त्याला भेटण्याची औरंगजेबाची इच्छा आतां तीव्रतम झाली. त्यानें ईश्वरदासास लगोलग परत पाठवून दुर्गादास व नातू बुलंद अखतार यांस तांतडीनें घेऊन येण्याची आज्ञा केली.

प्रत्यक्ष बादशहाचा नातू हातीं असल्यावर आपण वाटेल ती उलथापालथ करूं, औरंगजेबास रंजीस आणूं, ही गोष्ट न जाणण्याइतका दुर्गादास खुळा नव्हता. त्यानें हें राजकारण ताठपणें तडीस नेण्याचें ठरविलें व बादशहास कळवून टाकलें, " प्रथम जोधपूरचें राज्य अजितसिंहाच्या स्वाधीन करा, म्हणजे मग मी बुलंद अखतार यास बादशहाकडे पाठवितों." हें राजकारण तितक्या तांतडीनें न ठरकतां त्याचा घोळ दोन वर्षें चालला होता. प्यादीं या दरबारांतून त्या दरबारांत फिरत होतीं. शेवटीं तडजोड होऊन दुर्गादास बादशहाच्या नातवासह मुलाखतीस ब्रह्मपुरीस दाखल झाला. त्याबरोबर बादशहा आपल्या वळणावर गेला ! दुर्गादास मुलाखतीसाठीं दरबारीं येतांच त्यास रोखून धरण्यांत आलें, व " निःशस्त्र होऊन, हात बांधून मुलाखतीस दाखल व्हा" म्हणून हुकूम झाला. त्याबरोबर दुर्गादास भडकला ! त्यानें समशेरीस हात घालतांच औरंगजेब ठिकाणावर आला ! त्यानें दुर्गादासाची भेट चांगल्या प्रकारें घेतली. त्यास तीन हजारांची मनसब, एक हिरेजडित कट्यार, व लाख रुपये बक्षीस दिले, आणि योग्य प्रकारें संभावना करून त्याची पाठवणी केली !

नात आणि नातू हातीं येतांच औरंगजेबचें काम झालें. त्यानें पवित्रा बदलला. त्याच्या हातांत सुलतानी सत्ता होती ! करारमदार पाळणें किंवा

त्यांना झटकन् केराच्या टोपलींत टाकणें ही त्याच्या मर्जीची गोष्ट होती. जोधपूरचें राज्य जशवंतसिंहाच्या वंशजाकडे सुखासमाधानानें नांदावें ही गोष्ट औरंगजेबास स्वप्नांतहि मान्य नव्हती. त्यानें कटकटी चालविल्या. आतां मात्र दुर्गादास मनस्वी चिडला ! त्यानें मोगलांशीं पुन्हां पहिल्याच तडफेनें जोराचा सामना चालू केला, आणि मोगलांस पराभूत करून जोधपूरचें राज्य काबीज केलें. जोधपूरचा किल्ला मोगलांच्या ताब्यांत आज अनेक वर्षे होता; तो ताब्यांत येतांच गंगोदकानें धुवून त्यास पुनीत करण्यांत आलें. नंतर एका शुभ मुहूर्तावर दुर्गादासानें जशवंतसिंहाच्या पुत्रास— अजितसिंहास— मोठ्या समारंभानें राज्याभिषेक केला !

दुर्गादासाच्या चारित्र्याची सफलता झाली. जोधपूरचा फत्तरन् फत्तर दुर्गादासाचें गुणगान करूं लागला !

‘मातेनें दुर्गादासासारख्या सुपुत्रास जन्म द्यावा’ (‘ए माता पूत ऐसा जिन जैसा दुर्गादास!’) अशी म्हण रजपुतांत रूढ झाली !

---

## मानभावाची पोर : २

व्यक्तीला स्वतःची कर्तबगारी दाखविण्यास पूर्ण वाव असला म्हणजे गारगोटीचे हिरे होण्यास फारसा वेळ लागत नाहीं. नाहीं तर हिऱ्याच्या गारगोट्या झालेल्या आपण पाहतों ! आकाशांत आपल्या तेजानें चमकणाऱ्या तारकांचें तेज, त्या ठिकाणीं त्यांस आपला पराक्रम व कर्तब-गारी दाखविण्यास पूर्ण वाव असतो म्हणूनच लाभलेलें असतें. पण त्याच, त्या ठिकाणावरून निखळल्या कीं त्यांच्या गारगोट्या होऊन धरणीवर पड-तात ! मराठ्यांच्या राज्यांत अशी कर्तबगारी दाखविण्यास पूर्ण वाव व स्वातंत्र्य लाभलें म्हणूनच महाराष्ट्राच्या इतिहासांत अनेक नररत्नें निर्माण झालीं ! आज अशाच एका तेजस्वी वीरांगनेचा परिचय करून द्यावयाचा आहे. ती म्हणजे तुळसाबाई होळकर. ही यशवंतराव होळकरांची रक्षा. पण या बाईची कर्तबगारी अशी अपूर्व कीं त्यामुळें आज आपणांस होळ-करांची दौलत दिसत आहे !

या बाईची कुळकथा मात्र फारच अजब आहे. काळीं किंवा भगवीं वस्त्रें परिधान करून भिक्षा मागत आपलें आयुष्य व्यतीत करणाऱ्या मानभाव-कुलांत या बाईचा जन्म झाला. होळकरांच्या राज्यांत आजीबा नांवाचा

एक मानभाव साधू राहत असे. त्याच्या पुष्कळच शिष्यणी होत्या. पहिल्या मल्हारराव होळकराची रक्षा हरकुबाई ही या मानभावाची शिष्यीण होती. या बाईचें राज्यकारभारांत बरेंच वजन होतें. हरकूबाईची एक आवडती नोकर मीनाबाई ही सुद्धां या साधूच्या भजनीं होती. तुळसाबाई ही ह्या आजीबा साधूची मुलगी. ती रूपसंपन्न, धाडसी व बुद्धिमान् होती. तिचें लग्न झालें होतें. पण यशवंतराव होळकरांचें तिच्यावर मन बसलें, तेव्हां तिच्या नवऱ्यास कांहीं रक्कम देऊन त्यानें तिची मुक्तता केली व तिला आपल्याजवळ घेतलें, या वेळेपासून तुळसाबाईची भाग्यरेषा उजळली.

यशवंतराव जिवंत असेपर्यंत या बाईस आपली कर्तबगारी दाखविण्यास फारसा वाव मिळाला नाहीं. पण यशवंतराव होळकर भानपुरा येथें ता. २८–१०–१८१० रोजीं मरण पावला. त्याबरोबर या बाईस फार मोठा धक्का बसला. मराठेशाहीच्या पडत्या काळांत यशवंतरावाच्याइतका महा-पराक्रमी असा दुसरा पुरुष झाला नाहीं. परिस्थितीचें दान त्याला अनुकूल पडलें असतें तर या एकट्या वीरानें मराठशाहीचा झुकता मनोरा सांवरून धरला असता. पण दुर्दैवानें तसें झालें नाहीं. पराक्रमी माणसास शत्रुहि फार असतात व ते तो जीवत असेपर्यंत दबा धरून राहतात; पण एकदां का तो पडला म्हणजे ते त्याच्यावर गिधाडाप्रमाणें तुटून पडतात. असे शत्रू होळकरांच्या राज्याला फार होते. हिंदुस्थानांत एकतंत्री साम्राज्यसत्ता प्रस्थापित करूं पाहणारें कंपनी सरकार आणि होळकरांची दौलत घशांत टाकण्यासाठीं टपून बसलेला दौलतराव शिंदे ह्या दोन सत्ता म्हणजे होळकरांचा भाग्यभानू ग्रासून टाकणारे राहू–केतूच. यशवंतराव होळकर नाहींसा होतांच या दोघांनींहि आपल्या कंबरा आवळल्या. मालक नाहींसा झाला म्हणून धीर खचूं न देतां तुळसाबाईनेंसुद्धां आपली कंबर बांधिली आणि राज्यरक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर आहे हें ओळखून त्या धोरणानें तिनें चाल सुरूं केली. आपल्या सवतीचा चार वर्षांचा मुलगा मल्हारराव याला तिनें गादीवर बसविलें. राज्यारोहणप्रसंगीं जालीमसिंग कोटेकर, लालजी बल्लाळ, अमीर खान, गफूर खान

वगैरे सर्व प्रमुख सरदार व कारभारी मंडळ हजर होतें, या सर्व सरदारांशीं संगनमत करून राज्यकारभार पुढें चालविण्याचें तुळसाबाईनें ठरविलें.

वास्तविक पाहतां मल्हाररावास गादीवर बसविण्यापूर्वीं सरदारीचीं वस्त्रें व शिक्केकट्यार पेशव्यांच्याकडून आणावयास पाहिजे होतीं, पण होळकरांच्यावर बाजीरावाची वक्रदृष्टि असल्याकारणानें शिक्के कट्यार व सरदारीचीं वस्त्रें धाडण्याच्या बाबतींत तो निष्कारण घोळ निर्माण करील अशी भीति तुळसाबाईस वाटल्याकारणानें, हात दाखवून अवलक्षण करून घेण्याचा प्रसंगच तिनें टाळला; व मल्हाररावास गादीवर दडपून बसविलें, आणि अशा तऱ्हेनें एक मोठा प्रश्न निकालांत काढिला.

शिंदे–होळकरांचें वैर फार पुरातन; पण या दोन्हीहि गाद्यांवर आजपर्यंत तुल्यबल व समजूतदार माणसें होतीं म्हणून या उभय सरदारांच्या मनांतील वितुष्टास इतकें हिडिस स्वरूप आलें नव्हतें इतकेंच. महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर हे जुन्या पिढींतील दोन सरदार नाहींसे होतांच उभय घराण्यांतील तरुण सरदारांची चांगलीच जुंपली. तुकोजीराव होळकरांचा ज्येष्ट पुत्र काशिराव हा अर्धवट होता. त्याला बगलेंत मारून होळकरांच्या दौलतीचें वाटोळें करण्याचा घाट दौलतरावानें घातला. पण मल्हारराव, यशवंतराव आणि विटोजी, हे एकापेक्षां एकेक सरस असे तुकोजीरावाचे पुत्र जिवंत असल्याकारणानें त्यांनीं दौलतरावाची खोड मोडली व त्याच्या छाताडावर होळकरांची दौलत उभी केली. पण दुर्दैवानें होळकरांच्या घराण्यांतील सर्व कर्ते पुरुष मृत्युमुखीं पडले, दौलतरावाचें फावलें. त्याचा स्वार्थ पुन्हां एकदां उसळून बाहेर पडण्याचा मोका आला, तेव्हां शिंदा गडबड करणार याची कल्पना तुळसाबाईस होती. त्यास थंड पाडण्यासाठीं म्हणून तिनें आपलें संधान इंग्रजाशीं आहे असा देखावा निर्माण केला. इंग्रज हा तरी कोठें होळकराचा मित्र होता, पण त्यालासुद्धां आपला थांग लागू न देतां तुळसाबाईनें इंग्रज आणि शिंदे या दोघांस योग्य त्या अंतरावर ठेवून राज्यकारभार हांकण्यास सुरवात केली.

तुळसाबाईनें पुढाकार घेऊन कारभारास सुरवात केली खरी, पण कारभारी मंडळाची प्रभावळ मात्र यशवंतरावाच्या वेळचीच होती. तुळासाबाई महा उलाढाली आणि खटपटी बाई होती. ती देखणी, तरूण तडफदार व दुसऱ्यावर छाप पाडणारी होती. पण ती दुर्वर्तनी होती. आपलें कार्य तडीस जाईतोंपर्यंत ती कोणाशींहि नमतें घेई; पण कार्यभाग होतांच किंवा कोणी आपल्या कार्याच्या आड येत आहे असें पाहतांच ती त्याचा कांटा काढत असे. यशवंतरावाच्या अमदानींत मानास चढलेल्या दोन व्यक्ति म्हणजे धर्माकुवर व बाळाराम शेठ या होत. त्यांपैकीं बाळाराम शेठ हा गृहस्थ चांगला सज्जन व परोपकारी होता. त्यानें इंग्रजाचा व यशवंतरावाचा तह १८०५ त घडवून आणला. आणि तूर्त तरी एक फार मोठें संकट नाहींसें केलें. त्यामुळें साहजिकच यशवंरावाची त्याच्यावर जास्त मर्जी बसली. पुढें दुर्दैवानें यशवंतरावास वेड लागलें, या वेळीं तर बाळाराम शेठानें आपली वागणूक अशी कांहीं चोख ठेविली कीं, होळकर दरबार व रयत त्याला चाहूं लागली. सर्व मंडळींस आळा घालून त्यानें राज्यकारभार व्यवस्थित चालविला. त्यानें तुळसाबाईबरोबरहि पण कारभार चार वर्षें योग्यपणें चालविला. पण पुढें दोघांमध्यें काय तेढ आली कोणास ठाऊक, तिनें १८१५ त बाळारामशेठाचा खून करविला. पण त्याच्या मृत्यूनें निर्माण केलेले बखेडे तिला शेवटपर्यंत मिटवितां आले नाहींत.

तुळसाबाईच्या तंत्रांत बाळारामशेठ चार वर्षें तरी टिकला. पण यशवंतरावाचा दोस्त धर्माकुवर ह्याची तर तिनें यशवंतरावानंतर सात महिन्यांच्या आंतच चांदी आटविली. धर्माकुवर हा मोठा कल्पक व हुशार होता. वेडाच्या लहरींत बेफाम होऊन यशवंतराव जेव्हां धिंगाणा करीत असे त्या वेळीं त्या प्रतापसिंहाला आवरण्याचें अत्यंत कठीण व जिकीरीचें काम हा धर्माकुवर करीत असें. त्याचा खून तुळसाबाईनें ३१-३-१८११ त करविला. अशा तऱ्हेनें तुळसाबाईनें यशवंतरावाच्या या दोन प्रमुख मंडळींचा कांटा काढिला व आपला मार्ग निर्वेध केला. यानंतर गणपतराव शौचे हा गृहस्थ तुळसाबाईचा दिवाण झाला. हा अगदींच सामान्य होता. पण तुळसाबाईची त्याच्यावर मर्जी होती. तुळसाबाई वागणुकीनें तशी ढिली

होती व तिचा आणि या गणपतरावाचा संबंध असल्याचा बोभाटा फार झाला. त्यामुळें होळकर दरबारचा ‘ दरबार ’ तिच्यावर उलटतो कीं काय अशी साधार भीति वाटूं लागली. पण ती चतुर होती. तिनें आपला वचक अशाहि परिस्थितींत कायम ठेविला.

या वेळचें होळकर दरबारचें चित्र मोठें केविलवाणें होतें. सर्व शत्रूंना पुरून उरणारा यशवंतरावासारखा मोहरा नाहींसा झालेला, गादीवरील मल्हारराव हा तर अल्पवयी, स्वाऱ्यांच्या धुमाकुळीनें आणि बंडांनीं सर्व मुलूख उजाड झालेला, जवळ पैका नाहीं फौजेचें देणें तुंबलेलें, शिवाय बायकांचें राज्य. तेव्हां कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. अशी एकंदर केविलवाणी स्थिति झालेली. अशा स्थितींत राज्यधुरा हातीं घेऊन गाडी हांकलणें म्हणजे फार जोखमीचें काम, पण तुळसाबाईनें तें मोठ्या कौशल्यानें कांहींसें पार पाडलें.

होळकरांच्या घराण्यास अहिल्याबाईच्या नांवानें आलेला उजळा कांहीं न्यारा आहे. मग राष्ट्रहिताच्या दृष्टीनें किंवा आजच्या राजकारणाच्या दृष्टीनें मराठी साम्राज्याचें नुकसान अहिल्याबाईच्या हातून झालें असेल. पण तो दृष्टिकोन योग्य कां अयोग्य याच्याशीं आपल्याला प्रस्तुत कांहींच कर्तव्य नाहीं. पण त्या साध्वीच्या नांवाची पुण्याई होळकर घराण्यास शोभा आणणारी आहे, हें नाकबूल करतां येत नाहीं. तेव्हां होळकरांच्या घराण्यांतील स्त्रियांनीं अहिल्याबाईचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न करणें स्वाभाविक आहे. तुळसाबाई तसें वागण्याचा प्रयत्न करी, पण तिला तें फारसें साधत नसे. अहिल्याबाईची प्रतिष्ठा तिला लाभली नाहीं व ती गोष्ट तिच्या आवाक्याबाहेर होती. ती तरूण व देखणी होती कचेरीचें काम ती जातीनें बसून करी. तिला कामापुरतें चालचलाऊ लिहितां वाचतां येत होतें. अशा तऱ्हेनें ती आपला कारभार हांकत होती. होळकराचा हा कारभार भोंवतालच्या विघ्नसंतोषी लोकांस मात्र खपत नव्हता. होळकरांच्या दौलतीचा लोण्याचा गोळा गट्ट करण्यासाठीं टपून बसलेला बोका म्हणजे दौलतराव शिंदे. त्याच्या मनांत तुळसाबाई व तिच्या कर्तबगारीचा सर्व आधार, किंबहुना होळकरांच्या वंशवृक्षाचा नवअंकूर-छोटा मल्हारराव.

या दोघांचा कांटा काढून होळकरांची दौलत घशांत टाकावी असें होतें. दौलतराव असले विचार इतके दिवस मनांतल्यामनांत करीत होता. त्याची मजल कृतीपर्यंत अलीकडे आली नव्हती. ती स. १८१२ त आली; आणि या सालांत तुळसाबाई आणि मल्हारराव या दोघांचा खून करण्याचा घाट त्यानें घातला. या बनावाची बातमी गफूरखान व तात्या जोग या दोघांस वेळेवर लागली; तेव्हां त्यांनीं सावधगिरी ठेवून उभयतांवरील प्राणसंकट वांचविलें. आणि होळकरांच्या घराण्यावरील एक मोठें गडांतर टळलें.

हा खुनाचा प्रयत्न १८१२ त झाला. नंतर दोनतीन वर्षांनीं म्हणजे १८१५ च्या प्रारंभीं कांहीं दिवस होळकराचा कारभार तुळसाबाईच्या हातांतून गेला होता. तो तात्या आळेकरास हाताशीं घेऊन तुळसाबाईची सवत मैनाबाई ही पाहत होती. तिनें दौलतरावाच्या भेटीस तात्या आळेकरास पाठविलें; आणि त्याच्याशीं चढाबाचा आणि बचावाचा असा गुप्त तह घडवून आणिला. पेशव्यास आपला धनी समजून त्याचे हुकमतींत शिंदे–होळकरांनीं एकजुटीनें वागून मराठी राज्याचा बचाव करावा, पेंढारी सरदारांस जहागिऱ्या देऊन आपल्या मदतीस घ्यावें, आणि रजपूत राजे स्वतंत्र होऊं पाहत आहेत त्यांस पूर्वींप्रमाणें आपले ताबेदार बनवावे अशीं या तहाचीं कलमें होतीं. अमीरखान व इंग्रज यांची सत्ता मोडून काढावी असेंहि एक गुप्त कलम या तहांत होतें. हा तसा तसा कांहीं वाईट नव्हता; पण तो सुद्धां सिद्धीस न जाण्याचें कारण दौलतरावाचा स्वार्थ. त्याच्या मनांत होळकरांची दौलत घशांत टाकावयाची होती, म्हणून त्यानें या तहाप्रमाणें वागणूक केली नाहीं. पुढें या तहाचा गुप्तपणा नाहींसा होऊन तो षट्कर्णी झाला व मैनाबाईच्या हातचा कारभार गेला. पुन्हां तुळसाबाईचा आणि बाळाराम शेटाचा जोर झाला. त्याचें कारण बहुधा अमीरखानाचें होळकर दरबारांतील वर्चस्व कमी करण्याचा गुप्त कट मैनाबाई आणि तात्या आळेकर यांच्या गळ्याशीं आला असावा. आणि याच गोष्टीचा फायदा बाळारामशेट आणि तुळसाबाई यांनीं घेतला व त्यांनीं मैनाबाईस कारभारांतून हुसकून लाविलें; आणि अमीरखानास जवळ केलें.

यशवंतरावाच्या अमदानींत मानास व योग्यतेस चढलेले सरदार म्हणजे

अमीरखान व त्याचा हस्तक गफूरखान हे होते. ते फौजबंद होते, तुळसाबाई धूर्त असल्या कारणानें त्यांच्या साहाय्यानेंच ती आपला कारभार करीत होती. मैनाबाईच्या राजकारणापासून अमीरखान राज्यकारभारांत विशेष लक्ष घालूं लागला; आणि तुळसाबाईच्या कारभारास स्थिरता यावी म्हणून जयपूर, जोधपूर, वगैरे राज्यांतून खंड वसूल करून खर्चाची तजवीज त्यानें केली. अमीरखान एकंदरीनें मोठा तडफेचा माणूस दिसतो. तो आपल्या समजुतीप्रमाणें होळकराचा कारभार नीट मार्गास लावीत होता. संकटें डोकावत होतीं, पण त्याला फारशी भीक घालणारा हा गृहस्थ नव्हता. कमरेच्या समशेरीप्रमाणें त्याचें अंतःकरणहि पण धारदार होतें.

तुळसाबाई आणि मल्हारराव यांच्यावर घाला घालण्याचा बेत फोल ठरला आणि मैनाबाईच्या हातचा कारभार निघाला. त्याबरोबर दौलतरावाच्या सुपीक डोक्यांतून निराळीच शक्कल निघाली. यशवंतरावाचा भाऊ मल्हारराव, त्याची बायको रमाबाई व खुद्द यशवंतरावाची बायको ताराबाई यांच्याकडे दौलतरावानें संधान लाविलें, व त्यांच्या मांडीवर कोणी दत्तक घेऊन नवीनच खूळ निर्माण करावें आणि अशा तऱ्हेनें तुळसाबाईचा नाश करावा अशी खटपट दौलतरावानें चालविली. या नव्या राजकारणाची कानगी अमीरखानास लागतांच त्यानें हें राजकारण मुळासकट उखडून टाकिलें. स. १८१५ त रमाबाई व ताराबाई या दोन्ही बायकांस खानानें ठार मारून टाकिले व एका राजकारणाचा नायनाट केला. हें त्याचें कृत्य फार क्रूरपणाचें दिसेल पण राजकारण दया, माया कांहीं एक ओळखत नाहीं. राज्यरक्षण हें एकच नातें राजकारणी पुरुषास माहीत असावें लागतें. त्याच्यापुढें येणारा कोणताहि संबंध कशाचीहि क्षिति न बाळगतां आडवें आलेलें पोर छाटून काढतात त्याप्रमाणें छाटून काढावे लागतात. तेव्हांच राजकारणें तडीस जातात व सिंहासनें टिकतात.

घरांतील कर्ता माणूस नाहींसा होण्यासारखें दुसरें छिद्र नाहीं. जी गोष्ट सामान्य घराला लागू तीच गोष्ट राज्यालाहि लागू. हें छिद्र होळकर घराण्यास पडल्या कारणानें त्याला सर्व बाजूंनीं त्रास होत होता. होळकरशाहीचा एक प्रबल शत्रु दौलतराव याचा बंदोबस्त कसा तरी बऱ्यावाईटानें

चालू होता. तो अत्यंत नजीकचा असल्यामुळें त्याच्यावर कडीं नजर ठेवावी लागत होती. होळकरांचें कारभारी–मंडळ व खुद्द तुळसाबाई, होळकर घराण्याचा बचाव करण्याची एकसारखी खटपट करत होतीं. बाजीराव पेशवे यांची गैरमर्जी होळकरांच्यावर पहिल्यापासूनच होती, तेव्हां आतां त्यांनीं पेशव्यांचा दिल आपणाविषयीं साफ करण्याचें ठरविलें आणि त्या दिशेनें खटपट सुरू झाली. रावजी गोविंद, सखाराम जगजीवन आणि खण्डो महादेव या सरदारांचें मंडळ पुण्यास रवाना करण्यांत आलें. त्यांनीं सदाशिव माणकेश्वर व विंचूरकरांचा कारभारी बाळाजी लक्ष्मण सलकडे या दोन गृहस्थांच्या मार्फत बाजीरावाचें चित्त शुद्ध करण्याचा प्रयत्न चालविला.

'खावंदांचा लोभ दिवसान्दिवस वाढावा, आमची सेवा करण्याची उमेद भारी आहे, असे भाव पेशव्यास दर्शवावे. कै. यशवंतरावांनीं पदरचे माणूस सर्व लोभांत ठेऊन फौजेची हुशारी केली. तो ओघ यथास्थित चालवून सरकार चाकरी घडावी याहून दुसरें लक्ष नाहीं !' अशा आशयाचीं पत्रें मल्हाररावानें धाडिलीं होतीं. परंतु बाजीरावाचें मन यशवंतरावाच्यापासूनच होळकर घराण्याविषयीं शुद्ध नव्हतें. तेव्हां या शिष्टाईचा फारसा उपयोग झाला नाहीं. पण बाजीरावानें या वेळीं जर शहाणपणा केला असतां व होळकराशीं दिलजमाई केली असती तर फार चांगलें झालें असतें. कारण पुढें जेव्हां त्यानें इंग्रजाविरुद्ध उठण्याचें ठरविलें त्या वेळीं त्यास होळकरांशीं मिलाफ करावाच लागला. तें काम या वेळीं झालें असतें तर त्यांत एक तऱ्हेचें औचित्य आणि गोडवेपणा होता. बाजीरावाच्या हातून असंख्य चुका झाल्या त्यांत ही एक, दुसरें काय !

सन १८१२ ते १८१५ पर्यंत फारशा भानगडी झाल्या नाहींत. पण नंतर मात्र राजकारणाचें आकाश सर्व बाजूनें भरून आलें आणि क्रांतीची चपला चमकून पुढील दोनतीन वर्षांत सर्व आकाश सपाट होऊन स. १८१८ त कंपनी सरकारचें सिंहासन स्थिर झालें.

'आम्हाला व्यापाराशिवाय कांहीं कर्तव्य नाहीं,' — 'आम्हाला व्यापाराशिवाय कांहीं कर्तव्य नाहीं' म्हणून एकसारखा जप करणाऱ्या

साहेबानें सर्व बाजूंनीं व्यवस्थित तऱ्हेनें मांड मांडून आपणांस पूर्णपणें आवळण्याचा घाट घातला आहे हें सर्व मराठी दौलतदारांनीं जाणलें होतें; व त्यांतून मुक्त होण्याची प्रत्येकाची इच्छा होती. या इच्छेस अनुसरून मोका आला. नेपाळांत युद्धास तोंड लागलें व त्या ठिकाणीं इंग्रजास चार दोन ठिकाणीं चांगलेच रट्टे बसले. त्याबरोबर इंग्रजास मोडून काढण्यासाठीं मराठे सरदारांनींहि समशेरीस हात घातला. स. १८१५ च्या डिसेंबरमध्यें होळकरांच्या लष्करांत मोठी दंगल माजली. होळकरांचें सर्व लष्कर इंग्रजाशीं सामना देण्यासाठीं बाहेर पडण्याच्या तयारींत होतें. पण तुळसाबाई व मैनाबाई यांच्याकडून लष्कराला पगार पोंचला नाहीं, म्हणून तें खवळलें व त्यानें पगारासाठीं मालकिणींच्या पायाशीं धरणें धरलें. पैशाची तंगी फार. त्यामुळें लष्कराच्या बाकीचा फडशा पाडणें तुळसाबाईस शक्य नव्हतें. फौजेचें एकंदर वातावरण फार भयंकर झालें होतें. म्हणून या पेंचांतून निसटण्याची तुळसाबाईची एकसारखी धडपड चालली होती. ते दिवस मोहरमचे होते. कत्तलच्या रात्रीं डोल्याची मिरवणूक निघाली असतां, त्या दंगलीचा फायदा घेऊन तुळसाबाई व मैनाबाई या दोघींनीं बाल राजा मल्हारराव यास बरोबर घेऊन पळ काढला, आणि कोटा गांठला. त्या ठिकाणीं त्या जालिमसिंगाच्या आश्रयास जाऊन राहिल्या. या आणीबाणीच्या प्रसंगीं जालीमसिंगानें बाजू चांगलीच संभाळली. त्यानें पैशाचा मेळ बसवून राज्याचा जम नीट बसविला.

पण यावेळीं एक नवीनच विघ्न निर्माण झालें. तुळसाबाई आणि मैनाबाई ह्या दोघींचा एक विचार नव्हताच. आतां पुन्हां त्यांच्यामध्यें धुसफुस सुरू झाली व शेवटीं, तुळसाबाई मैनाबाईस कैद करणार असा रंग दिसूं लागतांच तिनें तेथून पळ काढला व ती आपल्या सैन्यांत १८१६ त येऊन दाखल झाली. तिला तिच्या सैन्यानें अटकेंत ठेविलें. सैन्याच्या देण्यामुळें होळकरांच्या या दोन्हीही राण्या फिकीरीस आल्या होत्या. पण या वेळीं अमीरखान आणि जालीमसिंग या उभयतांनीं उत्तम प्रकारें त्यांचें रक्षण केलें.

काळ कोणावर केव्हां व कसा सूड घेईल याचा नेम नाहीं. कोणीहि

आपल्या मिशीस पीळ भरू नये. 'खावंदांचा लोभ वाढावा, आमची सेवा करण्याची उमेद भारी आहे' म्हणून आर्जवानें सांगणाऱ्या होळकरास बाजीरावानें धनीपणाच्या घमेंडींत कांहींच दाद दिली नाहीं. पण पुढें लवकरच जेव्हां त्याचा इंग्रजांशीं बेबनाव झाला त्यावेळीं आपल्या पदरचें सामर्थ्य एकवटण्याची खटपट सुरू झाली. यावेळीं होळकराविषयींचा सर्व रागलोभ विसरून बाजीरावानें गणेशपंत पिटके नांवाचा खास वकील होळकराकडे ता. १८।६।१८१७ पाठविला. हें नवीन राजकारण प्रगटांत येऊं नये म्हणून पिटक्यांच्या बरोबर धोंडोपंत तात्या नांवाचा दुसरा एक गृहस्थ धाडिला होता. आपली कामगिरी गुप्त राहावी म्हणून या धोंडोपंत तात्यानें कृष्णराव असें खोटेंच नांव घेतलें होतें. या वकिलाचें काम शिंदे, अमीरखान जालिमसिंग, कोटेकर या चार सरदारांस मिळवून घेऊन इंग्रजाविरुद्ध चढाई करण्यास उद्युक्त करण्याचें होतें. बाजीरावाची ही गडबड डोळ्यांत तेल घालून साहेब पाहत होता व ती सिद्धीस जाऊ न देण्याचे आटोकाट प्रयत्न चालू होते. यमुनेवर ऑक्टरलोनी व नर्मदेवर हिस्लॉप हे दोन जबरदस्त इंग्रज सेनापति ठासून उभे होते. त्यांचीं सर्व सूत्रें सावधान चित्तानें हालविण्यासाठीं खुद्द मालकम त्या ठिकाणीं हजर होता. मराठ्यांना चीत मारण्याचा इंग्रजाचा डाव ठरलेला. फोडा व झोडा या डावाचा उपयोग या ठिकाणींहि यशस्वी झाला. ऑक्टरलोनीनें होळकरांच्या दरबाराचा व लष्कराचा मुख्य मुखंड अमीरखान यास कांहीं अमिष दाखवून या नवीन मंडळांतून फोडलें. त्यामुळें तुळसाबाई निर्बल झाली. तरी पण होळकर घराण्याचें इमानदारीचें ब्रीद तिला स्वस्थ बसू देईना, तिच्या मनांत पेशव्यांशीं मिलाफी होऊन इंग्रजावर तुटून पडावयाचें होतें.

तुळसाबाईच्या आयुष्यांतील अत्यंत भानगडीचा काळ आतां आला, इंग्रजांनीं पेंढाऱ्यांविरुद्ध मोहीम सुरू करतांच होळकरांच्या सैन्यांत फारच मोठी दंगल माजली. नर्मदेच्या बाजूस पेंढाऱ्यांवरील मोहीमेचा मुख्य चालक सर जॉन मालकम होता. तो सीतूच्या पाठीवर सारंगपुरास चालून गेला. सीतू हा पेंढाऱ्यांचा मुख्य सरदार, त्याची व होळकरांच्या सरदारांची भेट होऊन त्यांचें संगनमत झालें. तेव्हां होळकरांचें सैन्य इंग्रजावर

चढाई करणार हें निश्चित झालें. यावेळीं तुळसाबाईचा मुक्काम रामपुरा येथें होता. पुढें युद्ध करण्यास ठीक पडावें म्हणून सीतू आपलें कुटुंब कमळनेर येथें ठेवण्यास गेला. या घालमेलीची बातमी सर जॉन मालकम यास कळली. त्याबरोबर त्यानें ही बातमी सर टॉमस हिस्लॉप व कर्नल ॲडम वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांस कळविली. व आपलीं प्यादीं त्या दृष्टीनें हालविण्यास सुरवात केली.

होळकरांचा मुख्य सरदार अमीरखान यास साहेबानें बोटचेपा केलाच होता. तसेंच इंग्रजांचें सर्व बाजूंनीं फोंफावत जाणारें सामर्थ्य पाहून होळकर दरबारांतील सूज्ञ, मुत्सद्दी लोकांस असें खास वाटत होतें कीं आतां इंग्रजापुढें आपला निभाव लागणें शक्य नाहीं, तेव्हां पेंढाऱ्यांच्या नादानें त्याच्यावर उठणें बरें नाहीं. होळकर इंग्रजावर उठणार, अशा अनंत गप्पा उठत होत्या तरी त्या मुळांत धर धरीत नव्हत्या. तुळसाबाईच्या मनांत इंग्रजावर उठावें असें होतें तरी भोंतालची परिस्थिति तिला अनुकूल नव्हती. ही झाली होळकर दरबारची स्थिति. आतां खुद्द इंग्रज सुद्धां होळकराशीं नवीन दोस्तीचा तह करण्यास उद्युक्त होताच. कारण त्यास पेंढाऱ्यांवरील मोहीम यशस्वी करावयाची होती. तेव्हां मार्गांतील हीं संकटें नाहींशीं करण्याचीं त्याची खटपट जोरांत होती. या त्याच्या इच्छेस अनुसरून दिल्लीचा रेसि-डेंट मेट्काफ् यानें होळकर दरबारशीं व अमीरखानाशीं त्या दृष्टीनें पत्र-व्यवहार सुरू केला. त्याबरोबर परस्पर बोलणीं होऊन ता. १५ नोव्हेंबर १८१७ ला होळकरांच्याकडून रेसि. मेट्काफ् यास कळविण्यांत आलें कीं आम्ही मल्हाररावास घेऊन तुमच्या आश्रयास येतों. येथपर्यंत हें राजकारण गणपतराव शौचे व तात्या जोग यांनीं रंगरूपास आणिलें. अमीरखान या गोष्टीस हरकत घेईल असें नव्हतें, तरी पण ही गोष्ट अमीरखानास कळ-विण्यांत आली नव्हती व हें घोडें येथेंच पेंड खात होतें. कारण होळकर दरबारांत अमीरखान इतका जबरदस्त होता कीं, त्याच्या परवानगीशिवाय कोणतीहि छोटी मोठी गोष्ट तडीस जाणें शक्य नव्हतें.

हें राजकारण इतकें घाईस आलें असतां एकदम पारडें पालटलें. ता. ५ नोव्हेंबरला पुणे येथें रेसीडेन्सीस आग लावून बाजीरावानें इंग्रजाशीं उघड युद्ध

पुकारल्याच्या बातम्या धडकल्या. त्याबरोबर होळकर दरबारांत पुन्हां दंगल माजली. आपला खावंद बाजीराव यानें ज्या अर्थी इंग्रजाशीं उघड सामना मांडिला आहे त्या अर्थी आपण रामपुरा येथील आपली छावणी मोडून बाजीरावाच्या मदतीला दक्षिणेंत धांवून जाणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी होळकर दरबारांतील पिढीजाद सरदारांची भावना झाली; आणि कारभारी लोक स्वामीद्रोह व राष्ट्रघात करून इंग्रजांस सामील होतील तर त्याचा बंदोबस्त करावा असा होळकरांच्या दरबारांतील समशेर बहादुरांनीं विचार केला. पण मुत्सद्दी मंडळींस हा विचार अविचाराचा वाटला. भावना-प्रधान मंडळींस हा विचार मानवणारा होता, पण त्याचे परिणाम अत्यंत घातुक होते. इंग्रजास मोडून काढणें शक्य नव्हतें. तेव्हां तात्या जोग-म्हणजे इंदूर येथील सुप्रसिद्ध किबे घराण्याचे पूर्वज-यांनीं तुळसाबाईस स्पष्टपणें इंग्रजाशीं सामना देणें मूर्खपणाचें आहे असें सांगितलें. त्याबरोबर ते कारभारी इंग्रजाशीं मिलाफी आहेत असें समजून त्यास गफरखान व रामदीन यांच्या-कडून ता. २४ नोव्हेंबर रोजीं कारागृहांत डांबून टाकण्यांत आलें, आणि पुढील मार्ग व धोरण आक्रमण्यास सुरवात झाली. रामपुऱ्यावरून चोळी-महाबळेश्वराच्या मार्गानें दक्षिणेंत घुसण्याकरितां महिदपुराकडे फौजेनें कूच केलें. अशा उत्साहानें ही फौज चालली असतां वाटेंत आणखी पुष्कळ फौज व सीतू पेंढारी सामील झाला. इंदुरास पोहोंचतांच खर्चासाठीं ऐवज पदरांत टाकूं व नर्मदा उतरतांच बाजीरावाकडून खर्चासाठीं चिकार पैसा येत आहे तो तुम्हास देऊं, असें आश्वासन होळकरांच्या सरदारांनीं फौजेस देतांच फौजेंत एक प्रकारचा जोम व उत्साह दिसूं लागला व हा सेनासागर हेलावत हेलावत दक्षिणेकडे चालला.

तिकडे बाजीरावानें युद्ध पुकारलें व त्याच्या मदतीसाठीं इकडून हें एवढें मोठें सैन्य रवाना होत असलेलें पाहून इंग्रजास मोठा पेंच पडला. सर जॉन मालकम हा हें सर्व संकट आरंभापासून टेहळत होता. त्यानें ह्या सर्व हालचाली पाहून होळकरांच्या सरदारांस पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. “आम्हीं पेंढाऱ्यांवर शस्त्र धरिलें आहे, तेव्हां सीतू वगैरेंना मदत करू नका; तसेच बाजीरावाचाहि पण क्षणाचा भरंवसा धरू नका. तो

स्वतःबरोबर तुमचाही नाश करील. त्याच्या बोलांत बोल नाहीं.' हें मालकमचें म्हणणें होळकरांच्या सरदारांस मानवेना. त्यांनीं बाह्यतः मालकमच्या म्हणण्यास गुळमुळीत 'हां' म्हणत आपली चाल मात्र दक्षिणेकडे चालूच ठेविली. तेव्हां मालकमनें हेरलें कीं एव्हढ्या मोठ्या फौजेस दक्षिणेंत जाऊं देणें धोक्याचें आहे. तेव्हां फौज तेथें पोंचल्यानंतर मग वेढा देण्यापेक्षां आतांच त्यांच्याबरोबर तह करून होळकरास मोडून काढावें, असा विचार करून सर जॉन मालकम त्या उद्योगास लागला. तो आपल्या सैन्यासह सर टॉमस हिस्लॉप यास मिळाला. आणि ता. १४ डिसेंबर रोजीं त्यानें होळकरांच्यावर चाल केली.

या वेळीं होळकरांच्या सैन्याचा तळ उज्जयनीच्या उत्तरेस सुमारें ३० मैलांवर क्षिप्रा नदीच्या पश्चिम तीरावर महिदपूर येथें होता. या ठिकाणीं होळकरांच्या सैन्याशीं इंग्रजानें गांठ घातली. इंग्रज आपणावर चालून येत आहे ही बातमी होळकर सैन्यांत फैलवतांच तेथें मोठी धांदल उडाली व अनंत भानगडी सुरू झाल्या. प्रत्यक्ष युद्धास तोंड लागण्यापूर्वीं होळकरांनीं तह करावा म्हणून त्याकडे खलिता धाडण्यांत आला. त्यावरून सरदारांनीं आपले वकील इंग्रजाकडे धाडिले आणि आतां तह होऊन लढाईचा प्रसंग टळणार असें शांततेचें वातावरण निर्माण होण्याचा रंग दिसू लागला. पण ही शांतता अग्निरस बाहेर पडण्यापूर्वीची ज्वालामुखीवरील शांतता ठरली. एकदम स्फोट झाला. रामदीन, रोशन बेग. गफूरखान, आणि सदरुद्दीन या लष्करी अंमलदारांनीं ता. १७ डिसेंबर १८१७ रोजीं गणपतराव शौचे व तुळसाबाई या दोघांस अटक करून हा तहाच्या वाटाघाटीचा पट पार उधळून दिला. रामदीन, रोशन बेग वगैरे लोकांची ठाम व खरी समजूत अशी कीं, होळकर व इंग्रजाचा समेट झाला तर आपला नोकरी धंदा बंद होऊन आपणास अन्नान्न दशा येईल. तेव्हां युद्ध करून इंग्रजास नरम पाडावें आणि तसें झालें म्हणजे मग आपली सोय योग्य प्रकारें होईल. हा त्यांचा विचार त्यांच्या दृष्टीनें योग्य व खरा होता. आणि तो खरा ठरलाही. गणपतराव शौचे व तुळसाबाई यांना अगाऊच कैद करण्यांत आलें होतें. यानंतर त्यांनीं तुळसाबाईपासून मल्हाररावास अलग

केलें आणि या धांदलींत तुळसाबाईचा ता. २०।१२।१८१७ रोजीं रात्रीं बाराच्यापुढें खून करण्यांत आला व तिचें प्रेत क्षिप्रा नदींत फेंकून देण्यांत आलें.

होळकरांच्या दरबारांत मानानें वावरणारी, राज्यांचीं सूत्रें सती अहिल्याबाईच्या दिमाखानें हालवणारी आणि होळकरांच्या मसनदीवर बसून महाराणीचे मुजरे घेणारी तुळसाबाई राजकारणाच्या दंगलींत कापली गेली आणि तिचा मुडदा क्षिप्रा नदीच्या प्रवाहांत गटंगळू लागला. हा खून गफूरखानानें करविला. तो इंग्रजाच्या उठावणीनें झाला असा बोभाटा झाला. त्यांत सत्यांश असावा. कारण इंग्रजाशीं मेचून न वागतां बाजीरावास मिळावें व कंपनीसरकारशीं जोराचा सामना द्यावा असा तेजस्वी विचार या बाईच्या डोक्यांत एकसारखा घोळत होता. तेव्हां इंग्रजांनीं आपलें राजकारण तडीस नेण्यासाठीं हा बुंधा मुळासकट उखडून टाकला, निदान तसा प्रसंग आला असतां इंग्रजांनीं मूक संमति दिली असण्याचा अगदींच संभव नाहीं असें नाहीं. कारण कंपनी सरकारचा पाव्हण्याच्या काठीनें साप ठेंचण्याबद्दलचा लौकिक अलौकिक आहे. तुळसाबाई तीस वर्षांची होती. पण ती लोकप्रिय नसल्याकारणानें होळकरांच्या दरबारांत फारशी धांदल झाली नाहीं. फारशी धांदल झाली नाहीं असें म्हणण्यापेक्षां तशी गडबड करण्यास इंग्रजानें सवडच सांपडू दिली नाहीं.

मालकावर पिस्तूल झाडून 'ऐवज टाक' म्हणून सवाल करावा त्याप्रमाणें झालें. रात्रीं तुळसाबाईचा खून करून तिच्या जड शरीरानें क्षिप्रा नदीचा तळ गांठला असेल नसेल तोंच २१ डिसेंबरला सकाळींच होळकरांच्या सरदारांस दमबाजीचा निरोप कीं, 'तह पत्करून शरण या, नाहीं तर युद्धास सज्ज व्हा!' या निरोपाच्या पाठोपाठ क्षिप्रानदीच्या पूर्व तीरावरून मालकम व हिस्लॉप यांनीं नदींतून जाऊन होळकरांच्या तळावर हल्ला चढविला. यावेळीं होळकरांचें सैन्य मनाच्या कमकुवत परिस्थितींत होतें, तरी सुद्धां न डरतां त्यांच्या तोफखान्यानें इंग्रजांच्यावर जबरदस्त मारा केला. त्यामुळें इंग्रजाचा फार खराबा झाला. पण इंग्रजांनीं भाल्यांनीं आणि तलवारींनीं होळकरांचे पुष्कळ लोक कापून काढिले.

इंग्रजांनीं आपल्या इच्छेनुरूप तुळसाबाईचा वध घडवून आणला. या एकाच गोष्टीवरुन होळकरांच्या सैन्यांत इंग्रजांनीं किती फितूर केला असेल याची चांगलीच कल्पना करतां येतें. होळकरांचे घोडेस्वार-पुरेपूर फितूर झाले होते. ते सामानसुमान टाकून रणभूमीवरून पळून गेले. या वेळीं बारा वर्षांचा छोटा बच्चा मल्हारराव होळकर हा हत्तीवर बसून लष्करांत हिंडत होता. तसेंच त्याचा चुलतभाऊ हरीहरराव हाहि ठासून उभा होता. या दोन्हीहि छाव्यांच्या अंगीं होळकर घराण्याचें बाणेदार रक्त चांगलेंच सळसळत होतें. पण फितुरांपुढें काय करणार! सर्व लोक पळाले. फौजेचा भणभणाट झाला, आणि मंदासरच्या तहानें होळकर इंग्रजांचा अंकीत झाला! अशा तऱ्हेनें होळकरांच्या स्वातंत्र्य अन्तरधान पावले.

---

# काला पहाड : ३

मैदान गाजवून अचूक यश देणारी तोफच खाशांच्या मरणाला कारण झाली ! बरकंदे लढवय्ये गतप्राण झाले. दोघांच्या गर्दनी मारल्या गेल्या. एकाचें मस्तक झाडास टांगण्यांत आलें. दुसऱ्याचें डोकें शत्रूंनीं पळविलें व धडें घारी–गिधाडांच्या भक्ष्यस्थानीं टाकण्यांत आलीं. असा घनघोर प्रसंग बापू गोखल्यावर आला. याच वेळीं गोखल्यांचा वंशवृक्ष छाटला जावयाचा; पण बापू वांचला. त्यानें गोपाळ–अष्टयाचें रणमैदान आपल्या घोर बलिदानानें गाजविलें. तो सूर्यमंडळ भेदून पार झाला. पण या दोन्ही वेळीं अस्तनींतील निखारा भोंवला. निपाणकर देसायानें विश्वासघात घेला !

तो प्रसंग रावबाजीच्या वेळचा. ही वेळ अशी कांहीं चमत्कारिक आली होती, कीं पेशव्यांच्या मनगटांतील जोर खलास झाला होता; त्याचें सामर्थ्य घसरगुंडीस लागलें होतें. तें सांवरून धरण्यास कर्तीं माणसें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींच होतीं. त्यामुळें ती गोष्ट अशक्यप्राय झाली होती. एकसारख्या कटकटी आणि तंटे होत होते. शत्रूचा उपद्रव फार होता. तेव्हां त्याच्याशीं टक्कर घेऊन पेशव्यांची सत्ता अबाधित राखण्याचा उद्योग

फौजबंद सरदारांना करावा लागे. या वेळीं कर्नाटकाचा कारभार गोखले-पटवर्धनांच्याकडे सोंपविण्यांत आला. या सुमारास धोंडाजी वाघानें मोठी धामधूम चालविली. त्याच्या हैदोसानें रयत हैराण झाली. तेव्हां त्याचा बंदोबस्त करणें क्रमप्राप्त झालें. तें काम गोखले-पटवर्धनांनीं आपल्या शिरावर घेतलें. तें तडीस नेण्याचा आटापिटा त्यांनीं शिकस्तीनें केला.


धोंडाजी वाघ म्हणजे वाघच होता. मोठें प्रचंड प्रस्थ, केव्हां काय करील याचा नेमच नाहीं. कर्तृत्वहि त्याच तोलाचें. त्या कर्तृत्वास चारित्र्याची जोड असती तर तें पृथ्विमोलानें इतिहासांत नमूद झालें असतें. पण तो पुंड पाळेगार होता. त्याचा शेवट बंदुकीच्या गोळीनें झाला !

आदिलशाही दरबारांत हे वाघ लष्करी पेशा करून होते. मानाचे मानकरी म्हणून वावरत होते, अनागोंदीनजीक कृष्णाकांठच्या गर्द बनांतून वाघिणीचें दूध आणून दिल्याकारणानें सुलतानानें त्यांस ' वाघ ' ही किताबत वंशपरंपरा दिली. आणि हे पवारांचे वाघ झाले ते वाघच राहिले. त्यांना वैभवशाली कर्तृत्वाचे पंख फुटले नाहींत. दादागिरी करावी आणि मस्तींत आयुष्य कंठावें असा त्याचा दस्तुर चालू होता.

धोंडाजीनें आपल्या लष्करी आयुष्याची सुरवात पटवर्धनांच्या पदरीं केली. त्यानंतर कांहीं दिवस तो करवीरकरांच्या पदरीं होता. पुढें त्याची व लक्ष्मेश्वरचा देसाई कांचनगौडा याची गांठ पडली. त्याबरोबर वाघाचें काम झालें ! समानशील भेटले. हा देसाई आसपासचा मुलूख मारून बलदंड झाला होता. यां कामीं त्यांस वाघाचें चांगलेंच साहाय्य झालें. दोघांची गट्टी जमली. त्यांनीं आपल्या सामर्थ्याचा पहिला हिसका पटवर्धनांस दाखविला. सन १७७७ मध्यें सावशीच्या लढाईंत या दोघांनीं हैदरअलीची फौज आणून पटवर्धनांचा फडशा पाडला. परकीयांच्या मदतीनें स्वकीयांचा फडशा पाडण्याचा हा राबता फार पुरातन आहे.

त्यापुढील सालीं परशुरामभाऊ पटवर्धन आणि हरिपंततात्या फडके हैदरावर चालून गेले. त्या वेळीं देसाई पसार झाला. पण त्याचीं बायकामुलें श्रीरंगपट्टणच्या किल्लयांत होतीं. तीं भाऊनें हस्तगत करून

मिरजेस नेऊन कैदेंत ठेविलीं; श्रीरंगपट्टणचा किल्ला जमीनदोस्त केला. इतक्यांत हैदरची राजवट संपून टिपूची सुरू झाली. त्यानें कांचनगौडा देसायास पकडून श्रीरंगपट्टणास कैदेंत ठेविलें. केंचवा नांवाची देसायाची रक्षा मोठी बाणेदार बाई होती. तिनें धोंडाजी वाघास साहाय्य करून शिरहट्टीचा किल्ला पुन्हा बांधला. आणि टिपूचा मुलूख बडविण्यास प्रारंभ केला. वाघाच्या पुंडाईनें अवघा मुलूख हैराण झाला.




धोंडाजी वाघाच्या पुंडाईने गांजलेला मुलूख

त्याबरोबर सन १७८६ मध्यें टिपूनें त्याच्यावर फौज पाठवून केंचवा व धोंडाजी वाघ या उभयतांस पकडून श्रीरंगपट्टणास ठेवलें. नंतर चार वर्षांना सन १७९० मध्यें पटवर्धनांचें लष्कर धारवाडवर चालून आलें. तेव्हां "मला सोडाल तर तिकडे जाऊन भाऊंचा बंदोबस्त मी करतों," असें

सांगून वाघानें टिपूच्या तावडींतून आपली सुटका करून घेतली. तो फौजबंद होऊन निघाला, पण भाऊचा बंदोबस्त करण्याऐवजीं तो त्यालाच सामील झाला ! भाऊच्या लष्करांत त्यानें मराठ्यांची चाकरी केली. भाऊच्या साहाय्यानें लक्ष्मेश्वर येथील कांचनगौडाचें वतन सोडवून घेण्याचा धोंडाजीचा बेत होता; पण भाऊस कांहीं निकडीच्या कामासाठीं पुण्यास जावें लागलें. त्यामुळें वाघाचा डाव फसला. आणि त्याच्या स्वार्थानें फणा उभारली ! त्यानें पटवर्धनांच्या मुलखांत धामधूम चालविलीं. तें पाहून भाऊचा मुलगा रामचंद्रअप्पा यानें वाघास ठोकून टिपूच्या मुलखांत पिटाळून लाविलें. त्यानें तिकडेहि बदनूर प्रांतांत धुमाकूळ सुरू केला. तेव्हां टिपूनें त्यास कैदखाना दाखविला. टिपू मरेपर्यंत तो त्याच्या कैदेंतच होता. तेथें त्या वहीनें इस्लामी धर्माची दीक्षा घेतली.

टिपूचें राज्य इंग्रजांनीं काबीज केलें. त्या वेळीं श्रीरंगपट्टणांतील सर्व कैद्यांना बंधमुक्त करण्यांत आलें. त्यांत धोंडाजी वाघहि सुटला. लगेच त्यानें बळ बांधलें व साहेबाच्या मुलखांत लुटालूट करून मोप पैका मिळविला.

इंग्रजानें त्याची ही दंडेली पाहून त्याच्यावर चाल केली. इंग्रजांपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून त्यानें १७९९ सालीं पावसाळ्यांत पटवर्धनांच्या मुलुखांत पळ काढला. आतां तो लक्ष्मेश्वरास आला. तेथें बाळकृष्णपंत लागू म्हणून पटवर्धनांचा किल्लेदार होता. त्यानें निरुपायानें त्यास आश्रय दिला; पण याच वेळीं त्याच्या पाठीवर पेशव्यांचा सरदार धोंडोपंत गोखले हा तुंगभद्रेकडून लक्ष्मेश्वराकडे येत होता. त्याच्याशीं बाळकृष्णपंत लागूनें संगनमत करून झालेली चूक सुधारली. दोघांनीं दोहोंकडून एकदम छापा घातला; त्यांत वाघाची फौज नाश पावली. तो दहाबारा स्वारांनिशी जीव घेऊन कोल्हापूर हद्दींत पळून गेला.

मनोळीच्या ठाण्यांत कोल्हापूरचा अंमलदार खंडेराव भोसले म्हणून होता. त्यानें त्यास आश्रय दिला. येथें राहून वाघानें चांगलीच जमवाजमव केली आणि पुन्हा आपल्या उद्योगास जोरकसपणें प्रारंभ केला. त्याला मोकाहि चांगला आला. परशुरामभाऊ पटवर्धन याच वेळीं मारला

गेला. त्यामुळें त्याचा मुलूख लुटून घेण्यास वाघास चांगलेंच फावलें. त्यानें भलताच हात मारला. करवीरकरांशीं मिलाफी होऊन त्यानें आपलें बळ वाढविलें. आतां राजाज्ञाचें व वाघाचें जोड लष्कर रास्त्यांच्या प्रांतांत सैतानी लुटालूट करूं लागलें. त्यांनीं अथणीच्या आसपासचा प्रांत उध्वस्त केला, खंडणी रेटून जमा केली. पण करवीरच्या राजाज्ञानें एकट्यानेंच तिचा ढेकर दिला. त्याबरोबर वाघाचें बिनसलें. तो करवीरकरांशीं फटकून वागूं लागला; पण आतां वाघाचा काल संपुष्टांत आला. त्याला आवळून टाकणाऱ्या शक्ति क्षितिजावर दिसूं लागल्या.

पट्टणकुडीच्या लढाईत परशुरामभाऊ पटवर्धन मारला गेला. त्याच्या कलेवराचा अपमान करण्यांत आला. तेव्हां करवीरकरास नतिजा पोंचविण्यासाठीं त्याच्यावर मोहीम चालूं झाली होती. त्या मोहिमेंत गोखले-पटवर्धनांच्या समशेरी गुंतल्या होत्या, त्यामुळें वाघास पुन्हा रान मोकळें सांपडलें होतें. तो मोकाट सुटलेला होता.

लौकरच करवीरकरांशीं लढाई संपली आणि गोखले–पटवर्धन या जोडीनें वाघाचा समाचार घेण्याचें ठरविलें. प्रथम त्यांनीं वाघानें घेतलेलीं ठाणीं काबीज केलीं आणि गोखले व पटवर्धन यांचीं पथकें पाच्छापूर येथें एकमेकांस सामील झालीं. उभय सरदार पाच्छापुराहून सद्रापूर तालुक्यांतील मुरगोड या ठिकाणीं मुक्कामास आले. याच ठिकाणीं धोंडाजी वाघाचा बंदोबस्त करण्याबद्दलचीं पुणें दरबारचीं फर्मानें त्यास मिळालीं. वाघानें धारवाड, कुसेगल, शिरहट्टी, हावनूर, गजेंद्रगड वगैरे ठाणीं हस्तगत करण्यासाठीं जंगजंग पछाडले, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

जनरल ऑर्थर वेलस्ली टिपूच्या राज्याचा बंदोबस्त करण्यासाठीं आला होता; तो वाघाचा दंगा पाहत होता. त्याला ठिकाणावर बसविण्याच्या विचारांत तो होता, तोंच त्याला वाघाचा बंदोबस्त करण्याबद्दल गव्हर्नर जनरचा हुकूम आला. तेव्हां इंग्रज व मराठे एकत्र होऊन वाघाच्या मोहिमेवर निघाले. कित्तूरास मराठ्यांस मिळावें या हेतूनें इंग्रज पट्टणाहून निघाले

आणि पटवर्धनांच्यापैकी चिंतामणराव पटवर्धन व गोखले सद्रापुराहून इंग्र-जास सामील होण्यासाठीं कित्तुराकडे येऊं लागले. याच वेळीं बापू गोख-ल्याची पत्नी प्रसूत होऊन, मागें मूल ठेवून परलोकवासी झाली होती.

या स्वारीची वार्ता कळतांच वाघ देखील लढाई देण्याच्या इराद्यानें कित्तूरपासून तीन कोसांवरील गदग या ठिकाणीं उतरला.

ही बातमी गोखले व पटवर्धन यांना कळतांच त्यांना कित्तूराला मुक्काम ठेवणें श्रेयस्कर वाटेना. कारण कित्तूर तसें मजबुतीचें ठिकाण होतें; पण तेथें पाण्याची सुबत्ता नव्हती. तेव्हां कित्तूरास शत्रूनें गांठ घातल्यास पाण्यावांचून मरण्याचा प्रसंग येईल असें त्यांस वाटलें. त्यांनीं कित्तूराहून आपला मुक्काम हालविण्याचा विचार चालविला. कित्तूराहून दहा कोसांवर हल्याळ येथें इंग्रजांचें ठाणें होतें आणि दोन पलटणी हि होत्या. तेव्हां तेथें त्याच्याशीं मिलाफ होण्यासाटीं जावें आणि मग उभयतांच्या विचारें वाघाशीं गांठ घालावयाची कां नाहीं याचा विचार करावा, असें त्यांनीं ठरविलें. कारण वाघ या वेळीं फौजबंद होता. अशा स्थितींत एकट्या मराठ्यांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. तेव्हां त्याच रात्रीं चंद्रास्तानंतर गोखले–पटवर्धन आपलें लष्कर घेऊन हल्याळकडे निघाले.

कित्तूर ते हल्याळ हा रस्ता गोखले–पटवर्धनांच्या पायाखालील नव्हता. त्या प्रांतांतील वाटा व चोरवाटा त्यांना माहीत नव्हत्या. म्हणून कित्तूरकर देसायांस त्यांनीं वाटाड्या केला.

आणि हें करण्यांतच त्यांची घोडचूक झाली. कारण देसाई हा त्यांचा दुष्मन होता; मित्रत्वाचें कातडें पांघरून त्यांच्याभोंवती वावरणारा काळसर्प होता तो. त्यानें त्यांच्यावर डूक धरला होता आणि त्याला ही फार नामी संधि आयतीच चालून आली. रात्रीचा फायदा घेऊन भलत्याच मार्गानें या सरदारांस नेण्याचें त्यानें ठरविलें. तो रस्ता साधासीधा नव्हता; तेव्हां सात कोसांचें अंतर कापण्यास त्यास बराच वेळ लागला. कासराभर दिवस आला. आणि हें सैन्य हुनगी गांवाचा एक नाला ओलांडूं लागलें. त्या नाल्यांत 'काला पहाड' ही गोखल्यांची उत्कृष्ट तोफ रुतून बसली. त्याबरो-

वर कित्तूरकर देसायाचें काम झालें. तो या सैन्याच्या हालचालीची वित्तं-बातमी बाघास पुरवीत होताच. आतां तर 'काला पहाड' रुतल्याची वार्ता त्यानें वाघास टाकोटाक पाठविली.

वाघास ही बातमी कळतांच तो एकाद्या चित्त्यासारखा किरणा टाकीत चालून गेला. इकडे गोखल्यांची स्थिति मात्र फारच चमत्कारिक झाली होती. त्यांचें अर्धेअधिक सैन्य पुढे गेलें होतें; तेंहि गाफील होतें. त्रिवर्ग गोखले व पटवर्धन ही खाशी मंडळी ओढ्याच्या कडेला कोंवळ्या उन्हांत पान चघळत गप्पा मारीत बसली होती. बहुतेक सैनिक ती रुतलेली तोफ बाहेर काढण्याच्या कामांत दंग झाले होते. मधूनमधून 'खैचो खैचो'च्या आरोळ्या आसमंतात् घुमत होत्या. वरचेवर खाशांची देखरेख चालूं होती. रुतलेली तोफ गव्हागव्हानें पुढे सरकत होती. सैतिकांच्या योजकतेचा व कष्टांचा ती अंत पाहत होती.

अशा स्थितींत वाघ आल्याची आवई उठली. आवईच्या पाठोपाठ घोड्यांच्या टापा टपटपूं लागल्या. पडघमांचे आवाज झणाणूं लागले. करोल एक हजार पठाणांनिशी वाघाची झेंप बघतांबघतां अंगावर कोसळली. गोखले-पटवर्धनांचे बेसावध लोक खाशांसुद्धा किंचित् काळ स्तिमित झाले. आश्चर्याचा झटका निमिषार्धात् उतरला, प्राणांतिक प्रसंगाची जाणीव झाली. त्यास तितक्या हिरीरीनें भिडण्यासाठीं खासे वीर स्वार झाले. गोखले-पटवर्धनांनीं वाघाशीं गांठ घातली; त्यांचें शौर्य जोरानें उफाळून बाहेर पडलें. विशेषतः बापू गोखले व चिंतामणराव पटवर्धन यांनीं बहुत शर्थीनें वाघावर चाल केली. जोराची खणाखणी झाली. एवढ्या तयारीनें आलेला वाघ गांगरला, किंचित् ढिला पडला.

इतक्यांत दैवानें पलट खाल्ली. बापू गोखले व पटवर्धन या उभयतांस तोंडावर जखमा झाल्या. त्यांतल्यात्यांत बापूस जरा जास्त मार लागला. त्याचें नाक लोंबकाळूं लागलें. तरी उभय वीरांस त्याची धांग नव्हती. ते शत्रूवर तुटून पडत होते. आणि त्याचा खराबा करण्याचा त्यांचा सपाटा चालूं होता. बापू गोखल्याचा थोरला भाऊ अप्पा व त्याचा चुलता धोंडोपंत दादा यांच्या लक्षांत ती गोष्ट येतांच त्यांनीं बापूला मोठ्या शिताफीनें त्या

भाऊगर्दींतून बाहेर काढलें व तो 'नको नको' म्हणत असतां त्यास मोठ्या तर्जावजीनें तळावर पाठविलें. नंतर' धोंडोपंतदादा व अप्पा यांनीं छातीचा कोट करून शत्रूची फळी फोडून जाण्याचा कृत निश्चय केला. पुन्हां महा-बळी बजरंगाच्या नांवानें जयजयकार करून शत्रूवर तुफान ताकतीनें त्यांनीं धडक घेतली. आतां त्यांच्या मनगटांत सहस्त्र रेड्यांचें बळ अवतीर्ण झालें. चुलत्या-पुतण्यांचे हात विद्युल्लतेच्या चापल्यानें फिरूं लागले. धोंडोपंतदादा तर तडाक्याबरोबर फळी फोडून पार झाला. त्याच्या पाठोपाठ अप्पाहि निसटला.

पण दुर्दैवाला हें पाहवलें नाहीं. धोंडोपंताचा घोडा भरधांव सुटला होता, तें ठिकाण पेंचकटांचें होतें. भोंवताली घनदाट झाडी होती. झाड-झाडोरा आडवातिडवा पडला होता. व नागमोडी वळणानें निसटून जाव-याचें होतें. घोडा आपल्या धोरणानें चालला होता; पण त्याचा कयास चुकला, धोंडोपंतासहि तितकें अवधान राहिलें नाहीं. एका झाडाचें आडवें फांदाट धोंडोपंतांच्या छाताडास लागलें. या प्राणघातकी वृक्षानें मात्र धोंडोपंताचा वंश-वृक्ष अर्धाअधिक छाटला ! राहिलेली आहुती गोपाळ अष्टयानें पूर्ण केली. गोखले घराणें स्वराज्यापायीं कत्तल झालें. त्या फांदीच्या धक्क्यानें धोंडोपंत खालीं जमिनीवर फेंकला गेला. धोंडोपंताला अशी वेडीवांकडी आपटी बसलेली पाहतांच घोडा फिरवून अप्पादेखील त्या ठिकाणीं दाखल झाला. त्यानें त्याच्याभोंवतीं कडें केलें आणि संर-क्षणाची शर्थ चालविली. चुलता 'चालता हो' म्हणत असतांहि त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. तो त्या ठिकाणीं छातीठोक उभा राहिला; आणि त्यानें चलाखी चालविली. अप्पासाहेबास भयंकर त्वेष चढला होता. शत्रूचा निःपात करण्यापलीकडे त्याला कांहीं एक दिसत नव्हतें. आता तो हालू लागला त्याच्या तलवारीवर दृष्टि ठरेना जणू कृष्णाचें सुदर्शन गिरक्या घेत होतें.

त्या ठिकाणीं गर्दी उसळली. वाघाचे पठाण व गोखल्यांचे खातर-जमेचे मराठे एकमेकांस भिडले. जोराची कचाकची झाली. 'अपपर भावे दृष्टि मिटली. सफाई तलवार कापत सुटली' रक्ताचीं कारंजीं फुटलीं. नुसते

फुटाणे फटाटले, अप्पाचा वो अचाट पराक्रम पाहून वाघ चकित झाला. " शस्त्र खालीं ठेव म्हणजे जिवें सोडतो " असें तो ओरडला; पण त्याचा



अप्पाचा तो अचाट पराक्रम पाहून वाघ चकित झाला नि ओरडला, " शस्त्र खालीं ठेव म्हणजे जिवें सोडतों. "

कांहींएक ऊपयोग झाला नाहीं. तेव्हां प्रलय टाळण्यासाठीं वाघानें आपल्या पठाणास बंदूक चालविण्यास फर्माविलें. बंदुकीचा आवाज होतांच अप्पासाहेबाचा प्राण दुनियेपार झाला. नखशिखान्त रक्तानें नाहलेला वीर धरणीवर कोसळला. ग्रंथ आटोपला ! चुलते–पुतणे एकठाय वीराच्या मरणानें मेले. त्यांचें सोनें झालें. अरत्रीं परत्रीं ते धन्य झाले उभयतांचीं शिरें कापण्यांत आलीं. अप्पाचें मुंडकें झाडास टागण्यांत आलें. धोंडोपंताचें मस्तक धोंडोजी वाघानें बरोबर नेलें उभयतांचीं धडें त्याच ठिकाणीं टाकण्यांत आलीं.

वाघाच्या अचानक हल्ल्यानें गोखले अवसुती मारले गेलें. बिनमोल हिरे हरपले. बापू पोरका झाला; पण तो असल्या घनघोर प्रसंगांतून उजळून निघाला.

आतां चितां रचण्यांत आल्या. त्यांच्यावर उन्नतांचीं कलेवरें ठेवण्यांत आलीं. अप्पाचें डोकें धडास चिकटविलें. धोंडोपंताच्या शिराच्या ठिकाणीं नारळ ठेवण्यांत आला. चिता रचण्याचें काम पूर्ण झालें. त्यांना भडाग्नि देण्यांत आला. चिता धडाडल्या. अप्पाची बायको सती गेली. आगीचे लोळ पार अस्मानापर्यंत गेले. रुग्णशय्येवर बापू पडून होता. त्याच्या शरिरास व मनास भयंकर जखम झाली होती. त्याला तें भेसूर दृश्य दिसत होतें. त्याचें मस्तक सूडाच्या भावनेनें भणाणत होतें. त्यानें त्या धगधगत्या चितांना साक्ष ठेवून वाघाचा निःपात करण्याची प्रतिज्ञा केली. आतां त्याला जळीं, स्थळीं, काष्ठी, पाषाणीं वाघच दिसत होता. जखमा बऱ्या होतांच तो वाघाच्या पाठीवर निघाला. इंग्रज सेनापति वेलस्लीहि त्यास सामील झाला. त्या दोघांनीं आपला कार्यभाग अवघ्या दोनतीन महिन्यांच्या अवधींत तडीस नेला.

वाघहि कांहीं कमी नव्हता. त्याचें मस्तक इंग्रज बहाद्दुराच्या दरबारीं दाखल करणाऱ्यास एक हजार रुपयांचें पारितोषिक साहेबानें जाहीर केलें होतें. शत्रूकडे त्याची प्रतिष्ठा प्रत्यक्षांत इतकी होती. गोखल्यांची राळ उडविल्यानें वाघाचा दबदबा वाढला. त्याच्याभोंवतीं दहा हजार लष्कर जमा झालें. पण बेटकुळी तटाटून फुगली तरी किती फुगणार ? मराठे व इंग्रज यांच्यापुढें तो तोटकाच पडला. शिवाय त्याच्या विश्वासघातकी वागणुकीनें निपाणकर देसाई वगैरे लोक तुटले. इंग्रज व मराठ्यांनीं डोळे वटारलेले पाहतांच करवीरकरांनीं वाघाचा नाद सोडला व सलोख्याची भाषा चालविली. तारीख ६ ऑगस्ट १८०० रोजीं वाघ खानापुराजवळ मलप्रभा उतरून अलीकडे येणार होता; पण इंग्रज व मराठे पाठीवर आहेत असें पाहतांच त्यानें झुकांडी दिली. मलप्रभेच्या उगमस्थानीं नदी ओलांडून सामानगडच्या रोखें शहापूरनजीक तो निघून गेला. आतां गनिमी काव्यानें धुमाकूळ घालण्यास वाघानें प्रारंभ केला; त्यामुळें पाठलाग करणारे टेकीस

आले व मसलत लांवण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां गोखले व वेलस्लीनें या दोघांनीं सर्वांच्या विचारानें अचूक पाठलागाची योजना आंखली.

वाघाचें दहा हजार लष्कर होतें, तर इंग्रज-मराठ्यांचें पंचवीस हजार होतें. अशा विषम स्थितींत हा पाठशिवीचा खेळ चालूं होता. आतां एकंदर फौजेचे तीन भाग करण्यांत आले. तिघांनीं समांतर रेषेनें एकमेकांत पांच कोसांचें अंतर ठेवून व परस्परांशीं संधान राखून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाघास चेपीत नेण्याचें ठरलें. मराठ्यांची ही व्यवस्था वाघास कळली. त्याबरोबर त्यानें मलप्रभेचा कांठ सोडला. तो कृष्णा-तुंगभद्रेच्या दरम्यान पूर्वेकडे रायचूरच्या दुआबांत शिरला, तरी त्याच्या पाठीवरची चिमूट कायम होती; ती ढिली पडली नाहीं. त्यामुळें झुकांड्या देऊन प्रतिस्पर्ध्यास जेर करणें अशक्य झालें. त्याची इतिश्री झाली !

मलप्रभेच्या उगमाकडून गोकाक परगण्यांत नदीपार होण्यासाठीं वाघ आपल्या फौजेनिशी दाखल झाला; पण पाठीवरील फौजांची दाटी पाहून वाघ सडा झाला व सहा हजार फौजेनिशी गोखले-पटवर्धनांच्या टोळीवर छापा घालण्यासाठीं तो भन्नूर येथें आला. पण त्याला माहीत नव्हतें, कीं तो त्याच्या मृत्यु-स्थानीं दाखल झाला होता. या ठिकाणीं तो नऊ तारखेस आला आणि दहा तारखेस बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडला ! वाघानें सर्व टोळ्यांची बातमी नीट ठेविली होती. या ठिकाणीं त्याच्या सैन्यांत दंगा झाला, त्यामुळें त्यास शत्रूची बातमी लागली तरी झट्कन् जातां येईना. ही गोष्ट मराठे—इंग्रजांस कळली. तेव्हां त्यांनीं झपाट्यानें अंतर कापून वाघाच्या मुक्कामापासून सहा मैलांच्या अंतरावर आपला मुक्काम टाकला. रात्रींतून वाघ सटकेल कीं काय या विचारानें बापू गोखले व वेलस्ली बेचैन होते. रात्र संपली आणि तांबडें फुटतांच बापू व वेलस्ली तयार झाले; त्यांनीं ताड्कन् वाघास गांठले. सावज काबूंत आलें. आतां फक्त इशारतीबरोबर हमला चढविणेंच बाकी राहिलें.

आतां वाघ पुरा गुंतला. त्याच्या लोकांनीं पैशाकरितां धरणें धरलें. फौजेंत फितुरी झाली. मराठे व इंग्रजांनीं पैसे चारून वाघाच्या लष्करांतील

मुखंड फोडले. त्यामुळें शेवटच्या प्रसंगीं त्याच्याजवळ हजारपांचशें लोकच राहिले. बाकीचे झाडून सारे निघून गेले. ता. १०-९-१८०० रोजीं सूर्योदयाबरोबर मराठे व इंग्रज वाघास भिडले. वाघहि तयार होऊन लढाईस उभा राहिला. वाघास पाहतांच बापू बेभान झाला. त्याच्या अंगांत त्वेष सळसळूं लागला. खणाखणी बेताचीच झाली. तीन गोळ्या झाडण्यांत आल्या. त्यानें वाघ ठार झाला. त्याची फौज उधळून गेली. सहाशेंपर्यंत लोकांची कत्तल झाली.

वाघाचा मुडदा ओळखून घोड्यावर घालण्यांत आला. तो मुडदा पाहून बापू गोखल्यास आनंद झाला. वेलस्लीनें वाघाच्या मिशा कापून घेतल्या. गोखल्याचा दुष्मन् मारला गेला; खेळ खलास झाला. काळाचा पडदा पडला !

# कुलस्वामिनी : ४

सातारचे छत्रपति श्रीमंत प्रतापसिंह महाराज यांची सातारच्या गादीवरून मुंबईच्या गव्हर्नरांच्या हुकमावरून दि. ५ सप्टेंबर १८३९ रोजीं उचलबांगडी करण्यांत आली, व त्यांस कैद करण्यांत आलें आणि त्यांचा धाकटा भाऊ आप्पासाहेब याला गादी वर बसविल्याबद्दलची द्वाही सातारचा रेसिडेंट कर्नल ओव्हान्सनें सातारा शहरभर फिरविली.

खुद्द प्रतापसिंह महाराज व त्यांचे सेनापति बाळासाहेब हे ४ सप्टेंबरला रात्रीं झोंपीं गेले ते ५ तारखेस निजून उठण्यापूर्वींच चार साडेचार वाजण्याच्या सुमारास इंग्रजी फौजेच्या स्वाधीन झाले. इंग्रजांनीं वाड्यास गराडा देऊन महाराजांस व सेनापतीस ते झोंपले असतां पकडून कैद केले व त्यांना पुढें काशीस नेत असतां सेनापति बाळासाहेब

मार्गांतच स्वर्गवासी झाले. त्यांच्या गरोदर पत्नीवर रस्त्याच्या कडेला बाळंत होण्याचा प्रसंग कसा आला व त्यांच्याबरोबर बंदोबस्ताला असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यानें कसा निष्ठुरपणा दाखविला यां करुण प्रसंगाचा परिचय या कथेवरून होईल.

'राजा वैऱ्याची रात्र आहे, जागा रहा;' 'राजा वैऱ्याची रात्र आहे, जागा रहा;' 'राजा वैऱ्याची रात्र आहे, जागा रहा.'

असा त्रिवार नाद झाला. भोसल्यांची कुलस्वामिनी अंतर्धान पावली. या इशारतीकडे लक्ष न देणाऱ्या राजराजेश्वराची गर्दन मानभावी शत्रूच्या सरकफांसांत सांपडून त्यांत त्याचा अन्त झाला. त्यांस त्या भयाण मृत्यूच्या यमयातना सतत अकरा वर्षे भोगाव्या लागल्या. कोण प्रसंग ते ! तेजोभंग, अपमान, निराशा, दारिद्रय, कारावास, जिवाचा कोंडमारा करणाऱ्या त्या तापत्रयांतून त्यांची सुटका फक्त एका मृत्यूनेंच केली. इतरांची पुण्याई तोटकी पडली. सातारकर छत्रपति प्रतापसिंहमहाराजांचा राजबिंडा देह झिजून झिजून मृत्यूच्या कराल जबड्यांत नाहींसा झाला. कणाकणांनीं आणि क्षणा क्षणांनीं शत्रूनीं त्याचा ग्रास केला.

हो, ना करतां करतां, ती भयाण रात्र उजाडली. त्या रात्रीं त्या शाहू-नगरीचें वातावरण भेसूर झालें होतें. त्या भेसूरतेनें ते भेसूर सूर अवघ्या शहरभर घुमत होते. मुंगीनें मुंगीला कानांत सांगावें त्याप्रमाणें चाललें होतें. ज्यानें त्यानें एकमेकांच्या कानांत कुजबुजावें आणि सुन्न चेहऱ्यानें पुढें जावें. असा प्रकार चालू होता. त्या अमंगल प्रसंगाची अवकळा शहरावर पसरली होती. अशा स्थितींत त्या काळरात्रीनें शाहूनगरीवर काळा पडदा टाकिला. नागरिक झोपीं गेले. राजराजेश्वरहि आपल्या महालांत झोंपला होता. काळ्याकभिन्न अंधःकाराचें अधिराज्य चालू होतें. रात्रीं बाराचे ठोके पडले. मध्यरात्र उलटली आणि आपल्या महालांत मंचकावर पहुडलेले प्रतापसिंह महाराज या कुशीचे त्या कुशीवर झाले. आणि त्यांच्या दृष्टीसमोर एक चित्रपट तरळूं लागलाः—

चौफेर लढाईच्या आगीनें चेतलेलें तें गोपाळ अष्टीचें रणमैदान झळाळूं लागलें. बापू गोखल्यांची ती भव्य मूर्ति ‘ आपला हुकूम असो वा नसो मी रणसन्मुख होणार ’ असें रावबाजीस बजावून लढाईस निघून गेली. पाठपुराव्यास अप्पा निपाणकर गेला नाहीं. इंग्रज चालून येतांच गोखल्यांच्या फौजेंतून मुधोळकर, गोविंदराव घोरपडे आणि बहीरजी शितोळे चालून गेले. सपाट्याबरोबर गोखले मारत सुटले. त्यासरशी इंग्रजांची पहिली तुकडी हटली. त्याबरोबर दुसऱ्या तुकडीनें चाल केली. जनरल स्मिथ व गोखले एकमेकांस भिडले. गोखल्यांस गोळी लागली. घोडा मोकळा झाला. गोखले गर्दींत मिसळून घोड्यांच्या टापांखालीं तुडविले गेले.

सेनापति नाहींसा होतांच मराठ्यांचें सैन्य चिडून इंग्रजांवर तुटून पडलें. वीरश्रीचा संचार झाला. तोफांची सरबत्ति, टापांचा थयथयाट आणि तलवारींचा खणखणाट यांनीं सर्व रणांगण झणाणूं लागलें. गगन कोसळून खालीं पडतें कीं काय असें वाटलें. धुराच्या अलोट लाटांनीं आकाश कोंदून गेलें, उभय सैन्यें प्राणपणानें लढलीं. रणचंडीनें उग्र स्वरूप धारण केलें. अशा वेळीं पंचप्राणांची तमा न करतां पेशव्यांचें सैन्य निकराच्या हालचाली करीत होतें. त्यास अपयशाचे रट्टे बसत होते. आणि विविक्षित तऱ्हेची पळापळ चालू होती. अशा स्थितींत आपला भाऊ अप्पासाहेब, मातोश्री माईसाहेब आणि बलवंत मल्हार चिटणीस असे आम्ही सर्व मागें रेंगाळूं लागलों. ही गोष्ट रावबाजीच्या लक्षांत येतांच त्यानें आम्हांस जलदी करण्याबद्दल सरदार शामराव रास्ते यांच्या हस्तें निरोप धाडला. तोंच इंग्रजांचा जोराचा हल्ला आला. त्याबरोबर कत्तल उडाली. बरींच माणसें कामास आलीं. या धुमश्चक्रींत एक गोळी सणकन् आली ती आपणासच लागणार होती. पण दैवानें खैर केली. गोळी रिकीब फोडून पार झाली. सभोंवार चाललेलें कालिकाळाचें तांडव नृत्य पाहून आपण घाबरलों. आतां मौत चुकत नाहीं ’ असे उद्‌गार आपल्या मुखावाटें न कळत बाहेर पडले. ते मातोश्रींच्या कानीं जातांच त्या म्हणाल्या : प्रतापसिंहा, तूं क्षत्रियाचा बच्चा आहेस; मृत्यूनें तुम्हांवर झडप घातली तर त्यांत उजू आहे. पण

आम्हांस प्राणांपेक्षां अब्रूची किंमत फार, तेव्हां हातांतील तळपत्या समशेरीनें आमची गर्दन मारा व मोकळे व्हा. त्यांत मातृहत्येचें पातक नाहीं. क्षत्रियांचें तें पवित्र कर्तव्य आहे. आतां त्या बेभान स्थितींत आपण मासाहेबांवर वार करणार तोंच आपल्या हातांतील समशेर बलवंत मल्हारकडून हिसकली जाऊन फेंकून देण्यांत आली. क्षत्रियानें तलवार फेंकूं नये, रणाला पाठ दाखवूं नये, विश्वासघातानें शत्रूला मिळूं नये, असें मनाची पा कुचकुचली तरी पण आपण त्याची दखल घेतली नाहीं. आपण शत्रूला सामील झालों.

आतां बापू गोखल्याचा मुडदा दिसूं लागला. तों त्यांच्या देहाची दशा उडाली होती. अंगांत फाटका मलमलीचा अंगरखाच काय तो शिल्लक होता. घोड्यांच्या टापांनीं अंगाचें कातडें सोललें होतें. ठिकठिकाणीं लचके उडाले होते. दोन जबर जखमा झाल्या होत्या. एकीनें डोळा उडाला होता व दुसरीनें पायाचें ढोंपर निकालांत काढिलें होते. बापू गोखल्यांचें तें भेसूर कलेवर चितेवर ठेवण्यांत आलें. अग्नि दिला त्याबरोबर चिता धडाडली. बापूंचा देह भस्मसात् होऊं लागला. मस्तकाचा ताडकन् आवाज झाला. कवटी फुटली. त्याबरोबर सर्व शरीर शहारलें. आतां दुसरें दृश्य दिसूं लागलें. फेंकून देण्यांत आलेली ती समशेर संजीवित झाली आणि रणांगणावर ताठची ताठ खडी होऊन गगनांत फिरूं लागली, तिचें तें दिव्य तेज क्षणाक्षणाला दैदीप्यमान होत होतें. त्या दैवी तेजावर दृष्टि ठरत नव्हती. बघतां बघतां त्या समशेरीचें रूपांतर होऊन ती भवानी मातेच्या स्वरूपांत तळपूं लागली. आदिमाता संतापानें लाल झाली. 'राजा वैऱ्याची रात्र आहे, जागा रहा' हा खडा बोल त्रिवार उच्चारून ती अन्तर्धान पावली. तें दिव्यरूप नाहींसें हातांचे अंतःकरणास भयंकर हबका बसला. तटकन् प्राण जातात कीं काय असें वाटलें. पण मरणास सवड नव्हती. लगेच बापू गोखल्यांचा निकाल लावणाऱ्या जनरल स्मिथनें टोपी काढून आपलें स्वागत केलें. मुजरे झाले. साहेब म्हणाला, 'महाराज, कुच डरना नहि, कुच फिकीर करना नहि. सातारा तुमारा है, और गादी तुमारी है' असें बोलून साहेबानें दिल दिलासा दिला. त्याबरोबर आपणांस मूठभर

मास चढलें. ‘आहा! छत्रपतींना शोभेल, असा जिरेटोप आपल्या मस्तकीं झळाळणार आणि पेशव्यांच्या सर्व मुलखाचे आपण धनी होणार, तेव्हां केवढें भाग्य आपलें!’ असे मनाचे मांडे चालू झाले. तोंच साहेबाच्या सैनिकांनीं आमचा भगवा झेंडा उभा केला, सैन्य झेंड्याभोवतीं मंडलाकार खडें करण्यांत आलें. आम्ही बादशाही थाटांत त्याठिकाणीं दाखल होतांच खडी ताजीम देण्यांत आली. झेंड्याची पूजा झाली. खुशीच्या तोफा उडाल्या. तलवारीचे मुजरे झाले. समारंभ संपला आणि लोक पांगूं लागले. तोंच ‘पुंड पेशवा पळाला. सातारकर छत्रपतींचा जय झाला’ असा पुकारा झाला. पण त्याचा प्रतिध्वनि मात्र निराळाच आला. ‘मराठ्यांचें राज्य संपलें. कंपनी सरकार सर झालें.’ या विलक्षण प्रकारानें भयभीत होऊन आपण साहेबाकडे पाहूं लागलों तों खरोखरच साहेब लोक सर्वत्र सम्राटाच्या थाटांत आणि बादशाही सत्तेंत वावरूं लागले व आपल्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला खळखळूं लागल्या. त्या आवाजानें महाराजांचा स्वप्नभंग झाला. त्यांस जाग आली. पण ती किंचित् काल टिकली. ते दुःखानें विव्हळले. या कुशीचे त्या कुशीवर झाले. पुन्हां घोरूं लागले. मग ती गाढ निद्रा होती कां दुःखाची ग्लानि होती न कळे.

• • •

कंपनी सरकारच्या दृष्टीनें सातारकर छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा घडा भरला. व त्यांना ५ सप्टेंबर १८३९ ला गिरफदार करण्याचा हुकूम झाला. त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं पुण्याहून फौजा निघाल्या. ४१ व्या पलटणीची एक तुकडी, २१ नंबरच्या पायदळाच्या दोन तुकड्या व २५ नंबरच्या पायदळाच्या तीन तुकड्या अशा एकंदर सहा तुकड्याना पुण्याहून साताऱ्यास कूच करण्याचा हुकूम झाला त्याप्रमाणें दि. ३१ ऑगस्ट १८३९ रोजीं हें लष्कर निघालें. व दि. ४ सप्टेंबर रोजीं साताऱ्यास दाखल झालें. दि. ४ ला रात्रीं म्हणजे उजाडत्या पांच तारखेस पहांटे दोन वाजतां हे शिपाई लोक परेडीला उभे राहिले. पंचविसाव्या पलटणींतील ब्रिगेडियर, घोडे, शिपाई व तोफखान्यांतील शिपाई लोकांसह राजवाड्याकडे धाडण्यांत आले. एकवीस नंबरच्या शिपायांना प्रतापसिंह

महाराजांचें सेनापति बाळासाहेब यांच्याकडे, व अदालतीकडे पाठविण्यांत आलें. सेनापतीचे घोडेस्वार कांहीं गडबड करतील असें वाटत होतें. पण तसें कांहीं झालें नाहीं. सेनापति बाळासाहेब आपल्या वाड्यांतच नव्हता. तेव्हां या लष्कराचा मोर्चा राजवाड्याकडे वळाविण्यांत आला. राजवाड्याच्या दरवाज्याशेजारी हे शिपाई एका ... उमे करण्यांत आले. यावेळीं चांगली पहाट झाली होती. तांबडें फुटलें होतें. आतां सर्व गडबड उडाली. नोकर लोक हातांत कंदील घेऊन इकडे तिकडे पळत सुटले. राजानें पळून जाऊं नये म्हणून त्या वेळचा सातारचा रेसिडेंट कर्नल ओव्हान्स यानें पूर्ण खबरदारी घेतली होती. रेसिडेंट कर्नल ओव्हान्स. व दुसरा एक लष्करी अधिकारी, आणि प्रतापसिंह महाराजांच्या पाठीवर पाय देऊन आलेला, आणि आतां पोटावर पाय देण्यास सिद्ध झालेला त्यांचा सख्खा भाऊ अप्पासाहेब हे तिघेजण वाड्यांत शिरले. प्रतापसिंह महाराजांचें शयनमंदिर अप्पासाहेबानें त्यांस दाखविलें. ओव्हान्सला आनंद झाला. बिचारा प्रतापसिंह शयनमंदिरांत मंचकावर झोपीं गेला होता. त्यांस ही अशुभ स्वप्नें पडत होतीं पण त्यास त्याच्या गळ्याभोंवतीं पडलेल्या या फांसेपारध्यांच्या फांसाची यत्किंचित हे कल्पना नव्हती. ती शत्रूची पहांट होती. तें त्यांस माहीत नव्हतें.

बाहेर गडबड चालू होती. ती जरा जास्त प्रमाणांत ऐकूं येऊं लागल्यामुळें प्रतापसिंह महाराज खडबडून जागे झाले. काय गडबड आहे म्हणून पाहण्याकरितां एक शाल अंगावर टाकून ते डोळे चोळीत बाहेर आले. आणि जरा किलकिल्या नजरेनें पाहूं लागले तों तापलेल्या तेलाप्रमाणें जळत जाणारें पुढील शब्द त्यांच्या कानांत शिरले. ‘तुला गिरफदार करण्यांत आले आहे तूं आमचा कैदी आहेस !’ हे शब्द ऐकून बिचारा चमत्कारिक स्थितींत आश्चर्यानें पाहूं लागला तों चारी बाजूंनीं शिपायांनीं संगिनीं रोंखलेल्या त्यांस दिसल्या. त्या पाहून त्यांच्या मनाची काय अवस्था झाली असेल कोण जाणें ! इतक्यांत महाराजांस सांगण्यांत आलें कीं, कोणत्याही प्रकारची गडबड न करतां तुम्ही आमच्या स्वाधीन व्हा. यत्किंचित् खळखळ कराल तर तुमची खाजगी मालमत्ता जप्त करण्यांत

येईल. हा सर्व प्रकार चालू असतां सातारचे महाराज आश्चर्यचकित होऊन स्तब्ध उभे होते. ते लगेच कंपनी सरकारच्या स्वाधीन झाले. दुसऱ्या ठिकाणीं सेनापति बाळासाहेब निजला होता त्यासहि पकडून आणण्यांत आलें; एक पालखी तयार होती. तिच्यांतच त्या दोघांस कोंबून बसविण्यांत आलें. पालखी राजवे[illegible] बाहेर काढण्यांत आली. पण प्रतापसिंह महाराजांच्या शेजारीं मांडीस मांडी लावून बसण्यानें प्रतापसिंह महाराजांचा अपमान होत आहे ही गोष्ट सेनापतीच्या लक्षांत येतांच त्यानें पालखींतून खालीं उडी टाकिली. तो पायीं सात साडेसात मैल अनवाणी स्थितींत चालत गेला.

'बाजीरावाचा पराभव करून त्याच्या ताब्यांतील सर्व राज्य तुमच्या हवालीं करूं.' म्हणून गोड गोड थापा मारणाऱ्या साहेबानें सातारकर छत्रपतींचा पुरा उपयोग करून घेतला, आणि रावबाजीची पूर्णपणें वासलात लावल्यानंतर अवघ्या वीस वर्षांच्या आंत सातारकर छत्रपतींची दुर्दशा केली. त्यांस कैद केलें. हा अधमपणा तर खराच, पण सख्ख्या वडील भावास कैद करण्यासाठीं म्हणून दाखल झालेल्या कर्नल ओव्हान्सला वाड्यांतील महाराजांचें शयनमंदिर व इतर चोर वाटा दाखविण्यास सज्ज झालेल्या अप्पासाहेबाच्या स्वार्थी अंतःकरणाची कल्पनाच करवत नाहीं. कर्नल ओव्हान्स व अप्पासाहेब या दोघांनीं मिळून छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा कांटा काढिला. लगेच त्याच दिवशीं दुपारीं अप्पासाहेबास गादीवर बसविल्याची ग्वाही सातारा शहरभर फिरविण्यांत आली.

गादीवरून पदच्युत केल्यानंतर महाराजांस साताऱ्यापासून पांच सात मैलांवर असणाऱ्या लिंब गांवीं एका गोठ्यांत कांहीं दिवस ठेवण्यांत आलें. तेथून त्यांची इंग्रजांच्या शिरस्त्याप्रमाणें काशीस रवानगी करण्यांत आली. सातारकरांचा हा काशीचा प्रवास म्हणजे एक अत्यंत खेदजनक प्रकार आहे. महाराजांच्या बरोबर काशीस जाणाऱ्या मंडळींत प्रमुख गृहस्थ म्हणजे सेनापति बाळासाहेब, त्याची इंग्रजानें धिंड काढली. त्याचा गुन्हा एकच; तो म्हणजे तो सातारकरांचा विश्वासू सेनापति होता. या एका गुन्ह्यासाठीं

त्यास हद्दपारीची शिक्षा सुनावण्यांत आली होती. धन्याबरोबर पडतील ते कष्ट करण्याची त्याची तयारी होती. पण सेनापतीचा इतमाम व डामडौल नाहींसा होऊन कारागृहांत दिवस कंठण्याचा प्रसंग येतांच बिचाऱ्यास जबरदस्त धक्का बसला. त्याची शरीरप्रकृति खालावली. त्यास चैन पडेनासें झालें. प्रवासांत त्याच्याबरोबर त्याची पत्नी होती. ती आसन्नप्रसवा होती. अशी एकंदर करुणास्पद स्थिति असतांसुद्धां ही मंडळी जिवाच्या करारावर मजल दरमजल करीत काशीकडे कूच करीत होती. काशी चार-दोन मुक्कामांवर असेल नसेल तोंच आधींच खालावलेल्या प्रकृतींत एवढा मोठा लांब पल्ल्याचा प्रवास करावा लागल्यानें बाळासाहेबाची प्रकृति फारच बिघडली; फारच क्षीण झाली.

सातारचे महाराज व त्यांची मंडळी यांना काशीस नेऊन पोहोंचविण्याचें काम लेफ्टनंट क्रिस्टॉल याकडे होतें. क्रिस्टॉल हा फक्त आकार-सादृश्यानें मनुष्य होता इतकेंच. त्याची मनःप्रवृत्ति सैतानासहि लाजविणारी होती.

सेनापतींची प्रकृति नादुरुस्त असल्याकारणानें राजघराण्यांतील मंडळींनीं ले. क्रिस्टॉलला सेनापतींच्या प्रकृतीला आराम पडेपर्यंत मुक्काम चार दिवस वाढवावा, म्हणजे आमच्यावर फार मोठे उपकार होतील, सेनापतींच्या प्रकृतीला आराम पडतांच पुढील प्रवासास निघण्याची आमची तयारी आहे, अशी विनवणी केली; पण ती अमान्य करण्यांत आली. सेनापति आजारी नसून उगाचच ढोंग करीत आहे असें क्रिस्टॉलला वाटलें. त्यानें सातारकर मंडळींचें म्हणणें मानलें नाहीं. सर्व मंडळींना कूच करण्याचा हुकूम दिला. प्रवासास निघण्याच्या तयारीनें क्रिस्टॉल आला, तों सातारकर मंडळी जरा धांदलींत व खिन्न दिसली. सेनापतींच्या राहुटीशी धांदल आढळून आली. मंडळी क्रिस्टॉलला सांगूं लागली कीं, सेनापतींची प्रकृति फारच बिघडली आहे. जरा काळजीच वाटते. त्यांना जागचें हालवतसुद्धां नाहीं; तरी प्रवास थांबवावा. पण या विनंतीचा क्रिस्टॉलच्या मनावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. ही मंडळी कूच करतांना नेहमींच खळखळ करतात. तेव्हां त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां त्यांना तसेंच

रखडत नेलें पाहिजे. या लष्करी वृत्तीच्या उद्दाम विचारानें त्यानें सातारकर मंडळींचें म्हणणें पार फेटाळून लाविलें. तंबू-राहुट्या पुढील मुक्कामास पाठवून दिल्या. सेनापति बाळासाहेबांस मोठ्या कष्टानें अदबशीरपणें उचलून पालखींत अगदीं अलगत ठेविण्यांत आलें. त्यांस गुरफटून पांघरूण घालून मंडळी पुढील प्रवासास ... या जड अंतःकरणानें निघाली. पुढील मुक्कामाला येऊन थांबली, ... सेनापतींस मोठ्या हळुवारपणानें उचलून नेऊन ठेवण्यासाठीं म्हणून पाहतात– तों सेनापतींचें प्राणोत्क्रमण झालेलें ! वाटेंत केव्हां आणि कसा प्राण निघून गेला याची कोणास कल्पनासुद्धां आली नाहीं. या बातमीनें सातारकर मंडळींत जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. आधींच वनवासांत असणाऱ्या महाराजमंडळीवर ही जणुं आकाशींची कुऱ्हाडच कोसळली. सर्वांचीं अंतःकरणें दुःखातिशयानें भडभडून आलीं. मराठ्यांचा सेनापति कुत्र्याच्या मोतीनें मेला !

ही कहाणी येथें संपली नाहीं. त्या क्रिस्टॉलचा नीचपणा याच्याहि पुढें आहे. आपल्या उद्दाम वृत्तीस सेनापतीचा बळी दिल्यानंतर तरी या सैतानाचा तळीराम थंड व्हावयास पाहिजे होता; पण एकदां नरमांसाची चटक लागली म्हणजे हिंस्र श्वापदांची ती भूक तृप्त न होतां एकसारखी वाढतच जाते. त्याप्रमाणें ले. क्रिस्टॉलच्या दुष्ट वृत्तीचा पारा चढत चालला. सेनापतींच्या आसन्नप्रसवा विधवा स्त्रीस प्रसूतिवेदना होऊं लागल्या, तेव्हां जरा आडोशाच्या ठिकाणीं प्रसूत होऊन बाळंतिणीस आराम पडेतों प्रवास थांबविण्याबद्दल खुद्द महाराजांनीं काकुळतीनें विनंति केली. पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. क्रिस्टॉलनें थांबण्याचें साफ नाकारलें. मंडळींची तशीच खरड काढिली. त्यांना विश्रांति घेऊंच दिली नाहीं. सेनापतींची स्त्री प्रसूत होऊं लागली. तरी त्या चांडाळानें मुक्कामाला थांबण्याचें नाकारलें ! रस्ता चालतांनाच रस्त्याच्या बाजूस खानदेशांत सांगवी येथें बिचारी बाळंतीण झाली. कोण दुर्धर प्रसंग हा! सातारकर छत्रपतींच्या सेनापतींची ती भार्या– पण आज तिची सर्व सत्ता व वैभव लयास जाऊन बिचारीवर रस्त्याच्या बाजूस एकाद्या कैकाडणीप्रमाणें प्रसूत होण्याचा प्रसंग

यावा ! यापेक्षां निर्घृण दैवाचा दुर्विलास तो कोणता ! प्रस्तुत प्रसंग इंग्रजालाच काय पण अखिल मानवजातीला काळोखी फासणारा आहे !

हा खडतर प्रवास संपवून ही मंडळी काशीस दि. २५-३-१८४० ला पोहोंचली. काशींत रवानगी झाल्यानंतरसुद्धां महाराज स्वस्थ नव्हते. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची दाद लागावी म्हणून ते एकसारखे धडपडत होते. त्यांनीं त्या बाबतींत भगीरथ प्रयत्न केले; पण कंपनी सरकार असें खंबीर कीं त्यांनीं कशालाच दाद दिली नाहीं, आणि सातारकरांचा नायनाट केला ! एकसारखे अपयशाचे रट्टे बसल्यानें महाराजांचें शरीर विकल झालें. घोर निराशेचा कटु अनुभव घेत असतां भकास मनानें सातारकर छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा अन्त दि. १४-१०-१८४७ ला झाला !

नेहमींच उदासीनता निर्माण करणारें हें कथानक प्रतापसिंह महाराजांच्या पुरतें तरी संपलें !

# अमर अमरसिंह : ५

तो झपाट्यानें रान कापीत होता. शिकारी कुत्र्यांनीं भेडसाविलेला काळवीट रानांत चौखूर उधळावा तशी त्याची चाल होती. त्याचे पाय जमिनीला टेकत होते का नाहीं कोण जाणे.

दोन सोजीर त्याचा पाठलाग करीत होते. प्रत्यक्ष मृत्यूच त्याचें गचडें धरण्यासाठीं धांवत होता; आणि त्यांतून सटकण्यासाठीं त्याचा धडपडाट चालू होता.

सोजिरांची चिकाटी फार. सावज टप्यांत आणावें म्हणून त्यांचाहि अट्टाहास होता.

असा हा भयंकर पाठलाग चालू होता.

आतां तो त्याच्यावर झडप घालणार तोंच तो झट्कन् उलटला. ठाण, ठाण. दोन आवाज झाले. सोजीर एखाद्या पाकोळीप्रमाणें पटकन खालीं पडला. घोडे रिकामे झाले. ही संधि साधून तो उसाच्या रानांत पसार झाला तो कायमचाच. त्याचा तलास लावण्याकरितां आटोकाट प्रयत्न झाले, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. तो गेला तो

गेलाच. अपमानाचें जिणें जगविण्यापेक्षां त्यानें जगास आणि आपल्या शत्रूस शेवटच्याच रामराम ठोकला !

त्याचें नांव अमरसिंह. तो बाबू कुंवरसिंहाचा भाऊ. ह्या दोन वीरांचा बळी १८५७ च्या बंडानें घेतला.

• • •

१८५७ सालच्या उत्थानाचा डोंब सगळीकडे उसळला होता. कानपुरास चार साहेब कापले गेले असतील नसतील, पण त्यामुळें चिडून गेलेला जॉन बुल आतां संतापानें बेहोष झाला होता व वाटेल तसा सैतानी नंगा नाच घालीत होता ! काळा शिपाई टाफरून बघतो– घाल गोळी ! वहिमी दिसला– दे फांशी ! असें एकसारखें चाललें होतें. या सत्रांत त्या वेळीं किती तरी एकएकटे जीव यमसदनास गेले असतील त्याची तर गणतीच नाहीं. पांच पांचशें आणि हजारों हजार सैनिकांच्या टोळ्या कचाकच खता करण्यास साहेबानें कमी केलें नाहीं. पण असल्याहि धमकावणीस भीक न घालतां बाबू कुंवरसिंह लढत होता. त्यानें इंग्रजाचा नक्षा उतरविला. कवाइती कंपूचा दिमाख मिरविणाऱ्या साहेबाचा पुरा मोड करून त्यानें आपली राजधानी पुन्हां काबीज केली. आणि राजवाड्यावर स्वतःचें निशाण स्वातंत्र्याच्या दिमाखानें डोलतांना पाहून मानाचें मरण उपभोगिलें !

आपलें स्वातंत्र्य कायम राखण्यासाठीं लढतां लढतां धारातीर्थीं देह ठेवण्याचें दिव्य भाग्य बाबू कुंवरसिंहास वयाच्या ऐशींव्या वर्षीं लाभलें !

कुंवरसिंह हा जगदीशपूरचा जहागिरदार होता. बिहार प्रांतांत आरा नांवाचें एक जिल्ह्याचें ठिकाण आहे. या आरा शहरापासून पश्चिमेच्या बाजूला सात कोसांवर जगदीशपूर नांवाची एक जहागिरी होती. या जहागिरीचा जहागिरदार कुंवरसिंह हा होय. जगदीशपुरास कुंवरसिंहाचा फार मजबूत व भव्य असा एक किल्ला होता आणि त्यांतच त्याचा टोलेजंग राजवाडा होता. कुंवरसिंह म्हणजे जातिवंत रजपूत. क्रांतीचें वातावरण चहूंकडे फैलावतांच कुंवरसिंहाच्या अंगांत नवचैतन्य संचरलें

आणि या ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्यानें कंपनी सरकारविरुद्ध दंड थोपटले. इंग्रजांस हुसकून देऊन जगदीशपूरचा ताबा घेतला. पण हा काळ फार वेळ टिकला नाहीं. शत्रूची गोळी लागून त्यांतच त्याचा शेवट झाला.

कुंवरसिंहाचे दोन तीन प्रमुख हस्तक होते. एक रणदलसिंह, दुसरा हरकिसनासिंह आणि तिसरा त्याचा धाकटा भाऊ अमरसिंह. हा तर त्याचा जीव कीं प्यारा! हरकिसनसिंहानें पाटणानजीक असणाऱ्या दानापूरच्या लष्करी छावणींतील शिपायांचीं मनें उत्थानासाठीं तयार केलीं, आणि या सैनिकांचें पुढारीपण बाबू कुंवरसिंहांनीं स्वीकारावें म्हणून यशस्वी प्रयत्न केला. हरकिसनासिंहाच्या प्रयत्नास यश येऊन छावणींतील लष्कर शस्त्रास्त्रें घेऊन एकदम बाहेर पडलें. सैनिकांची ही धांदल पाहून कंपनी सरकारचें अधिकारीमंडळ चकितच झालें! सशस्त्र क्रांतीचा चेव दानापूरच्या छावणींत असा अचानकपणें भणाणेल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. तेव्हां त्यांना आवाक्यांत आणण्याचा प्रयत्न होण्याच्या आंतच हें सैन्य आऱ्याच्या रस्त्याला चालतें झालें लष्कर आरा शहरास येतांच बाबू कुंवरसिंह घोड्यावरून त्यांना सामोरा गेला. त्याला पाहतांच त्या सर्व सैनिकांनीं कुंवरसिंहाच्या नांवाचा जयजयकार केला. आणि लष्करी थाटांत उभें राहून त्याला सलामी दिली. त्याबरोबर त्या सैन्याचा सेनानायक कुंवरसिंह झाला. आणि याच दंगलींत त्याचा धाकटा भाऊ अमरसिंह हाहि पण त्याला येऊन मिळाला. अशा तऱ्हेनें बिहार प्रांतांत क्रांतीचें निशाण फडकावयास लागलें!

२७ जुलै रोजीं दानापूरच्या सैन्यानें आरा येथील तुरुंगावर हल्ला केला आणि तुरुंग जमीनदोस्त करून कैद्यांना बंधमुक्त केलें. खजिना लुटला आणि सरकारी कागदपत्रांना आग लावून दिली. यानंतर या रणमस्त लोकांचा मोर्चा इंग्रजांच्या ठाण्याकडे वळला. त्या वेळीं इंग्रजांच्या ठाण्यावर ५० शीख व १६ इंग्रज इतकेच लोक होते. तेव्हां त्यांची चटणी उडविणें या लोकांना फारसें कठीण नव्हतें; पण त्या ठाण्यावर त्यांनीं तसें न करतां त्यांना अन्नपाण्यावांचून भुकें मारण्याचा घाट त्यांनीं घातला! कंपनी सरकारच्या आश्रितांचें हें ठिकाण तटबंद

होतें. त्यांना रसद पुरविण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांत अपयशच आलें. कॅ. डनवरच्या नेतृत्वाखालीं चारशें इंग्रज शिपायांची एक तुकडी कुमकेस आली. पण कुंवरसिंहाच्या लोकांनीं त्यांचा पार धुव्वा उडविला. त्या चारशेंपैकीं फक्त पन्नास सैनिक कसा तरी जीव घेऊन माघारीं दानापुरास गेले. कॅ. डनवर या झटापटींत गोळी लागून ठार झाला. हा पराजय कंपनी सरकारच्या वर्मीं लागला, आणि बंडखोरांचा निःपात करण्याचा कृतनिश्चय झाला. तेव्हां व्हिन्सेन्ट आयर नावाचा एक साहेब मोठा तोफखाना आणि जबरदस्त कुमक घेऊन कुंवरसिंहावर चालून गेला. त्यानें त्यांची दाणादाण करून आरा शहराचा ताबा घेतला आणि कुंवर-सिंहाच्या लोकांना फांशीं दिलें. शहरांत जिकडे तिकडे आगी लावून दिल्या आणि लूटमार करून लोकांचा चांगलाच सूड घेतला. आरा शहरांत वावरणाऱ्या सर्व लोकांचीं शस्त्रें काढून घेण्यांत आलीं आणि जगदीशपूर तर उभेंच्या उभें जाळण्यांत आलें! कुंवरसिंहाचा राजवाडा व किल्ला जमीनदोस्त झाला. त्याच्या भावांच्या घरादारांना आगी लावण्यांत आल्या. सर्व मालमत्ता लुटून फस्त करण्यांत आली. लोकांचा छळ इतका झाला तरी कंपनी सरकारास समाधान नव्हतें. जनतेवर चांगलीच दहशत बसावी म्हणून त्यांनीं बाबू कुंवरसिंहाचें मस्तक कापून आणणारास ५० हजार रुपयांचें बक्षीस जाहीर केलें!

कंपनी सरकारच्या या करण्यानें दहशत निर्माण होण्याऐवजीं कुंवर-सिंहाचा त्वेष अनावर झाला. त्यानें जिवाची पर्वा न करितां शत्रूवर चालून जाण्याचें ठरविलें. लोकांतहि त्याच्याबद्दल सहानुभूति निर्माण झाली. लष्कर जमवून कुंवरसिंहाला साहाय्य करण्याचें काम त्याचा भाऊ अमरसिंह करीत होताच. कुंवरसिंहास मदत दशदिशांनीं येऊं लागली. कोणी त्याच्या सैन्यांत नोकरी धरली, कोणी पैसा पुरविला, कोणी दारू-गोळा गुप्तपणें धाडिला, अशी प्रत्यक्ष मदत झालीच— पण अप्रत्यक्ष मदत-सुद्धां फार झाली. सिंहद्वयांच्या सर्व हालचाली लोकांना कळत होत्या, पण त्याची कानगी साहेबास न लागेल अशी खबरदारी लोकांनीं घेतली हेंहि फार मोठें नवल झालें. लोकांच्या या करणीचा उपयोग कुंवरसिंह व

अमरसिंह या बंधुवर्गास फार झाला. त्यामुळें त्याचे बेत तडीस जाण्यास मोठीच मदत झाली.

कुंवरसिंहाची तयारी पूर्णपणें झाली. तिकडे कंपनी सरकारहि कांहीं स्वस्थ नव्हतें. या उत्थानास मुळासकट उखाड देण्याचा त्याचा बेत होता. या वेळीं ससराम डोंगराच्या आश्रयानें या सिंहबंधूंनीं आपली बाजू सावरली आणि इंग्रजांशीं तोंड देण्यासाठीं ते ठासून उभे राहिले. नाघाई गांवीं शत्रूवर चालून जाण्याचें त्यांनीं ठरविलें. आतां कॅ. डगलस हा त्यांच्या पाठलागावर होताच. त्यानें त्यांच्यावर हल्ला केला. सैन्यें एकमेकाला भिडल्यावर सिंहबंधूंनीं आपल्या पराक्रमाची शर्थ केली. कॅ. कुंवरसिंहानें आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. एका तुकडीवर डगलसला गुंतवून ठेवण्याची कामगिरी सोंपविली आणि दोन तुकड्या स्वतः घेऊन तो आपल्या उद्योगास लागला.

कॅ. डगलस मोठ्या बंदोबस्तानें कुंवरसिंहाचा पाठलाग करीत होता. त्याचा फौजफांटा फार मोठा व मातबर होता. नं. ४ व नं. ३७ अशा दोन शीख स्वारपलटणी त्याच्या कुमकेस होत्या. याशिवाय सॅपर्स, नऊ तोफा आणि वेढा घालण्यास लागणारी सर्व सामुग्री घेऊन कॅ. डगलस शिकस्तीचे प्रयत्न करीत होता. पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. कुंवरसिंहाच्या समरचातुर्यानें कॅ. डगलसला विजय तर मिळाला नाहींच नाहीं, पण त्याला गंगेपार न होऊं देण्याचे त्याचे सर्व प्रयत्न फसले आणि कुंवरसिंह गंगेपार तर झाला. आणि त्यानें हातोहात जगदीशपूरहि गांठलें. ही बातमी कॅ. डगलसला कळतांच त्यांचें माथें संतापानें पार भडकून गेलें. त्यानें लगेच तोफांचा काफिला बरोबर घेऊन शिवपूर गांठलें, आणि त्या ठिकाणाहून कुंवरसिंहावर हल्ला करण्याचें ठरविलें.

* * *

कॅ. डगलसच्या एवढ्या मोठ्या सैन्यास आणि तोफखान्यास धाब्यावर बसवून जगदीशपूरचा पुन्हां कबजा घेतल्याबद्दल कुंवरसिंहास धन्यता वाटली. मगरीनें गिळलेलें माणिक तिचें पोट फाडून बाहेर काढावें तसें

झालें ! कुंवरसिंहानें जगदीशपुरावर आपलें निशाण पुन्हां फडकावलें. ही गोष्ट खरोखरीच अपूर्व झाली. त्याच्या सैन्यास आणि मित्रमंडळींस फार आनंद झाला. तेव्हां या सुप्रसंगीं कांहीं तरी समारंभ करावा असा बूट निघाला. या गोष्टीस कुंवरसिंहाची परवानगी मागण्यांत आली; त्यानेंहि ती मोठ्या खुषीनें दिली. आणि येथेंच सर्व गोंधळ झाला. कारण त्यांना मिळालेलें यश हें जरी मोठ्या तोलाचें होतें तरी तें कायमचें पदरीं राखण्याकरितां मोठा खटाटोप करणें इष्ट होते. भगीरथ प्रयत्न करावयास पाहिजे. कारण शत्रु फार बलवान् होता, आणि तो दाराशींच खळ्या खणीत उभा होता. तेव्हां त्यास कायमचा पायबंद कसा बसेल याची विवंचना करावयास पाहिजे होती. पण एवढा पोंच असणारी मंडळी तेथें नव्हती. बाबू कुंवरसिंह आणि अमरसिंह हेच काय ते त्यांचे म्होरके. पण तेहि आनंदानें बेहोष झाले, त्यांची बुद्धि चळली आणि तेहि उत्सवसमारंभांत सामील झाले. त्याबरोबर शत्रूवर करडी नजर ठेवून अवधान राखणें हें संपलें लोकांचा बावळट उत्साह द्विगुणित झाला आणि या समारंभास परिणामीं अपायकारक असा रंग चढला !

* * *

बाबू कुंवरसिंहाच्या सैनिकांनीं आणि स्नेह्यांनीं मोठी थाटाची मिरवणूक काढली. सर्वांच्या आघाडीवर पायदळ, त्याच्या मागें घोडदळ आणि त्याच्या मागें उत्तम प्रकारें शृंगारलेल्या हत्तीवर अंबारींत बाबू कुंवरसिंह बसला होता. त्याच्या शेजारीं त्याचा भाऊ अमरसिंह याचा हत्ती झुलत होता. त्या दोन हत्तींच्या मागें रणदलसिंहाचा हत्ती होता. कुंवरसिंहाच्या डोक्यावर छत्रचामरें वारलीं जात होतीं. अशा थाटानें कुंवरसिंहराजाची मिरवणूक इंग्रजांच्या नाकावर टिच्चून नदीच्या बाजूनें निघाली होती.

ही मिरवणूक तडीस जाण्याचा योग नव्हता. कॅ. डगलस आपल्या सैन्यासह गंगेच्या कांठी होताच. शत्रूचा हा दिमाख पाहून त्याचें माथें खवळलें. शत्रूनें आपल्या हातावर तुरी दिल्या, इतकेंच नव्हे तर आपणाला चिडविण्याकरितां हा थाटमाट चालविला. आणि याचें तर त्यास जास्तच

वैषम्य वाटलें व त्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां शत्रूशीं गांठ घालण्याचें ठरविलें. लागलीच त्यानें तोफा डागण्याचा हुकूम सोडला. एका तोफेचा नेम कुंवरसिंहाच्या छत्रावर धरण्यांत आला. तोफ डागली जातांच तोफेच्या गोळ्यानें कुंवरसिंहाचा छत्रधार व रणदलसिंह या दोघांस यमसदनास धाडिलें. गोळा कुंवरसिंहाच्या हातास चाटून गेला. आणि तोदेखील जखमी होऊन हत्तीवरून खालीं कोसळला. तोफेच्या एकाच गोळ्यानें कुंवरसिंहाच्या लोकांचा आनंद मातीस मिळविला. मिरवणुकींत सगळीकडे धांदल उडाली. पळापळ सुरू झाली. कुंवरसिंहास अलगद उचलून निवाऱ्याच्या ठिकाणीं नेण्यांत आलें. त्याच्या हातास झालेली जखम उग्र स्वरूपाची होती. त्याचा हात कापावा लागला. पण म्हातारपणीं हे कष्ट त्यास सहन झाले नाहींत. त्याचा काल समीप आला. तेव्हां अतुल पराक्रमानें लढणारे त्याचे सर्व सैनिक त्याच्याभोंवतीं उभे राहिले. त्या सर्वांस पाहून त्यास निरतिशय आनंद झाला. त्याच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले व तो म्हणाला :

" दोस्तहो ! आतां मी तुमचा क्षणाचा सोबती आहे. जगदीशपुरावर आपलें निशाण झळकतांना पाहून मला समाधान वाटत आहे. मातृभूला स्वतंत्र करून येणारें मरण हें तर परम भाग्याचें, यांत तिलप्राय शंका नाहीं. खरोखरीच ही अमृतवेळा आहे. पण हें स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठीं वाटेल तें घोर बलिदान करा. शत्रु नेस्तनाबूद झाल्याशिवाय तलवार म्यान करूं नका. पण हें असिधाराव्रत प्राण पणाला लावून अटीतटीनें चालविण्यासाठीं माझा मुलगा असता तर...!" इतकें बोलून म्हाताऱ्याचा कंठ दाटून आला. त्यास शब्द फुटेना. शेजारीं त्याचा भाऊ अमरसिंह होताच. तो एकदम उसळला आणि गरजला :

" महाराज, आपण असे कष्टी होऊं नका. आपल्याच रक्तामांसाचा आपला धाकटा भाऊ जिवंत असतां जगदीशपूरच्या स्वातंत्र्याबद्दल काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं. शत्रूचा निःपात केल्याशिवाय हा अमरसिंह क्षणाचाहि विसांवा घेणार नाहीं. मग तसें करतांना कोणत्याहि दिव्यांतून जावें लागलें तरी चिंता नाहीं !"

अमरसिंहाचे हे शब्द ऐकतांच कुंवरसिंहास धन्यता वाटली. त्याचें प्राणोत्क्रमण सुखानें झालें.

कुंवरसिंहानंतर जगदीशपूर लढविण्याचें काम अमरसिंहानें तितक्याच धडाडीनें चालविलें. त्यानें आरंभिलेली लढाई गनिमी काव्याचा एक उत्कृष्ट नमुना होता. कॅ. डगलस आणि लुगार्ड हे कंपनी सरकारचे अधिकारी अमरसिंहाचा मोड करण्यासाठीं एकसारखे धडपडत होते. त्यांनीं आपल्या सैन्याच्या सात तुकड्या केल्या आणि त्या निरनिराळ्या बाजूंनीं जगदीशपूरच्या आसपास पेरून दिल्या. शत्रूला सर्व बाजूंनीं वेढून त्याचा जगदीशपुरांत कोंडमारा करावा असा त्यांचा बेत होता. जगदीशपूरच्या आसपास डोंगर आणि रान चिकार होतें. टेकडी–टेकडीला आणि रानारानांत अमरसिंहाचे लोक दबा धरून बसले होते. त्यांनीं इंग्रज सैन्यावर छापे घालघालून त्यांना सळो का पळो करून सोडलें. असें जरी होतें तरी अमरसिंहाचा इलाज चालेना. शत्रुसैन्य संख्येनें समृद्ध असल्याकारणानें तें त्यांना चेपीत चाललें. आतां तर अमरसिंहाचें दुर्दैव पुरतेपणींच ओढवलें; कारण इंग्रज सैन्यांत महत्त्वाचा फरक झाला. डगलसला याच वेळीं हॅवेलॉक नांवाचा नामांकित सेनानी येऊन मिळाला. त्याबरोबर युद्धाचें पारडें फिरलें. हॅवेलॉक आणि त्याचे स्वार हे कसलेले लढवय्ये होते. त्यांनीं जोराचा हल्ला करतांच अमरसिंहाच्या लोकांनीं कच खाल्ली. आतांपर्यंत त्याचे भुरटे पराजय होत होते. पण हा जबरदस्त मारा सुरू होतांच अमरसिंहाच्या लोकांनीं पळ काढिला. नेहमींप्रमाणें अवघड ठिकाणीं दबा धरून बसण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण हॅवेलॉकनें त्यांना क्षणाचीहि उसंत खाऊं दिली नाहीं. शेवटीं जंगलांतून जातांना अमरसिंहाचे लोक कायमचेच पांगले.

हॅवेलॉकच्या या तडाख्यानें अमरसिंह चिडला होता. आणि इंग्रज सेनापतीला आपला हिसका दाखविण्याचा त्याचा बेत होता. त्याप्रमाणें त्यानें हॅवेलॉकवर चालून घेतलें; पण हा हल्ला त्याच्या पुरेपूर अंगावर आला. हॅवेलॉकच्या घोडदळापुढें अमरसिंहाच्या लोकांचा टिकाव लागला नाहीं. ह्या धांदलींत अमरसिंहाच्या घोड्यास बरीच मोठी जखम झाली.

आणि तो निकामी झाला. त्याबरोबर अमरसिंहाचें दुर्दैव ओढवलें. स्वतःची विटंबना टाळण्यासाठीं अमरसिंह पायींच पळत सुटला. त्याला दूर पळतांना पाहून दोघे स्वार त्याच्यामागें धांवले. आपला पाठलाग होत आहे हें पाहून अमरसिंहास मोठा पेंच पडला. आतां शत्रूच्या गोळीस मरून जाणें किंवा कैदी होणें ह्या दोन विटंबना त्याच्या डोळ्यांपुढें थैमान घालूं लागल्या! पण अमरसिंह तसा समयसूचक होता, व त्याचें दैव थोर होतें. त्याची तशी विटंबना होणार नव्हती. लौकरच दैववशात् थोड्याशा अंतरावर त्याला भला मोठा उंसाचा मळा दिसला. त्याबरोबर तो त्या मळ्याच्या रोखानें पळूं लागला. तोच मळ्यांत पाऊल टाकतो तों त्याचा मृत्यु त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. ते स्वार तेथें दाखल झाले. आतां झाडाझाडी होणार तोंच प्रसंगावधान राखून अमरसिंहानें हातांतील पिस्तुल ठणकावलें तेंहि अशा खुबीनें कीं ज्याचें नांव तें! घोडेस्वार त्याला शोधण्याकरितां घोड्यावरून खालीं उतरण्यासाठीं आसन बदलतात तोंच 'टो टो' असे दोनच आवाज- कीं कारभार खलास! घोडेस्वार खालीं जमिनीवर धाड्कन् पडले. अमरसिंह तेथून लागलीच पसार झाला. त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली. कांहीं परागंदा झाले. कांहीं कंपनी सरकारनें फांशीं दिले. याप्रमाणें या उत्थानाचा मोड झाला. पण अमरसिंह मात्र इंग्रजांच्या हातीं लागला नाहीं. तो उसाच्या मळ्यांतून जो नाहींसा झाला तो कायमचाच. त्याचा पुढें पत्ताच लागला नाहीं!

रणमर्द कुंवरसिंहाचा हा हुकमी पत्ता अशा तऱ्हेनें बेपत्ता झाला. स्वातंत्र्यासाठीं अहोरात्र झुंजणारा हा वीर अज्ञात मरणानें मेला. स्वातंत्र्यासाठीं धडाडलेल्या रणकुंडांत सर्वस्वाची आहुति देणारा हा तेजस्वी तारा पारतंत्र्याच्या घोर अमावास्येंत केव्हां निखळला कोण जाणे!

## पाणी : ६

ते दोघे भेटले.

पितापुत्रांची भेट कडकडून झाली.

वात्सल्याचा कड आला.

उभयतांच्या नेत्रांतून अश्रूंचा पूर लोटला.

पुत्रानें पित्यास आशीर्वाद मागितला. पित्यानेंहि तो वात्सल्यपूर्ण अंतः-करणानें दिला.

" बाळ, विजयी हो ! "

पण हा आशीर्वादच ठरला. तो खरा होण्याइतकें पुण्य त्यांत नव्हतें. आशीर्वाद देणारा आणि आशीर्वाद घेणारा– दोन्हीहि व्यक्ति फार मोठ्या होत्या. त्यांनीं भारतवर्षांतील सम्राट्पदें मंडित केलीं होतीं. सत्तेचा सुखोपभोगांत आणि विलासांचा अतिरेकी उपयोग त्यांनींहि घेतला होता. पण आतां त्यांची सद्दी संपली होती. उलट, पुत्राची गर्दन मारली जाणार होती तर पित्यास जन्मठेपेची सजा व्हावयाची होती. त्या शोकपर्यवसायी नाटकाची नांदी आतां चालू होती. त्या पित्याचें नांव शाहजहान व पुत्राचें नांव दाराशुको !

शाहजहान आजारी पडला आणि तेथेंच त्याचा घात झाला. त्या आजारानें तो मेला असता तरी फार चांगलें झालें असतें. वैभवशाली शाहजहान भाग्यशाली ठरला असता. पण विधिलिखित निराळें होतें! त्याची दशा– दुर्दशा व्हायची होती म्हणूनच तो जगला.

शाहजहान आजारीं पडला आणि सम्राट्-पदासाठीं धुमश्चक्री सुरू झाली. शाहजहानचे चार पुत्र चार बाजूंनीं धांवले. त्यांत औरंगजेब सव्यसाची ठरला. त्यानें आपलीं प्यादीं शिस्तीनें फिरविलीं लेखणीचें राजकारण आणि समशेरीचें रणकारण त्यानें यशस्वी केलें. दिल्लीपासून बारापंधरा मैल असणाऱ्या सामूगडच्या रणमैदानावर शेवटचें निर्णायक युद्ध लढलें गेलें. त्यांत औरंगजेबाचा थोरला भाऊ दारा हरला. त्याच युद्धप्रसंगाला तोंड देण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यासमोर खडा होता. आणि त्यास भिडण्यासाठीं तो निघाला होता. तो दिवस १८ मे १६५८ हा होता. त्या दिवशीं खुद्द दाराच्या नेतृत्वाखालीं बादशाही लष्कर त्या महान् युद्धासाठीं बाहेर पडलें. दारानें शाहजहानचा निरोप घेतला आणि तो शेवटचा ठरला. पुन्हां पितापुत्रांची गांठ झाली नाहीं!

दारा म्हणजे शाहजहानचा कलिजा. त्याचें दारावर निस्सीम प्रेम होतें. तो सोडून जातांना म्हाताऱ्यास प्राणांतिक यातना झाल्या. आजारानें आणि वृद्धापकाळानें जर्जर झालेलें त्याचें शरीर या प्रसंगानें पार विकल झालें. दाराच्या रूपानें आपल्या कुडींतील पंचप्राणच निघून जात आहेत कीं काय असें त्यास वाटलें. बाहेर अफाट लष्कर उभें करून दारा पित्याच्या दर्शनासाठीं आणि शुभ आशीर्वादासाठीं आला. त्याला पाहतांच शाहजहानचें अंतःकरण भरून आलें. उभयतां एकमेकांस भेटले. दाराच्या नेत्रांतून अश्रु टपटपले. "पिताजी, मी येतों; मला आशीर्वाद द्या!" असें आवेग आवरून दारा म्हणाला. हे शब्द ऐकून शाहजहानच्या हृदयवीणेच्या सर्व तारा छेडल्या गेल्या.

कांहीं काळ स्तब्धावस्थेंत गेल्यावर शाहजहानला शब्द फुटला. तो म्हणाला, "बाळ, परवरदिगार तुला यश देवो! तूं रथांतून स्वारीला जा. कारण दक्षिणेकडे स्वारीला जाण्यास रथासारखं दुसरं भाग्यशाली व यश-

दायी वाहन नाहीं असा हिंदूंचा विश्वास आहे. तेव्हां तूं तसं कर. माणसानं चांगल्या गोष्टी कराव्या ! "

लगेच गच्चीवरून त्यानें आपला चेहरा मक्केच्या पवित्र क्षेत्राकडे केला. अनन्यगतिक होऊन त्यानें बाहू वर केले, आणि मोठ्या भाविक अंतःकरणानें परमेश्वराची करुणा भाकली व दारास यश चिंतिलें. अखेर मोठ्या जड अंतःकरणानें त्यानें दारास निरोप दिला.

पित्याच्या इच्छेप्रमाणें दारा खरोखरीच सामुगडच्या युद्धासाठीं रथांतून निघाला. तो रथ अतिशय भव्य नि सुंदर होता. ही स्वारी चाळीस खांबी भव्य अशा दिवाण-इ-आमपासून मार्गस्थ झाली. कांहीं मार्ग आक्रमिल्यानंतर दारानें हत्तीवरून आपल्या प्रवासास प्रारंभ केला. दाराच्या या स्वारीचा थाट म्हणजे एक अपूर्व प्रकार होता. महाभारतांतील कौरव-पांडवांच्या चतुरंग दलाप्रमाणें दाराचा दलसंभार खुलून दिसत होता. पण लष्करी हालचालीच्या दृष्टीनें तो कुचकामाचा होता. अशा प्रकारें तें लवाजम्याचें ढोलचे ढोल मार्ग आक्रमीत असतां विमनस्क मनानें शाहजहान तें दृश्य टेहळीत होता. त्याचा तो रुबाबदार खानदानी चेहरा व वाऱ्याच्या झुळुकेबरोबर भुरभुर उडणारी पांढरी स्वच्छ दाढी त्या दृश्याची विमनस्कता जास्तच वाढवीत होती !

दाराचा भाऊ सुजा याचीहि चढाई याच वेळीं होती. आणि त्याचा बंदोबस्त दारानें आपल्या मुलाच्या—सुलेमानशुकोच्या नेतृत्वाखालीं खातरजमेचें लष्कर पाठविलें होतें. आणि तें माघारी येईपर्यंतचा काळ त्याला कसा तरी ढकलावयाचा होता. म्हणून त्यानें औरंगजेबास चंबळ नदीच्या पलीकडे रोखून धरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण तो फसला. आपल्या सैन्यासह दारा धोलपुरास दि. २२ मे १६५८ला आला. त्याच्या हुकुमाबरहुकूम चंबळ नदीचा कडेकोट बंदोबस्त झाल्याचें पाहून त्यानें समाधानाचा सुस्कारा टाकला.

दाराला औरंगजेबाविषयीं कांहींच कल्पना नव्हती. हे दोघे भाऊ एकाच मातेच्या पोटीं जन्मास आलेले, पण दोघांचें आयुष्य भिन्न

परिस्थितींत गेलें. दारा शाहजहानचा लाडका, तर औरंगजेब शाहजहानच्या कृपेला पारखा. मयूर सिंहासनाशेजारीं बादशाही लखलखाटांत आपली हुकमत गाजविणारा एक, तर दुसरा बादशाही हुकमाबरहुकूम उठाबश्या काढून जिकीरीस आलेला! एकानें सावलींत राहून मोठ्या ख्यालीखुशालींत उन्हाळे पावसाळे काढलेले, तर दुसरा कठीण प्रसंगांच्या उन्हाळ्या-पावसाळ्यांतून तावून सुलाखून निघालेला. या दोन भावांची दुक्कल म्हणजे—अनेक कुस्त्या मारून तयार झालेला एक सराईत वस्ताद, तर दुसरा एकहि आखाडा न पाहिलेला नवा पोर. दारा जन्मानें दादा, पण औरंगजेब जन्मानें धाकटा असूनहि बुद्धीनें दाराचें बारसें जेवलेला बहाद्दर वीर. त्याच्या बुद्धीचा झपाटा, लष्करी हालचालीची तडफ दारानें केव्हांच पाहिली नव्हती.

चंबळ नदीच्या पलीकडे औरंगजेबाला रोखून धरण्यासाठीं जय्यत तयारी केलेली पाहून दाराला वाटलेलें समाधान फक्त एकच दिवस टिकलें; कारण लगेच दुसऱ्याच दिवशीं औरंगजेब आपल्या दळभारासह चंबळ-पार झाल्याचें वृत्त त्याच्या कानीं थडकलें. त्याबरोबर त्याला जबरदस्त आश्चर्याचा धक्का बसला. त्याचा धीर सुटला. औरंगजेब चंबळपार होतांच लष्करीदृष्ट्या त्याचा हजारपट फायदा झाला. या एकाच गोष्टीनें त्यानें दारावर मात केली. चंबळ नदीच्या कांठावर उभें असलेलें दाराचें अचाट सामर्थ्य कवडीमोल झालें, आणि आग्र्याचे दरवाजे औरंगजेबापुढें सताड उघडे पडले! दाराचें सर्व सामर्थ्य गडगडलें व त्यास आपल्या लष्करासह आग्र्याकडे धूम ठोकण्यावांचून गति उरली नाहीं. औरंगजेबाच्या चपळ हालचालीपुढ दारा फिक्का पडला. चंबळपार होतांच अहोरात्र मजल मारून औरंगजेबानें झपाट्यानें रान कापलें, व तो आग्र्यापासून दहा मैलांच्या अंतरावर येऊन धडकला. त्यानें आपला तळ सामूगड येथें ता. २८ मे रोजीं टाकला. हें ठिकाण आग्र्याच्या पूर्वेस दहा मैलांवर आहे. तेथें फार मोठें मैदान असून तें सम्राट्पदासाठीं होणाऱ्या घनघोर व निर्णायक रणधुमाळीस अगदीं योग्य असेंच निवडलें गेलें.

सामूगडच्या मैदानावर औरंगजेब दाखल झाल्याचें वृत्त कळतांच त्याच्याशीं गांठ घालण्यासाठीं दाराहि तितक्याच तडफेनें निघाला. नौबतीवर टिपरूक पडलें; अवसान घेत घेत आणि मस्त होत होत दाराचें लष्कर चालूं लागलें. पण तें थोड्या अंतरावर गेलें असेल नसेल तोंच हा सर्व मामला थंडावला. धांदरट दाराच्या मनांत धांदरट विचार आला. शत्रूवर आपण चाल करून जाण्याऐवजीं चालून येणाऱ्या शत्रूलाच आपण मोडावें, या आत्मघातकी विचारानें त्वेषांत आलेल्या लष्करावर विरजण पडलें. याच वेळीं दारानें चालून घेतलें असतें तर औरंगजेबाची त्रेधातिरपीट उडती. प्रथम कशाचीहि पर्वा न करतां धडाकून चाल करणारा केवळ आपल्या अवसानानें ५० टक्के विजयी होतो. बाकीचे ५० टक्के त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून असतात. हा नियम तर खराच, पण प्रस्तुत औरंगजेबाची स्थिति चमत्कारिक होती. संख्येच्या दृष्टीनें औरंगजेबाचें सामर्थ्य कमी होतें. याशिवाय त्याचें सैन्य कहारी उन्हाच्या रणरणाटांतून लांब पल्ल्याच्या मजला मारून आलें होतें आणि धापा टाकीत होतें. त्याला उसंत नव्हती. याच्या उलट दाराची स्थिति होती. त्याचें सैन्य ताजेंतवानें होतें; त्याला रणाची नशा चढली होती. अशा स्थितींत त्यानें औरंगजेबावर चालून घेतलें असतें तर फार चांगलें झालें असतें. तो विजयी झाला असता. पण दारा तडफदार नव्हता. शत्रूवर झडप घालण्यासाठीं सभोंवार सेनासागर हेलावत असतांहि दारानें गांगरून जाऊन टाळाटाळी सुरू करतांच सैनिकांचा त्याच्यावरील विश्वास उडाला; आणि औरंगजेबाबद्दल त्यांच्या मनांत निष्कारण दहशत निर्माण झाली. दाराच्या मानानें लष्करीदृष्ट्या कमताकद असणारा औरंगजेब सामर्थ्यवान ठरला.

यानंतर दारानें दुसरा एक मासलेवाईक मूर्खपणा केला. चाल करण्यासाठीं बाहेर काढलेलें आपलें चतुरंग दळ त्यानें सबंध दिवसभर खडेंच्या खडें ठेविलें ! त्यामुळें अवघ्या लष्कराचे कमालीचे हाल झाले. त्याच्यावर पंचाग्निसाधनाचा प्रयोग झाला ! टाळक्यावर माध्यान्हींचा तळपता सूर्य, पायाखालीं उष्णतेनें धगधगणारें रसरशीत वाळवंट, सभोंवार झोडपणारे गरमागरम वारे—अशा विलक्षण तडाक्यांत लोखंडी चिलखतें परिधान

केलेल्या सैनिकांची काय दशा झाली असेल याची कल्पनाच करवत नाहीं. किती तरी जण त्या कडाक्याच्या उष्णतेनें उकडून निघाले, तृष्णेनें पटापट मेले हत्तींनीं तर लोटांगणें घातलीं. दाराच्या सैन्यानें तो दिवस असा कंठला. याच्या उलट औरंगजेबानें आपल्या सैन्यास पूर्ण विश्रान्ति दिली आणि दुसऱ्या दिवशींच्या लढाईसाठीं त्यानें त्यास ताजेंतवानें केलें. सूर्यास्तानंतर दारानें आपल्या सैन्यास तळावर जाण्यास फर्माविलें. सबंध दिवसाच्या त्रासानें आणि कुचंबणेनें दाराच्या सैन्याचा जोम नाहींसा झाला आणि पराभवाचीं पिशाच–पावलें सैनिकांच्या मनांवर उमटलीं !

ता. २८ मेची रात्र चालू झाली. त्या रात्रीं औरंगजेबाच्या छावणींत मोठी धांदल उडाली होती. त्याच्या छावणीभोंवतीं पहारेकऱ्यांचा जागता पाहरा होता. त्या रात्रीं औरंगजेबानें आपल्या सैनिकांना उद्देशून मोठें उत्तेजक भाषण केलें आणि सैनिकांचीं मनें उद्दीपित केलीं. तो म्हणाला, " दोस्तहो, उद्यांचा दिवस म्हणजे आपल्या आयुष्यांतील परम भाग्याचा. त्या दिवशीं आपण आपल्या जवानमर्दीनें जगाला चकित करूं. तेव्हां एकदिलानें असा पराक्रम गाजवा कीं तुमचीं नांवें इतिहासांत अजरामर होतील; तुमच्या जन्माचें सार्थक होईल ! "

सामूगडच्या प्रत्यक्ष लढाईचा दिवस उगवला. क्षणाक्षणाला दिवसचक्र फिरूं लागलें, पळापळाला त्याची गति वाढूं लागली. दारा आणि औरंगजेब यांच्या सैन्याच्या हालचालीस प्रारंभ झाला. दुपारीं बाराच्या सुमारास उभय सैन्यें एकमेकांस भिडलीं; जोराची खणाखणी झाली. तुमुल रणकंदन झालें. दाराचा धांदरटपणा व मूर्खपणा असाच वाढत्या श्रेणीनें चालू होता. त्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. दारा युद्ध हरला आणि सम्राट्पदाला मुकला !

माणसाच्या आयुष्यांत कांहीं कांहीं दिवस असे कांहीं चमत्कारिक उगवतात कीं त्यांची त्यांना जन्मोजन्म आठवण राहते. २९ मे हा दिवस दारा व औरंगजेब यांच्या आयुष्यांत असाच कांहीं चमत्कृतिजन्य उगवला, कीं त्या दिवशीं दोघांच्या आयुष्यास निराळेंच वळण मिळालें. दक्षिणेंत सरसुभेदारीच्या खस्ता खाणारा औरंगजेब अलमगीर झाला. त्याच्या

हुकमतीबरोबर मोगल साम्राज्यांतील शीरनूशीर हालूं लागली. याच्या उलट, त्या चाळास-खांबी भव्य सभामंडपांत मयूरसिंहासनाशेजारी सोन्याच्या रत्नखचित व्यासपीठावर बसून अनेकांचे मुजरे घेत सम्राटाची सत्ता गाजविणारा दारा !— भयंकर प्रसंगांच्या कराल सबड्यांत खता झाला !

सामूगडचा तो युद्धदिन आग्र्याला अत्यंत काळजीचा गेला. राजदरबार आणि सामान्य रयत सामूगडला काय होणार याचाच विचार करीत होती. त्यांचीं शरीरें आग्र्यांत होतीं, पण मनें सामूगडच्या रणभूमीवर घोटाळत होतीं. दुपारपासून तोफांच्या धडाक्याचे नाद निनादूं लागले, त्याबरोबर दोघांची जुपली हें जनता उमगली; पण आतां 'विजयी कोण? दारा कीं औरंगजेब?' या प्रश्नांचीं उत्तरें मनांत उमटूं लागलीं, 'दारा विजयी होऊन भांडण मिटल्यास फार बेस होईल; कारण तसें झालें तर आपले जीव सुखांत राहतील. शहराची लुटालूट टळेल. आणि जर कां हें युद्ध औरंगजेबानें जिंकलें—तर–तर मग आपले हाल कुत्रा खाणार नाहीं. लूटमार आणि डोईफोडी चुकणार नाहीं !' अशा स्थितींत दुपारपर्यंतचा काळ उलटला आणि तेव्हांपासून बातम्या येण्यास प्रारंभ झाला. रणांगणावर क्षणाक्षणाला दाराचा विचका होत होता. एकापेक्षां एक अशा विचित्र गोष्टी तिकडे घडत होत्या; त्यांच्या विकृत बातम्या आग्र्यास धडकत होत्या. त्यामुळें लोकांचीं मनें बेचैन होत होतीं. अशा स्थितींत दिवसाचे असंख्य क्षण नाहीसे झाले व रात्र सुरू झाली. सोन्यासारखा दिवस या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत रेटतां रेटतां नागरिकांचा जीव मेटाकुटीस आला. आणि आतां रात्रीस प्रारंभ झाला, तेव्हां ती कशी जाणार हे विचार सुरू झाले.

रात्रीच्या सुमारास बाहेर रस्त्यांत घोड्यांच्या टापा टपटपूं लागल्या. हुजऱ्या–हलकाऱ्या नाहीं, मशाल–पलिता नाहीं, कीं भालदाराची ललकारी नाहीं,— निमूटपणें एक स्वारांचें टोळकें दाराच्या राजवाड्याकडे गेलें ! तें आंत शिरलें आणि राजवाड्याचीं दारें लावून घेण्यांत आलीं. त्याबरोबर दुःखाचीं द्वारें धाड्कन् उघडलीं जाऊन हलकल्लोळ उडाला ! रयत उमगली, कीं दारा पराभव खाऊन माघारी आला. ही बातमी आगीसारखी आग्र्यांत भडकली. त्याबरोबर हाहाःकार उडाला.

आग्र्याच्या किल्ल्यांत तोच प्रकार झाला. शाहजहानला ही बातमी कळली त्याबरोबर त्याचें कंबरडेंच मोडलें. जनानखान्याचा तोच प्रकार झाला; आणि अवघें आग्रा शहर शोकसागरांत बुडून गेलें !

दुःखाचा पहिला कड ओसरला आणि रडारड संपली. शाहजहाननें एका खोज्यामार्फत दारास निरोप धाडिला कीं, 'केवळ दुर्दैवानें तुझ्यावर हा प्रसंग आला. जें व्हावयाचें तें झालें. त्याला तुझा इलाज नाहीं. प्रयत्न करणें हें मानवाच्या हातीं असून यशापयश हें दैवाधीन आहे. तेव्हां मला एकदां भेटून जा. माझें म्हणणें ऐक, आणि मग दुर्दैवामागें भटकत जाण्यास तुझा तूं मोकळा आहेस. पूर्वसंचितानुसार काय व्हावयाचें असेल तें होईल, त्याला इलाज नाहीं !'

परमप्रिय पित्याचा हा निरोप दारास पोंचला; पण आतां पित्याची गांठभेट घेण्यासारखें असें कांहींच उरलें नव्हतें. त्याचा सर्व बाजूंनीं निकाल लागला होता. तब्बल दोन दिवसांचे ढोरकष्ट, रणरणत्या उन्हांत उसंत न खातां त्यानें केलेली हडेलहप्पी, घनघोर संग्रामाचा अख्खा दिवस, नंतर अपयशी मनानें सामूगडपासून आग्र्यापर्यंत मारलेली दौड— या सर्व तापदायक गोष्टींनीं तो अक्षरशः जमिनीला लोळला होता. या उरवळ्याला पुरवठा म्हणूनच कीं काय, लढाईच्या धुमश्चक्रींत त्याच्या पायांत एक लोखंडाचा तुकडा घुसला होता. याशिवाय तळपत्या सूर्याप्रमाणें झळाळणारा त्याचा स्वाभिमान काळाठिक्कर पडला होता ! पराजयाचें खग्रास ग्रहण त्यास लागलें होतें. अशा सुन्न स्थितींत त्याच्या डोक्यांत त्यानें केलेल्या घोडचुकाची भुतावळ हातांत चुडे घेऊन आग्यावेताळी नंगा नाच घालत होती. त्याला मनोमन माहीत होतें, कीं त्यानें हें युद्ध शाहजहानच्या इच्छेविरुद्ध केलें. खास शाहजहान आपसांतील हा तंटा समजुतीनें मिटविण्यास तयार होता; पण आपणच त्यास तें तसें करूं दिलें नाहीं. उलट, औरंगजेबादि शाहजाद्यांना एखाद्या मशकाप्रमाणें पिटाळून लावूं, अशी आपण शेखी मिरविली आणि मिशीला पीळ भरला; पण त्या बालिश वल्गना ठरल्या ! संग्रामसिद्धतेच्या बाबतींतसुद्धां संपन्न व दिलदार अशा आपल्या पित्यानें कोणत्याच प्रकारची कमतरता केली नाहीं. सर्व साहित्य मुक्तहस्तानें

दिलें; व प्रेमळ आशीर्वादहि दिला. 'विजय किंवा थडगें' असें म्हणून आपण मोठ्या दिमाखानें लढाईवर निघून गेलों. पण अवघ्या आठ दिवसांच्या आंत आपल्या कपाळीं काय आलें ? लढाईच्या जुगारांत सर्वस्वाचा होम झाला. त्यांत गर्दन मारली गेली असती तर फार चांगलें झालें असतें ! शूराच्या मरणानें जिवाचें सोनें झालें असतें. तें मरण चिरंजीव ठरलें असतें. पण तसें न होतां हा फजितवाडा पाहण्यासाठीं आणि कृतकर्मांचे झाडे देण्यासाठीं हा औट हात देह जिवन्त राहिला आहे !

कमालीच्या केविलवाण्या स्थितींत त्यानें शाहजहानास निरोप धाडिला, "माझी आतां कोणालाच भेटण्याची लायकी नाहीं. त्यांतून आपल्यापुढें तर मी माझा लाजिरवाणा चेहरा दाखवूं इच्छित नाहीं. आणि आतां सवडहि नाहीं. आतां जर गहाळपणा केला तर काळिकाळाचे शिपाई माझ्याभोंवतीं जमा होऊन माझें डोकें मारतील ! तेव्हां भेटीचा आग्रह करूं नका. फक्त आतां आपल्या चरणीं या नादान पोराचें एकच मागणें आहे, कीं यापुढें मला जो अमर्याद लांबीचा प्रवास करावयाचा आहे त्यासाठीं आपला शुभ आशीर्वाद द्यावा. तो मला उत्साह देईल."

दाराचा हा निरोप पोंचतांच शाहजहानच्या अंतःकरणाचा चुरा झाला. अनेक भल्याबुऱ्या प्रसंगांतून सुलाखून निघालेला वयोवृद्ध शाहजहान– पण त्याचा या निरोपानें शिलशिलाट झाला. त्याला गहिंवरून आलें, पण मुक्त-कंठानें रडण्यास आतां अवसर नव्हता !

कारण प्राणान्तिक प्रसंग झपाट्यानें पावलें टाकीत होता. आणि तो नरडीला भिडण्याच्या आंत दाराच्या पलायनाची तयारी व्हावयास पाहिजे होती. लगेच सोन्याच्या नाण्यांनीं लादलेलीं खेचरें खजिन्यांतून दाराच्या मदतीसाठीं रवाना झालीं. दिल्लीच्या सुभेदाराला दाराला लागेल तितकें सामान देण्याबद्दल शाहजहानच्या स्वदस्तुराचें फर्मान टाकोटाक धाडण्यांत आलें. दाराहि या दुःखद परिस्थितींत जेवढी विश्रान्ति घेणें जरूर व शक्य होतें ती घेऊन पुढील उद्योगास लागला. त्याचें कुटुंब नादिराबानू बेगम व मुलेंबाळें आणि कांहीं गुलाम स्त्रिया एका झांकलेल्या हौद्यांत हत्ती-वर घेण्यांत आल्या. त्याच्या स्वतःच्या राजवाड्यांतून जेवढें म्हणून

जडजवाहिर आणि सोनेंनाणें घेतां येणें शक्य होतें तेवढें त्यानें घेतलें; आणि पहांटे तीनच्या सुमारास दहाबारा निवडक शरीर-संरक्षक बरोबर घेऊन त्यानें आग्र्यास सलाम ठोकला, व दिल्लीचा मार्ग सुधारला. पुढें चारपांच दिवसांत त्याच्याशीं निष्ठावन्त असणाऱ्या लोकांचा जमाव त्याच्याभोंवतीं जमला. त्यांची संख्या पांचसहा हजारांपर्यंत गेली. शाहजहान बादशहाकडून त्याला पैशांची आणि सामानसुमानाची मदत एकसारखी होत होती. औरंगजेबाकडून आग्र्याचा ताबा झाल्यानंतर ती थांबली. दाराबरोबर जे जाऊं शकले नाहींत त्यांनीं आग्र्याच्या किल्ल्यांत शाहजहानचा आश्रय घेतला. दाराचा वाडा लुटून फस्त झाला !

दारा रणांगणावरून नाहींसा होतांच औरंगजेब आपल्या हत्तीवरून खालीं उतरला. त्यानें जमिनीवर गुडघे टेकून अल्लाची प्रार्थना केली व प्राप्त यशाबद्दल अल्लाचे शतशः आभार मानिले ! त्यानंतर तो दाराच्या शामिआन्याकडे गेला. पण तेथें पाहतो तों तेथील सर्व चीजवस्त लुटून फस्त झाली होती. इतक्यांत त्याच्या लष्करांतील मुख्य मुख्य अधिकारी त्याच्याभोंवतीं जमा झाले, व त्यांनीं त्याचें सामूगडच्या अपूर्व विजयाबद्दल अभिनदन केलें. औरगजेबानेंहि त्यांनीं केलेल्या पराक्रमाबद्दल त्यांची स्तुति केली व यथोचित प्रशंसोद्गार काढले.

हा परस्पर-अभिनंदनांचा व स्तुतिस्तोत्रांचा प्रकार चालू असतां मुरादबक्षाची स्वारी त्या ठिकाणीं दाखल झाली. त्याबरोबर औरंगजेबानें अत्यंत प्रेमानें त्याचें स्वागत केलें, त्याच्या शौर्याबद्दल त्याची मनसोक्त स्तुति केली, आणि आजचा विजय हा केवळ मुरादच्या शौर्यामुळें मिळाला असें म्हणण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. 'मुरादच्या राज्यस्थापनेचा दिवस आजपासून मोजावा' असा गौरवाचा उद्गार काढण्यापर्यंत त्यानें मजल मारली. औरंगजेबानें बंधुप्रेमाचें हें नाटक बेमालूम वठविलें ! मुरादच्या जखमा हकीम तपासत असतां त्यानें त्याचें मस्तक मांडीवर घेतलें, आणि आपल्या अंगरख्याच्या बाह्यांनीं त्याच्या जखमांतून वाहणारें रक्त टिपलें. मुरादला झालेल्या जखमांबद्दल त्यानें इतकें दुःख व्यक्त केलें कीं, जणुं काय त्या जखमा मुरादला झाल्या नसून खुद्द औरंगजेबालाच झाल्या आहेत.

यानंतर औरंगजेबाचा शामिआना उभारण्यांत आला. तेथें एक मोठा दरबार भरविण्यांत येऊन ज्या ज्या वीरांनीं युद्धांत शौर्य गाजविलें त्यांना त्यांना बक्षिसें देण्यांत आलीं. मुराद आणि औरंगजेब या उभयतांच्या छावण्यांवर आनंदीआनंदाचा हैदोस चालू होता. मृत रजपुतांच्या चितांनीं अवघें रणमैदान फुलून गेलें होतें. असंख्य चिता धडाडल्या होत्या.

यानंतर दोन मुक्काम करून हे विजयी शाहजादे आग्र्यास दाखल झाले. प्रथम त्यांनीं आपला मुक्काम शहराबाहेर नूरमंझील नांवाच्या उद्यानांत टाकला. या ठिकाणीं त्यांचा मुक्काम दहा दिवस होता. प्रत्येक दिवशीं बादशाही दरबारांतील सरदार दरकदार व मोटमोठालीं घेंडें बादशहाची बाजू सोडून या उगवत्या सूर्यास वंदन करण्यासाठीं दाखल होत होतीं, व ‘ गरिबावर लक्ष असूं द्या ’ म्हणून कळकळीनें विनवीत होतीं. पराजित लष्करानें आतां मुराद व औरंगजेब यांच्याकडे नोकऱ्या धरल्या. नवीन नवीन नेमणुका करण्यांत आल्या. हां हां म्हणतां औरंगजेबाचें सामर्थ्य झपाट्यानें वाढलें विजयी शाहजाद्यांचा मुक्काम आग्र्याशेजारीं पडतांच गरीब रयत घाबरली. मुरादच्या गैरशिस्त व गबाळ कारभारांत तयार झालेल्या लष्करानें व इतर पेंढारानें आग्र्याची लूट करण्यासाठीं कंबरा बांधल्या. पण, रयतेस कोणत्याहि प्रकारचा त्रास देऊं नये, असा औरंगजेबाचा सक्त हुकूम होता. तरी भामटयांनीं लुटालूट चालविलेली पाहतांच औरंगजेबानें आपला थोरला मुलगा सुलतान महंमद याच्या ताब्यांत आग्रा शहर दिलें व तेथें शांतता प्रस्थापित केली.

तारीख ६ सप्टेंबर १६५६ रोजीं शाहजहान आजारी पडला. त्या वेळेपासून या घालमेलीस सुरवात झाली व हें राजकारण या थराला आलें ! दारा फरारी झाला, आणि हें प्राणसंकट शाहजहानच्याभोंवतीं खळगा खणूं लागलें. शस्त्रास्त्रांनीं या प्रकरणाचा जो काय निकाल लागावयाचा तो रणांगणावर लागला. आणि आतां पत्रापत्रीस प्रारंभ झाला. सामूगडच्या लढाईनंतर औरंगजेबानें शाहजहानला एक पत्र धाडिलें. त्यात त्यानें ‘प्रस्तुतच्या सर्व गोष्टी नाइलाजानें आपणास करणें भाग पडलें; तेव्हां माफी असावी’ म्हणून विनविलें होतें. या पत्रास औरंग-

जेबाचा मुक्काम नूरमंजीलमध्यें असतांना शाहजहानचें स्वदस्तुरचें उत्तर गेलें. त्यांत त्यानें मोठ्या ममतेनें औरंगजेबाची मुलाखत मागितली. हा खलिता घेऊन दरबारचे दोन मातबर वयोवृद्ध मानकरी धाडण्यांत आले. एक खाजगी कारभारी फजीलखान व दुसरा मोगल दरबारचा सरन्यायाधीश खलिलुल्लाखान. या त्या दोन व्यक्ति होत. याशिवाय बादशहानें कांहीं तोंडी निरोपहि धाडिले होते. या मानकऱ्यांची व औरंगजेबाची मुलाखत झाली. त्यांच्याजवळ त्यानें शाहजहानच्या मुलाखतीस येण्याचें कबूल केलें.

दुसऱ्याच दिवशीं त्या अधिकाऱ्यांची व औरंगजेबाची पुन्हां मुलाखत झाली. त्या दिवशीं बादशहाकडून कांहीं मौल्यवान चिजा व रत्नें बाक्षिसा-दाखल देण्यांत आलीं. त्यांत अलमगीर नावाची अतिशय प्रसिद्ध अशी समशेर बादशहानें औरंगजेबास बक्षिसादाखल दिली आणि भेटीस येण्याबद्दल पुन्हां आग्रह केला. त्या दिवशीं औरंगजेबाचा नूर पालटला होता. कारण आदल्या दिवशीं संध्याकाळीं त्याच्या विश्वासांतील माणसांनीं त्यास असें खात्रीपूर्वक सांगितलें होतें कीं, ' शाहजहानचें अजूनसुद्धां दारावर प्रेम आहे. त्याला मदत करण्याची धडपड सारखी चालू आहे. मुलाखतीच्या मिषानें तुम्हास आग्र्याच्या किल्ल्यांत बोलावून कैद करण्याचा बेत आहे !' फजीलखानानें हा त्याचा संशय फोल ठरविण्यासाठीं जंगजंग पछाडले पण त्यात त्याला यश आलें नाहीं. त्यानें बादशहास ही सर्व हकीकत विदित केली. यानंतर तिसरें पत्र घेऊन फजीलखान व खलिलुल्लाखान औरंग-ज़ेबाच्या भेटीस आले. त्यांनीं औरंगजेबाच्या मनांतील संशय दूर करण्याचा प्रयत्न केला, जिकीर केली, विनवण्या केल्या, अजीजीनें सांगितलें; पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यानें खलीलुल्ला-खानाची सडी मुलाखत घेतली. त्यानें औरंगजेबाचा संशय बरोबर असल्याची ग्वाही दिली. ' शाहजहानला कैद केल्याशिवाय त्या म्हाताऱ्याच्या त्रासातून तुमची मुक्तता व्हावयाची नाहीं,' असें बजाविण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. त्याबरोबर त्यानें शाहजहानची मुलाखत न घेण्याचें ठाम ठरविलें. लगेच फजीलखानास तसें स्पष्ट कळविण्यांत आलें कीं, खलीलुल्ला-खानास अटक झाली असून त्यानें एकट्यानेंच माघारा जावें, व मुलाखतीची

इच्छा नाहीं असें बादशहास स्पष्ट कळवावें. फर्जंदखानाकडून शाहजहानला ही हकीकत कळतांच, गोष्टी आवांक्याबाहेर गेल्या असून शिष्टाईचा मार्ग संपला; तेव्हां आतां आपल्यावर चाल होणार हें जाणून शाहजहाननें किल्ला लढविण्याचें ठरविलें. क्षणाक्षणाला औरंगजेबाकडून घातपाताचा संभव वाढत असल्याकारणानें त्यानें आपल्याभोंवतालचा बंदोबस्त कडेकोट ठेवला, आणि किल्ल्याचे दरवाजे बंद केले. किल्ल्याच्या तटावर बंदोबस्तासाठीं आपल्या विश्वासांतील कांहीं अधिकारी ठेविले. आणि १५०० तारतर लोकांची एक तुकडी सज्ज ठेविली. शाहजहान शेवटच्या प्रसंगास भिडण्यासाठीं म्हणून अशा प्रकारें सिद्ध झाला !

औरंगजेबाकडून आग्र्याचा किल्ला ताब्यांत घेण्यासाठीं खटपट सुरू झाली. झुलफिकारखान व बहादुरखान हे दोन सरसेनापति आपल्या लष्करासह किल्ल्याच्या पायथ्याशीं आले. त्यांनीं तटावर हल्ला चढविला. प्रथम तोफांचा मारा करण्यांत आला. एक तोफ जुम्मा मशिदीच्या तटावरून व दुसरी यमुनेच्या कांठाशीं असणाऱ्या दाराच्या राजवाड्याच्या तटावरून धूमधडाक्यानें डागण्यास प्रारंभ झाला. तोफांनीं भयकर आग ओकली; पण त्याचा किल्ला ताब्यांत येण्याच्या दृष्टीनें कांहींच उपयोग झाला नाहीं. किल्ल्याचें थोडेंबहुत नुकसान झालें इतकेंच. तोफांच्या माऱ्यानें त्याचा ताबा होणें अशक्य वाटलें. व तितकी सवडहि नव्हती. हें काम झटपट व्हावयास पाहिजे होतें. कारण सामूगडच्या लढाईतून शीरसलामत निसटलेला दारा दिल्लीला होता. पुरा न ठेचलेला साप वारा पिऊन बळ बांधतो त्याप्रमाणें दारा बळ बांधून लढत देण्यास सिद्ध होण्याची भीति होती ! दाराचा पुरा नायनाट व्हावयाचा होता. तेव्हां गडाचा ताबा तावडतोबीनें होणें अत्यंत जरूर होतें. म्हणून लष्करी अधिकाऱ्यांची सभा घेण्यांत आली आणि या प्रश्नाचा खल झाला. पुष्कळ भवति न भवति झाली. उपाय योजिला, व तो असा जालीम ठरला कीं किल्ला अवघ्या तीन दिवसांतच सर झाला !

या लष्करी मंडळानें गडाचें पाणी बंद करण्याचें ठरविलें. आग्र्याच्या गडाचा खिजरी नांवाचा एक दरवाजा यमुनेच्या पात्राकडे असून त्या बाजूनें

पाण्याचा पुरवठा होत असे. त्या दरवाजाचा ताबा घेऊन पाणी बंद करण्याचें ठरलें. औरंगजेबाच्या सैन्यानें कशाचीहि तमा न करतां खिजरी महाद्वाराचा ताबा घेतला आणि गडाचें पाणी तोडलें. पाणी बद होतांच मानवाचें जीवित किती जलमय आहे याची साक्ष किल्यांतील लोकांना पदोपदीं पटूं लागली. आणि यावर तोड काय करावी हेंच त्यांस सुचेना. मोगलांनीं हा किल्ला अभेद्य असा बांधिला होता; आणि हा पाण्याचा पेंच त्यांच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें. कारण सुजला अशी यमुना नदी शेजारूनच वाहत होती. तेंच पाणी खिजरी महाद्वाराच्या वाटे खेळविण्यांत आलें होतें. त्याच्या-शिवाय पाण्याची दुसरी व्यवस्था नव्हती. बारक्यासारक्या विहिरी होत्या पण त्यांचें पाणी कडू होतें. आणि त्या विहरींनासुद्धां आज कित्येक वर्षे उपसा नव्हता. त्या पाण्याकडे बघण्याचीहि सोय नव्हती. मग पिण्याची बातच नको. आंत बादशहाच्या सभोंवार वावरणारा नोकरवर्ग पोषाखी, दिखाऊ आणि गुलजार होता.

त्यांना तर हा प्रसंग प्राणान्तिक वाटला. पाण्यावांचून तडफडत तड-फडत प्राण सोडावा लागणार, या कल्पनेनें त्यांच्या हृदयानें ठाव सोडला व एका दिवसांतच तो वर्ग रकमेस आला ! पाण्यासाठीं कांहीं खटपट करण्याचा आव आणून व थापा मारून तो वर्ग पसार झाला. राहिलेला कांहीं औरंगजेबाच्या पैशानें निकालांत काढला. त्यांतूनहि जे कांहीं थोडे लोक निष्ठावन्त होते त्यांनाहि शाहजहानची केविलवाणी स्थिति फारसें अवसान देत नव्हती. त्या दिवसांतली ती रखरखीत हवा प्रत्यक्ष हिमालयाचें पाणी करीत होती; तेथें शाहजहानची कथा काय? ऐन सुखांत आणि विलासांत दिवस काढणाऱ्या बादशाही मंडळीस यमुनेच्या अत्यंत गोड व चवदार पाण्याची संवय. त्यांना तर हें पाण्याचें संकट फारच भयंकर वाटलें. वयोवृद्ध शाहजहानला त्या उन्हाळ्याच्या दिवसांत त्या विहिरींचें तें भिकार पाणी कंठाखालीं घोटेना. तेव्हां त्या यमयातना असह्य होऊन शाहजहाननें नाइलाजानें औरंगजेबाच्या पाषाण-हृदयास पाझर फोडणारें पत्र लिहिलें.—

"माझ्या मुला, तूं सिंहाचा छावा आहेस !

"दुर्दैवानें आणलेल्या या दिवसाबद्दल मला कुरकुर करण्याचें कांहींच

कारण नाहीं. अल्लाच्या इच्छेशिवाय झाडाचें पानसुद्धां हालत नाहीं हेंच खरें. कारण, माझ्या हुकमाबरोबर कालच हजारों हजार करोल समशेर म्याना-बाहेर निघत होती, तोच मी आज कुळचाभर पाण्यास महाग झालों आहे! धन्य ते हिंदु लोक—कीं जे मृताला पाणी देतात! त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गावीत तेवढीं थोडींच! आणि तूं माझा प्रत्यक्ष मुलगा, असला मासले-वाईक मुसलमान आहेस कीं, तुझा प्रत्यक्ष पिता पाण्याकारितां कंठशोष करीत आहे! या दो दिवसांच्या दुनियेंत तूं आपल्या सत्तेचा तोरा मिरवूं नकोस. या क्षणभंगुर जीवितानंतरचा मार्ग घनघोर अंधःकारानें व्यापला आहे. तो स्पष्ट दिसण्यासाठीं पुण्यकर्मांचे नंदादीप लागतात. गरिबांवर दया करण्यानेंच शाश्वत सुखाची प्राप्ति होते!”

या पत्रास— “या सर्व परिणामाचें आदिकारण आपणच आहांत; त्याला माझा इलाज नाहीं.” असें कठोर उत्तर तितक्याच निर्दयतेनें औरंगजेबानें धाडलें. यानंतर दोनतीन दिवस अशाच अटी-तटीच्या उत्तराप्रतिउत्तरांत निघून गेले. आणि मग मात्र शाहजहानची निराशा शेवटच्या बिंदूला पोंचली. पाण्यावांचून त्याचा प्राण चालला होता, कल्पान्तापर्यंत पोंचलेल्या निराशेच्या ज्वाळा एकसारख्या भडकत होत्या आणि शाहजहानचें मन झगरांत धरलेल्या कणसाप्रमाणें एकसारखें तडकत होतें. जिवाची जिकीर चालू होती. प्राणहि पटकन् जात नव्हता. तेव्हां या जिवंत मरणाच्या यमयातना असह्य होऊन शाहजहाननें दुसरें एक पत्र औरंगजेबास लिहिलें. त्यांत त्यानें सर्व दोष आपल्या दैवाला दिला होता. आणि औरंगजेबानें आपला दुर्लौकिक टाळण्यासाठीं पवित्र कुराणास मान द्यावा, व अभूतपूर्व अशा भाग्यशाली मोंगल सम्राटांच्या लौकिकास कालिमा फासूं नये, या यातनांतून त्यानें आपणास मुक्त करावें, असें बजावलें होतें.

या पत्राचा योग्य तो उपयोग झाला. “आग्र्याच्या किल्ल्याचीं महाद्वारें शाहजहाननें आपल्या अधिकाऱ्यांना खुलीं करून द्यावीत व माझ्या मनांतील संशयनिवृत्ति करावी; म्हणजे मी त्याच्या इच्छेप्रमाणें वागेन. त्याला तापदायक असें कोणतेंच कृत्य करणार नाहीं.” असें औरंगजेबानें

कळविलें. यानंतर आग्र्याच्या किल्ल्याचा रीतसर ताबा झाला. शाहजहानचा अधिकारीवर्ग दूर करण्यांत येऊन त्या ठिकाणीं औरंगजेबानें आपले अधिकारी नमले. जामदारखान्यांतील खजिना, जडजवाहीर, मौल्यवान् वस्त्रेप्रावरणें व इतर उंची सामान नूतन अधिकाऱ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें व तें सीलबंद करून ठेवण्यांत आलें. अशा प्रकारें मोगल सम्राटांनीं पिढ्यान्‌पिढ्या सांठविलेली संपदा औरंगजेबाच्या ताब्यांत आली.

विधिघटना अशी कांहीं चमत्कारिक, कीं गडाबरोबर शाहजहानचाहि ताबा झाला ! वास्तविक बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या स्थावर जंगम मिळकतीचा कब्जा लेक घेतो. पण जिवत पित्याचा अशा तऱ्हेनें ताबा झाल्याचें उदाहरण नमुन्यादाखल एखादेंच सांपडावयाचें यानंतर दुसरा एक विचित्र प्रकार म्हणजे साक्षात् आजोबावर पहारा करण्याचा विचित्र प्रसंग नातवावर आला ! शाहजहानवर सक्त पहारा करण्याचें काम सुलतान महंमदवर सोंपविण्यांत आलें. शाहजहानची सर्व सत्ता नष्ट झाली. शाहजहानचा कोण दिमाख ! तो म्हणजे राजांचा राजा, बादशहांचा बादशहा ! पण आतां तो गरीबांतला गरीब व गुलामांतला गुलाम झाला ! त्याची सर्व बाजूंनीं नाकेबंदी झाली.

पाणी प्राशन केल्यानंतर शाहजहानचा जीव भांड्यांत पडला असेल खरा, पण तें जिणें मृतवत् होतें. त्याचें तें तसलें भयाण जगणें चालू होतें !

कालरहाट नित्याप्रमाणें फिरत होता, पण त्याची ती किरकिर दुर्नियेच्या गोंगाटांत ऐकूं येत नव्हती !

---

आकाशांत भिरकावण्यांत आलीं !

ते नाहींसे झाले !

दीड–दोन पुरुषांच्या उंचीवरून तीं तितक्याच जोरानें धप्कन् खालीं पडलीं !

धुराळा उडाला; पुन्हां सामसुम झालें !

राजापासून रंकापर्यंत सर्वांचें निर्विकार मनानें स्वागत करणाऱ्या धरणी-मातेचें अंतःकरण विव्हळलें. तिनें दुःखाचा चीत्कार धुराळ्याच्या रूपानें सोडला.

तीं शिरें होतीं,–आणि मोगल सैनिकांनीं छिन्नविछिन्न करून अस्मानांत भिरकावून दिलीं होतीं !

आतां एक मराठा धांवत गेला, त्यानें तीं उचलून आणिलीं आणि त्यांस अग्नि दिला !

भवितव्यता कोणावर काय प्रसंग आणील याचा नेमच नाहीं ! तीं शिरें फार मोठ्या मातबर गृहस्थांचीं होतीं. एकानें तर दख्खनच्या राजराजे-

श्वराचीं किरीटकुंडलें धारण केलीं होतीं. क्षत्रियकुलावतंस गोब्राह्मणप्रतिपालक वगैरे नामांकित विशेषणांनीं शोभायमान झालेली बिरुदावलि त्याच्या आगमनप्रसंगीं भालदार ललकारत होते. चौऱ्या–मोरचेल वारलीं जात होतीं. हजारों समशेरींचे मुजरे व तोफांच्या नौबदी झडत होत्या. असें इंद्राचें वैभव ज्यानें हयातभर उपभोगिलें त्यास मरण त्याच्या राज्यांत येतें तर त्याचा अन्त्यसंस्कार चंदनाच्या इंधनांनीं आणि कापराच्या राशींनीं करण्यांत आला असता. चतुरंग दलाच्या लष्करी सलाम्या झडल्या असत्या !—पण तसें घडलें नाहीं ! तो राजा आणि तो प्रधान—दोघेहि हीन मरणानें मेले ! !

तुळारीं त्या लहानग्या चितांतून भस्मसात् झालेलीं तीं दोन शिरें म्हणजे एक छत्रपति संभाजीमहाराजांचें, व दुसरें कलुषा कबजीचें ! संभाजीची गर्दन मारून औरंगजेबास समाधान झालें असेल, पण त्या असुरी कृत्यानें महाराष्ट्राच्या या नंदनवनाचें रूपान्तर पिशाच्चभूमींत झालें ! जो तो या अचाट खुनाच्या भेसुर निशेनें बेहोष झाला, आणि अवघा महाराष्ट्र एकाच विचारानें घुमूं लागला; सह्याद्रीच्या गिरिकंदरांतून आणि पहाडा-पहाडांतून ‘ या खुनाचा सूड ’ ‘ या खुनाचा सूड ’—हा एकच ध्वनि आणि प्रतिध्वनि निनादूं लागला ! प्रत्येक मराठ्याच्या अंतःकरणांतील महाराष्ट्र–महिषासुरमर्दिनीनें उग्र स्वरूप धारण केलें; आणि त्याचा परिणाम अल्मगीर बादशहास भोगावा लागला ! विद्युत्वेगानें धांवणाऱ्या त्याच्या मनोरथाचे घोडे जागच्या जागीं छाटले जाऊन त्याचे मनोरथ कोलमडून खालीं पडले. महाराष्ट्रमुद्धां हिंदुस्थान पादाक्रान्त करून इतिहासांत अलमगीर म्हणून आपलें नांव दाखल करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा तशीच राहून, त्यास याच महाराष्ट्रांत धाय मोकलून प्राण सोडण्याचा दुर्धर प्रसंग आला !

मराठेशाही गाडून टाकण्याची घोर प्रतिज्ञा करून दिल्लीचा दिल्लीपति औरंगजेब दख्खनमध्यें दाखल झाला !

बादशहाचें दैव थोर. त्याच्या हाताला धडाक्याबरोबर यशहि पण फार मोठें आलें. एखाद्या वारुळांत हात घालून भुजंग बाहेर काढावा आणि

हिसड्याबरोबर ठार करावा,–तशी त्यानें मराठ्यांच्या राजराजेश्वराची दशा केली !

संभाजीची कारकीर्द म्हणजे अजब तडाकाच ! शिवाजीनंतर त्याला बाजूला सारून राजारामास तक्तनशीन राजा करून राज्य चालविण्याचें मुत्सद्दी मंडळाचें तकलुपी राजकारण संभाजीच्या आडदांड प्रकृतीस मानवलें नाहीं. त्याचा संताप अनावर झाला, आणि त्यानें अनेक मातबर मुत्सद्यांच्या कचाकच मुंड्या मुरगाळून सिंहासनाची वाट मोकळी केली, आणि राजारामाच्या आईस–सोयराबाईस भिंतींत चिणून ठार केलें ! घरीं घरभेदाचा असा घनघोर वणवा भडकला असतां औरंगजबासारखा बलाढ्य शत्रु लक्षावधि फौजेनिशीं दारांत येऊन अंगावर कोसळला. पण कच न खातां संभाजीनें मोगल बादशहाशीं मोठ्या धडाडीनें झुंज घेतली, आणि त्यास ' दे माय धरणीं ठाय ' केलें आज राजापूर तर उद्यां भडाच. परवां हबसाणांत तर तेरवां फोंड्यावर—असा तो एकसारखा गरुडाप्रमाणें झेंपी टाकीत होता व अनेक मुलुख मारत होता. चौफेर नजर राखून त्यानें मराठ्यांची भालाबरची बहादुरीनें चालविली. त्याच्या मनगटांतील दिल्लीश्वराच्या मनगटाला मनगट भिडविण्याची रग शेवटच्या हल्ल्यापर्यंत पहिल्या हल्ल्याइतकीच रंगेल होती ! संभाजी 'शेरका बच्चा' होता !–पण तो चंगीभंगी होता, आणि त्यानेंच त्याचा कपाळमोक्ष झाला ! कबजीबरोबर मंत्रतंत्राच्या ढंगांत दंग असतां दुष्मनानें दावा साधला, आणि मराठ्यांचा समशेरजंग बादशहा मोगलाचा कैदी झाला !

मोगल बादशहा औरंगजेब म्हणजे इतिहासांत नमुन्यादाखल निर्माण झालेली मासलेवाईक व्यक्ति. त्याच्या हृदयाचे रंग प्रसंगाप्रसंगानें बदलत. त्याच्या कमरेला लटकणाऱ्या समशेरीला क्रौर्याची आणि शौर्याची दुहेरी धार असे, व ती कडक धर्मनिष्ठेच्या म्यानांत म्यान केलेली. दृष्टि स्वार्थावर खिळलेली,–नव्हे नव्हे–स्वार्थ हाच त्याचा परमार्थ होता ! तो साधण्या साठीं त्यानें भावाचा खून केला !–बापास कैदखाना दाखविण्यास कमी केलें नाहीं !! अशा इरसाल वृत्तीच्या औरंगजेबाच्या हातीं संभाजी जिता लागतांच सहस्र जिभांनीं तांडवनृत्य करणाऱ्या धगधगीत ज्वालामुखींत

एखादें पाचट बेचिराख व्हावें तसें झालें. त्यानें संभाजीची सात पाट काढून उंटावरून विदूषकी पोशाखांत धिंड काढली. एकाचे डाळे-तर दुसऱ्याची जीभ छाटली. त्यांना तसूतसूनें ठार केलें. मांस घारी-गिधाडांना आणि कोल्ह्याकुत्र्यांना फेंकून दिलें. दोघांच्या डोक्यांत भुस्सा भरून तीं भाल्याच्या टोंकावर बसविलीं आणि ताशे-वाजंत्रीं लावून गांवोगांव मिरवलीं. शेवटीं विटंबनेची कोणतीच तऱ्हा शिल्लक न राहिल्यानें तीं फेंकून देण्यांत आलीं. त्यांस एका मराठ्यानें अग्नि दिला !

हा हृदयविदारक प्रकार एक मराठा सरदार उघड्या डोळ्यांनीं पहात होता. त्याचें अंतःकरण अहोरात्र होरपळून निघत होतें. सूडाची नशा त्याच्या मनाचा ताबा एकसारखा घेत होती. काय करावें व काय करूं नये हेंच त्यास कळत नव्हतें. विकाराच्या पर्वतप्राय लाटांखालीं त्याच्या जिवाचा कोंडमारा होत होता. सर्व शक्ति एकवटून ब्रह्मांडाचा एकच ग्रास घ्यावा, आणि तसें करतां करतां पंचप्राणांचें घोर बलिदान करून मोकळें व्हावें असें त्यास एकसारखें वाटत होतें. कारण संभाजी महाराजांच्या धरपकडींत त्याचा बाप म्हाळोजी घोरपडे मारला गेला. आणि त्याच्या राजराजेश्वराच्या विटंबनेला तर पारच उरला नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा पुरेपूर सूड घ्यावा, हा विचार त्याच्या मनांत एकसारखा घोळत होता. पण त्याला हवी असणारी संधि मात्र येत नव्हती. औरंगजेबाच्या प्राणाशीं गांठ घालणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. त्याचें सामर्थ्य फार अचाट होतें.

बादशहाच्या स्वारीचा तळ म्हणजे पांच-सात मैल लांबी-रुंदीचें एक भव्य शहरच. चालती-बोलती दिल्लीची राजधानीच ती. लक्षावधि सशस्त्र सैनिकांच्या मध्यावर बादशहानें आपला ठिय्या दिला होता. तोंडें शिलगावून फिरणाऱ्या हजार हत्तींचा टेहळता पहारा त्याच्याभोंवतीं खडा असे. तेव्हां असल्या सामर्थ्यवान बादशहाचा प्राण घेऊं पहाणें म्हणजें बिलटासारखा शिलशिलाटच व्हावयाचा. राईराईएवढे तुकडे उडावयाचे. पण ही अफाट कल्पना बाळगणारा वीर सन्ताजी घोरपडे हाहि पण असाच अफाट होता !

चंद्रसूर्याला ग्रासूं पाहणाऱ्या मेघमालेचा पसारा आकाशाला व्यापतो आणि त्याच्या डरकाळ्यांनीं दुनिया हादरते, पण विजेचें तेजस्वी पातें फिरूं लागतांच मेघाचा जगड्व्याळ ढोल धरणीवर कोसळतो. मराठे आणि मोगल यांची गांठ म्हणजे अशांतलाच प्रकार. मोगल सैनिक ताडमाड उंच, आणि पंचहत्यारें कसून उभा राहिला म्हणजे राक्षसालासुद्धां थरकांप भरावा. पण हे अजगरअल्ली जागचे हालतील तेव्हां. हे रणनवरे रणावर दाखल होण्यापूर्वींच जयश्रीचें अपहरण व्हावयाचें. याच्या उलट मराठ्यांची स्थिति. मराठा जवान म्हणजे औट हात उंचीचा, सडपातळ, सडसडीत—अगदीं अंगाबरोबर. क्षणांत भिमथडी तट्टावरून दौड मारील, क्षणांत सह्याद्रीच्या माथ्यावर दिसेल. क्षणांत पार पाताळापर्यंत पोहोंचलेल्या दरडीच्या तळाशीं जाऊन अस्मान टेहळत कौतुकानें उभा राहील. केव्हां शत्रूला पाहून पळत सुटेल, केव्हां त्याला अंगावर घेऊन हग्या मार देईल. हुरड्याचीं कणसें हातावरच्या हातावर चोळून केव्हां फाक्या मारीत, तर केव्हां उपाशी—तापाशींच शत्रूवर तुटून पडेल. केव्हां काय करील व केव्हां काय न करील—याचा नेमच नाहीं. त्याची भाला—बरची केव्हां कोणता पराक्रम गाजवील त्याचा अन्त प्रत्यक्ष परमेश्वरालासुद्धां लागावयाचा नाहीं, मग इतरांची कथा काय !

छत्रपति संभाजी महाराजांचें मुंडकें मारून औरंगजेबानें मावळ मराठ्यांचा क्रोधाग्नि चेतविला; आणि तो मोगलाभोंवतीं एकसारखा तेवत ठेवण्याचें कार्य संताजी घोरपड्यानें मोठ्या ईर्षेनें चालविलें. मराठ्यांचा राजा तडाक्याबरोबर हातीं लागल्यानें मोगलास मस्ती चढली, आणि त्यांचा मस्तवालपणा चालू झाला. साल्हेरपासून पन्हाळापावेतोंच्या प्रदेशांत घुसून त्यांनीं हैदोस घातला. राजगड, रोहिडा व तोरणा हे किल्ले बादशहाच्या हातीं ताबडतोब गेले. त्या वेळीं राजारामाचा मुक्काम प्रतापगडावर होता. त्याला ही बातमी लागतांच मोठी चिंता पडली, मोगलास पायबंद कसा घालावा या विवंचनेंत तो होता. इतक्यांत मोगल फौजा प्रतापगडावर चालून येऊं लागल्या. तेव्हां प्रतापगडावरून राजाराम पन्हाळ्यास गेला. तेथें त्याचा मुक्काम दोन महिने होता. त्या अवधींत मोगलांनीं प्रतापगडहि

घेतला; आणि राजाराम पन्हाळ्यावर आहे असें कळतांच त्यांचा मोर्चा तिकडे वळला. तेव्हां हें मुलतानी सुदर्शन चुकविण्यासाठीं राजारामानें वेषान्तर करून गुप्तपणें जिंजीस जावें व रामचंद्रपंत अमात्यानें विशाळगडीं राहून महाराष्ट्रांतील मोहीम चालवावी असें ठरलें. आणि त्याप्रमाणें जिकडे तिकडे खलिते रवाना झाले.

इकडे या व्यवस्था चालू होत्या तोंच मोगलाचा वेढा रायगडास पडला. आणि दुर्दैवानें मराठ्यांची महाराणी येसूबाई या वेढयांत सांपडली. आतां तर मोगलानें मराठयांच्या काळजालाच हात घातला ! त्याबरोबर रायगडाचा वेढा ढिला करण्याचे प्रयत्न सुरू झाले. मराठयांनीं मोगलांची लांडगेतोड चालविली. मोगल बादशहाला मराठयांचा हिसका दाखवावा ही संताजी घोरपड्याची फार दिवसांची खुमखुमी आतां एकदम उसळून वर आली, व तो त्या मार्गानें प्रयत्न करूं लागला ! तुळापुरीं बादशहाच्या छावणीवर छापा घालावा आणि मैदानांत आमने-सामने झुंज घ्यावी, त्याखेरीज रायगडची पक्कड ढिली पडावयाची नाहीं असें ठरलें. त्याप्रमाणें मराठयांचें लष्कर तिकडे निघालें. या सेनेचें सर-सेनापतिपद धनसिंगराव जाधवाकडे होतें. व त्याच्यासमवेत पोट–सरदार म्हणून संताजी घोरपड्याचें पथक सामील झालें होतें. मराठयांच्या या स्वारीची बातमी बादशहाला कळतांच रणमस्तखान व शास्ताखान या दोघांची रवानगी बंदोबस्तासाठीं झाली. बादशाही फौज दोन मुक्कामांवर मराठयांस आडवी आली. तेव्हां संताजी धनाजीस म्हणाला—

“ छत्रपति संभाजीमहाराजांचें डोकें मारणाऱ्या आणि म्हाळोजीबाबास —माझ्या पित्यास ठार करणाऱ्या औरंगजेबाची हड्डी नरम करण्याची माझी फार दिवसांची इच्छा आहे. बादशहाची फौज सामने येत आहे. तेव्हां आपण फलटणच्या बाजूस तिच्याशीं गांठ घालूं. माझ्याबरोबर दोन हजार निवडक एकांडा द्या. त्याशिवाय माझे लोक आहेतच. त्यांसमवेत खुद्द बादशहावर छापा घालतों आणि त्याचा खुर्दा खुर्दा करतों ! ”

संताजी घोरपडयाचे हे धडाडीचे शब्द ऐकतांच धनसिंगराव जाधवास अतिशय आनंद झाला. त्यानें ‘शाबास बहाद्दर–शाबास !’ म्हणून संताजीची

पाठ थोपटली, आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्याच्या पथकाशिवाय दोन हजार निवडक एकांडा दिला. याशिवाय विठोजी चव्हाण यासहि दिलें.

धनाजीकडून असें उत्साहवर्धक साहाय्य मिळतांच संताजी आतां वाऱ्यासारखा निघाला. प्रथम डोंगराच्या आश्रयानें मार्ग आक्रमण्यास प्रारंभ झाला. जेजुरीस श्रीचें दर्शन घेतलें, आणि दिव्याच्या घाटाखालीं जाऊन झाडींत मुक्काम टाकला. मध्यरात्रीच्या अमलांत तुळापुरीं जावयास निघाले. अलीकडे तीन कोसांवर जातात तोंच महान् संकट उभें राहिलें. छबिन्याच्या स्वारांची नि यांची गांठ पडली; आणि आतां ठांटू होणार—तोंच संताजीनें त्यास हां हां म्हणतां चकविलें. 'बादशहाच्या लष्करांतील हिंदु सरदार शिर्के, मोहिते वगैरे आहेत त्यांकडे छबिन्यास (पहाऱ्यास) गेलों होतों. मोबदल्यास आहे म्हणून माघारीं चाललों.' हे खुणेचे बोल पटल्यामुळें त्यानें त्यास वाट दिली आणि संकट टळलें !

आतां सन्ताजीचा मार्ग निष्कंटक झाला. त्याच्या नसानसांतून सिंहाचा आवेश सळसळूं लागला. आणि तो झांपा टाकीतच चालला. त्यानें लष्करांत शिरून बादशहाच्या तंबूवर बेशक छापा घातला. लक्षावधि मोगल फौज भोंवतालीं खडी असतां केवळ तीन हजार स्वारांनिशीं चालून जाऊन पुष्कळच नासधूस केली. चिकार मारपीट झाली; तिथे घोरपडे बंधु व चव्हाण यांनीं बादशहाच्या तंबूचे तणावे तोडले. त्याबरोबर तंबू खालीं कोसळला ! आतां गोणपाटांत सांपडलेली घूस टिकारण्यानें ठोकावी त्याप्रमाणें आपण बादशहाची त्रेधा करतों असें त्यास वाटलें. आणि तावातावानें पुन्हा एकदां जोराची कापाकाप झाली. पण बादशहास या वेळीं मरण यावयाचें नव्हतें,—तो तंबूंत नव्हता !! लेकीकडे खान्यास गेला होता म्हणूनच वांचला. नाहीं तर संभाजीच्या वधाचा मोबदला बरोबर घेतला गेला असता. पण 'संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें ईश्वरी इच्छा उभी असते' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं ! या अचाट हल्ल्याची खूण म्हणून बादशहाच्या डेऱ्याचे सोन्याचे दोन्ही कळस कापण्यांत आले. या हल्ल्यांत सन्ताजी घोरपड्याचे थोडेबहुत लोक कामास

आले. यानंतर बादशाही फौजेचे दुभाग करून गटानिशीं निघोन सिंहगडाचे झाडींत आले.

गडावर प्रतापराव गुजराचा लेक सिदोजी गुजर होता. त्यास हें वर्तमान कळतांच तो बाबेंडतोब खालीं आला. त्यानें मोठ्या आनंदानें सन्ताजीची मुलाखत घेतली, व त्याच्या या अफाट साहसाबद्दल प्रथम त्याचें हार्दिक अभिनंदन केलें. नंतर जखमी लोकांची वास्तपुस्त करण्यांत येऊन त्यांची नीट व्यवस्था लावण्यांत आली. याप्रमाणें निरवानिरव करण्यांत दोन दिवस गेले. दोन दिवसांच्या विश्रान्तीनंतर हा रणझुंजार पुन्हा तितक्याच तडफेनें बाहेर पडला. त्यानें रायगडास वेढा घालून बसलेल्या झुल्फिकारखानाच्या सैन्यावर जोराचा हल्ला चढविला, आणि त्याचा पुष्कळच खराबा केला. खानाचे पांच हत्ती हातास लागले. त्यांस बरोबर घेऊन महाराजांचे दर्शनासाठीं पन्हाळ्यास दाखल झाला. औरंगजेबाच्या चढाईमुळें पन्हाळ्याहून राजाराममहाराजांचा मुक्काम हालण्याच्या आंतच हा सर्वस्वी शुभ आणि विजय–प्रसंग घडून आला !

राजाराम महाराजांचें दर्शन होतांच बादशहाच्या डेऱ्याचे कळस व पांच हत्ती पुढें केले, व सर्व वृत्तान्त निवेदन केला. संताजीचा हा पराकोटीचा पराक्रम पाहून राजाराम महाराज अत्यंत खुष झाले ! संभाजीचा वध झाला त्याच ठिकाणीं संताजीनें बादशाही छावणीवर छापा घातला व डेऱ्याचे कळस कापून आणिले म्हणून राजाराम महाराजांनीं त्यास महावस्त्रें व भूषणें देऊन त्याचा गौरव केला. संताजी घोरपड्यास या मर्दुमकीबद्दल ममलकत मदार ( देशाचा आधार ) ही किताबत देण्यांत आली. तसेंच दुसरे बंधु बहिर्जी घोरपडे यास ' हिंदुराव ' व तिसरे बंधु मालोजी घोरपडे यास ' अमीर उल् उमराव ' आणि विठोजी चव्हाण यास ' हिम्मतबहाद्दर ' अशा किताबती दिल्या. पण संताजी घोरपड्यांनीं गाजविलेल्या पराक्रमाच्या मानानें त्यास मिळालेला मोबदला रामचंद्रपंत अमात्यास अपुरा वाटला. तेव्हां त्यानें महाराजांस सक्त विनंति केली कीं, " संताजीचा पराक्रम अति पराकाष्टेचा,—किताबत दिली ही त्यास योग्य नव्हे; आपले फौजेंत सेनापति नाहीं; सबब घोरपडे यांस सेनापतीचीं वस्त्रें

द्यावीं ! मर्दुमकी बहुत केली. बादशहाचें नरडेंन फोडावयाचें — पण दिल्ली-पतीचें भाग्य थोर, —त्यास मरण यावयाचें नव्हतें, इतकेंच ! तरी डेऱ्याचे कळस कापून आणिलेच. याशिवाय झुल्फिकारखानाचे पांच हत्तीहि ठोकून आणिले. यापेक्षां त्यांची मर्दुमकी कोठवर वर्णावी ! यास्तव स्वामींनीं कृपा करून पदाधिकार द्यावा.” हें ऐकून महाराज बोलले कीं, “आमचे मनांत धनसिंगराव यांस हें पद द्यावें असें होतें. पण तुमची मर्जी यांस देण्याची—तरी देतों.” असें सांगोन सेनापतिपदाचीं वस्त्रें संताजी घोरपड्यास शके १६१० श्रावण शु. ५ स दिलीं !

सन्ताजी सरसेनापति झाला. भर दरबारांत मानाचे मंदील बांधिले गेले. पण याच वेळेपासून त्याची मान धडावेगळी करणारी छुपी समशेर त्याच्या नरड्याभोंवतीं घोटाळूं लागली. धनाजीस मिळणारा पदाधिकार संताजीस मिळाला म्हणजे भलतेंच झालें ! धनाजीच्या हुकमतींत संताजीनें वागावें, पण तसें न होतां सरसेनापति सन्ताजीस कुर्निसात करून त्याच्या हुकमाची तामिली करण्याचा प्रसंग धनाजीवर आला ! त्याबरोबर पालथा पलिता उफाळून पेटावा तसें झालें. धनाजीचा मत्सराग्नि भडकला. पण सन्ताजीच्या पराक्रमाची दाहकता इतकी भयंकर होती कीं, असले अस्तनीं-तील निखारे कांहीं काळ जागच्या जागीं कोळपून राहिले. बघतां बघतां दिवस कांसराभर यावा व त्याच्या अपूर्व दीप्तीनें अखिल भूभाग तेजोमय व्हावा तसें झालें. संताजी सरसेनापति झाला, आणि त्याच्या पराक्रमानें महाराष्ट्राचें मुख उजळून निघालें. मराठ्यांस मूठभर मांस चढलें आणि मोगलाचें अंतःकरण भीतीनें हबकूं लागलें !

सन १६९५ ची विजयादशमी उगवली. त्या दिवशींचा दरबार मोठ्या थाटाचा झाला. रामचंद्रपंतानें त्या सुमुहूर्तानें अख्खा मोगल बुडवून टाकण्याचा मोठा जोमदार घाट घातला. कांहींनीं जुन्नरमार्गे वऱ्हाडांत घुसून उत्तरेकडील प्रदेश उध्वस्त करावा व कांहींनीं दक्षिणेंत तुंगभद्रेच्या प्रदेशांत प्रवेश करून जिंजीवरचा दाब उठवावा असें ठरलें. लगेच कार्यास प्रारंभ झाला.

मराठ्यांच्या या नूतन चढाईची बातमी औरंगजेबास लागतांच त्यानेंहि

पण आपल्या हालचाली सुरू केल्या. तुंगभद्रेकडे वळलेल्या संताजी–धनार्जीचा बंदोबस्त करण्यासाठीं खातरजमेचा योद्धा म्हणून कासीमखानास धाडण्यांत आलें व त्यास मदतीदाखल खानजादखान, सफशिकानखान, महंमद मुरादखान वगैरे बडेबडे भरंवशाचे सरदार बादशाही हुकमानें निघाले असें हें बड्या बड्या खानांचें मंडळ कासीमखानाच्या मदतीस दाखल होतांच त्यास मोठें समाधान वाटलें, व त्यांच्या सन्मानार्थ मोठा खाना देण्याचें ठरविलें. खान्याची तयारी बादशाही थाटाची झाली. मोगली वैभव भरघोंसपणें चमकूं लागलें. पण हा बेत आपल्या भक्ष्यावर बहिरी ससाण्याप्रमाणें अचूक झडप घालणाऱ्या सन्ताजीची दखल न बाळगतां केला जात होता. कासीमखानानें डोळे मिटून खान्याचा बेत चालविला होता, पण शत्रूचीं मर्मस्थानें बरोबर हेरणाऱ्या सन्ताजीस या बेताची खित्तंबातमी होती. त्यानें तीन टोळ्या करून तिघांनीं तीन दिशांनीं नेमक्या वेळीं आणि नेमक्या स्थळीं हल्ला चढविला. त्याबरोबर खानाची घाबरगुंडी उडाली. त्यानें दुंडेरीच्या गढीचा आश्रय घेतला. पण गांठ सन्ताजीशीं होती. त्यानें त्यास गढींत कोंडलें व असा बेजरब मारा केला कीं खानाचें सैन्य खता झालें; आणि अन्नपाण्यावांचून टांचा घांशीत प्राण सोडण्याचा प्रसंग त्याच्यावर आला. त्यानें या फजित-वाड्यांतून मुक्त होण्यासाठीं आत्महत्या केली. कासीमखान नाहींसा होतांच खानजादखानानें मोठ्या मिनतवारीनें सन्ताजीकडून आपली सुटका करून घेतली. खानजादखान म्हणजे मोगल दरबारांतील फार मोठा जोरदार सरदार, पण सन्ताजीनें त्याची दशा–दुर्दशा केली !

कासीमखानास या प्रसंगांतून सोडविण्यासाठीं मोगल दरबारांत पुष्कळच धांवाधांव झाली. हिंमतखान वगैरे सरदार तांतडीनें निघाले, पण ते येण्याच्या आंतच कासीमखानाची चटणी उडाली ! हिम्मतखानाची बातमी लागतांच सन्ताजीनें तितक्याच तडफेनें बसवापट्टणजवळ त्याच्याशीं गांठ घातली. जोराची खणाखणी झाली. त्यांत हिंमतखान व त्याचा मुलगा ठार झाला ! !

हां हां म्हणतां सन्ताजीच्या समशेरीनें गाजविलेल्या पराक्रमानें सन्ताजीची

कीर्ति दिगन्त झाली. मोगलानें धास्ती घेतली, आणि बादशाही सामर्थ्याचा निकाल लागणार असें वाटूं लागलें. पण आपसांतील दुहीनें महाराष्ट्राचें वाटोळें झालें ! !

*   *   *

सन्ताजी आणि धनाजी या दोघांच्या स्वभावांत जमीन–अस्मानाचें अंतर. सन्ताजी कडवा लष्करी शिस्तीचा, तर धनाजी ढिल्या प्रकृतीचा. फौजेंत जनानखाना नको, लष्करी हुकमांची तामिली कांटेतोलपणें झालीच पाहिजे, सुतळीच्या तोड्यासुद्धां लष्करी लुटीचा झाडा दिलाच पाहिजे इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत सन्ताजीची शिस्त म्हणजे धारवाडी कांटा. रतीभर इकडे तिकडे खपावयाचें नाहीं. याच्या नेमकी उलट धनाजीची स्थिति होती. ‘घोड्या, वाटेल तसा तूं चाल’ असा त्याचा कारभार होता. लष्करावर त्याची कदर नसे. तेव्हां साहजिकच दोघांच्या पथकांत दाखल होणारे सरदार–लोक सन्ताजीवर नाखुश व धनाजीवर खुष असत. त्यांचा त्याच्यावर लोभ जडे; यामुळें सन्ताजीस धनाजीचा हेवा वाटे आणि तो त्यास घालून पाडून बोले. याशिवाय सन्ताजी म्हणजे ताठ माणूस. नेहमींच दणकत चालणारा; प्रत्यक्ष छत्रपतींशीं मुद्दे घालण्यास न कचरणारा. मेचून वागणें त्यास ठाऊकच नाहीं. पण यानेंच त्याचा घात झाला !

‘राजश्री स्वामींजवळ मुद्दे घालूं नयेत. मर्यादेनें घ्यावें’ ‘राजश्री स्वामींजवळ मुद्दे घालूं नयेत. मर्यादेनें घ्यावें’ असें रामचंद्रपंतानें वारंवार लिहावें व सन्ताजीनें आपल्या वागणुकीचा राबता जशाचा तसा ठेवावा असें चाललें होतें. पण सन्ताजीच्या या वागणुकीचा फायदा धनाजीनें बरोबर घेतला. राजारामाचें मन सन्ताजीबद्दल पूर्णपणें कलुषित झालें. आणि ही आग भलतीच भडकली ! मोगल बुडवून टाकण्याच्या दृष्टीनें रामचंद्रपंतानें आंखलेल्या नवीन चढाईत मोगल दरबारांतील अहिरावण-महिरावणांचीं डोकीं मारून साठ लाखांच्या ऐवजासह सरसेनापति सन्ताजी मोठ्या दिमाखानें राजारामाच्या दरबारीं मुजऱ्यास दाखल झाला ! आपण गाजविलेल्या पराक्रमानें छत्रपति राजाराम महाराज खुष होतील आणि दरबारीं आपलें कौतुक होईल असें सन्ताजीस रास्तपणें वाटत होतें. पण झालें मात्र भलतेंच !

संताजीची व राजारामाची मुलाखत होतांच चकमक उडाली. आणि बढतीच्या ऐवजीं बडतर्फी झाली ! धनाजी सरसेनापति झाला व संताजीचा पदाधिकार नाहींसा झाला. बडतर्फीचा हुकूम झाला तरी तो धाब्यावर बसवून संताजीनें आपली दंडेली तशीच चालविली. त्याबरोबर राजाराम महाराज होळीसारखे भडकले, व त्यांनीं संताजीस पकडून शिक्षा करण्याचा हुकूम सोडला. याचा परिणाम मात्र फार घातक झाला. संताजी–धनाजीची चांगलीच जुंपली. हे दोन सरलष्कर आयेवारकुटीवर एकमेकांस भिडले. घनघोर संग्राम झाला. त्यांत धनाजीचा पराभव झाला, आणि त्या लढाईत नागोजी मान्याचा मेव्हणा अमृतराव निंबाळकर धनाजीच्या बाजूनें लढत असतां संताजीनें त्यास हत्तीच्या पायीं लोटून ठार केलें. आणि लगेच दुसऱ्याच दिवशीं हात बांधून तो राजाराम महाराजांचे मुलाखतीस दाखल झाला. त्यानें त्यांस सवाल केला कीं, 'धनाजीचा दिमाख माझ्यापुढें नाहीं. केवळ माझ्या बाहुबलाचा चमत्कार दाखविण्यासाठीं कालची गोष्ट झाली. इतःपर आपण माझे धनी व मी आपला चाकर!' संताजीच्या या मखलाशीचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. बंडखोर संताजीस नेस्तनाबूत करण्याचें राजारामानें ठरविलें आणि त्यास पकडून आणण्याचा हुकूम त्यानें धनाजीस दिला !

गगनांतून धरणीवर कोसळलेला तारा काळा ठिक्कर पडतो तसें झालें ! संताजीचा पदाधिकार नाहींसा होतांच तो हतप्रभ झाला. मराठ्यांच्या दरबारांत आपल्या पराक्रमाच्या तेजाळ चारित्र्यानें झळाळणारा हा पुरुषसिंह राजकारणाच्या तेढ्या तिढ्यांत गवसला गेला, आणि ते पाश ढिले पडण्याऐवजीं त्याच्या मस्तवाल वागणुकीनें आवळत चालले. संताजीला पकडून आणण्याचा हुजूरहुकूम हातीं पडतांच धनाजीनें संताजीचा पाठलाग चालविला. कर्नाटक प्रान्तीं हा विस्मयकारक पाठलाग सुरू झाला. विजापूरनजीक धनाजीनें संताजीवर चाल केली. मनगटासारख्या मिशांना पीळ भरून शत्रूचें नरडें फोडणारा संताजी आतां निस्तेज झाला होता. मोगल आणि मराठे यांच्याकडे संधान राखून आपलें पोट जाळणारे होळीचे होळकर त्याच्याभोंवतीं होते ! गोफण–धोंड्याच्या आबाजाबरोबर

पाखरें भुर्रकन् उडून जावींत तसें झालें. धनाजीच्या आंवइबरोबर संताजीचें सैन्य नाहींसें झालें. तो उघडा पडला आणि रानोमाळ भटकूं लागला. आतां त्यानें शिंगणापूरच्या डोंगराचा आश्रय घेतला, आणि दिवाभीताचें आयुष्य कंठण्यास प्रारंभ केला !

संताजीच्या मुंडीचा छाट घेण्यासाठीं आतां तीन समशेरींत स्पर्धा चालू होती. पहिली धनाजीची, दुसरी हत्तीच्या पायीं लोटून ठार केलल्या अमृतराव निंबाळकराच्या मेव्हण्याची–नागोजी मान्याची, व तिसरी मोगलाची. संताजीची मुंडी मारणाऱ्यास मोगल दरबारांत मानाचा मंदील बांधिला जाणार होता. अशा तऱ्हेनें संताजीच्या मृत्यूची पार्श्वभूमि तयार झाली होती, आणि अल्पावकाशांत त्याचें डोकें मारलें जाणार होतें.

विपन्नावस्थेंत संताजी आपलें आयुष्य कंठीत असतां स्नानासाठीं एका ओढ्याच्या कांठीं थांबला. स्नानास प्रारंभ झाला. पहिला तांब्या घेतला, आणि दुसरा घेणार–तोंच समशेरीच्या एकाच फटकाऱ्यानें संताजीची गर्दन छाटली गेली ! नागोजीनें घातलेल्या मारेकऱ्यांनीं हें काम केलें. संताजीचें डोकें हातीं लागतांच नागोजीचें साधलें. त्यानें तडक मोगल-दरबार गांठला व औरंगजेबास संताजीचें मस्तक सादर करून कुर्निसात केला. त्यास या शतकृत्याबद्दल खुषखबरखान ही पदवी मिळाली !

राजाराम महाराजांच्याकडून मिळणाऱ्या पदवीपेक्षां मोगल बादशहाकडून–परकीयाकडून मिळणाऱ्या किताबतींत व होणाऱ्या सन्मानांत आम्हां मराठ्यांना विशेष वाटे. हें आमचें वैशिष्ट्य सनातन आहे !

दिल्लीश्वराच्या हस्तें मिळालेल्या खुषखबरखान या पदवीनें आपले पितर स्वर्गांत गेल्याचा आनंद नागोजीस झाला,— पण आपल्या खास डेऱ्याचे कळस छाटून नेणाऱ्या मराठ्यांच्या लोकोत्तर पराक्रमाचा तो कळस – संताजीचें शिरकमल – आपल्या दरबारीं एका मराठ्याच्या हस्तें दाखल झालेलें पाहून औरंगजेबास पर्वतासारखें हास्य झालें ! !

———



मराठ्यांच्या पराक्रमाचा ‘कळस’—संताजीचें शिरकमल पाहून औरंगजेबास पर्वतासारखें हास्य झालें !!

# स्वाध्याय

## स्वाध्याय

१. दुर्गादासः—लेखकानें या गोष्टीची सुरवात कशी केली आहे बघा. सर्वसाधारणपणें गोष्टीची सुरवात कशी करतात ?

या गोष्टीस ऐतिहासिक वातावरण आहे. तें निर्माण करण्याकरतां लेखकानें कांहीं जुने शब्द वापरले आहेत. ते कोणते तें शोधून काढा.

वाचकाला अगदीं विश्वासांत घेऊन त्याच्याशीं हितगुज करावें अशा पद्धतीनें कथा-कथन झालें आहे. त्याकरतां अगदीं 'आजचे' शब्दप्रयोग गोष्टींत आढळतात. त्याची नोंद करा.

'मुलाखतीस दाखल झालेला आणि मुलाखत घेणारा—दोघेहि असामान्य होते.' ह्या लेखकाच्या विधानाची सत्यता पटवून देण्यास गोष्टींतील दोन-तीन प्रसंगांचें तुमच्या शब्दांत चित्रण करा.

दुर्गादासाचें असामान्यत्व कशांत होतें ?

औरंगजेबाचें असामान्यत्व कशांत होतें ?

दुर्गादास व औरंगजेब यांमधील वैमनस्याचें कारण कोणतें ?

जोधपूरचें राज्य घशांत घालण्याकरतां औरंगजेबानें कोणता डाव (व्यूह) रचला ? तो कोणी व कशाचे जोरावर उलटविला ?

औरंगजेबाच्या कपट-नीतीचीं दोन उदाहरणें या गोष्टींतील प्रसंगांचे उल्लेख करून द्या.

या गोष्टींतील अकबराची योग्यता ५ वाक्यांत सांगा.

औरंगजेबानें अकबरास लिहिलेल्या खोट्या पत्राचा रजपुतांवर कोणता परिणाम झाला ? अशाच रीतीचे गोंधळाचे ऐतिहासिक दाखले तुम्हास ठाऊक आहेत काय ? कोणते ?

दुर्गादासाचें उज्ज्वल चारित्र्य उठावदार रीतीनें पटवून देणाऱ्या प्रसंगांचे उल्लेख करा.

अकबर व दुर्गादास यांची निराशा करून आलेली सुसंधि मराठ्यांनीं कां दवडली ?

जोधपुरच्या या स्वारीमुळें औरंगजेबाच्या हृदयास अत्यंत झोंबलेल्या दोन गोष्टी कोणत्या ?

राफियतुन्निसा व बुलंद अख्तार यांचें शिक्षण कोणी, कोणत्या रीतीनें केलें ?

गोष्टीचा शेवट पहा. त्यांत मनाला उल्हसित करणारी गोष्ट कोणती आहे ?

'ए माता पुत ऐसा जिन जैसा दुर्गादास' असें गोष्टीचें नांव ठेवलें तर तें तुम्हास आवडेल ना ?

पुढील शब्दांची ओळख घ्याः— सांगाती, वज्राचें मन, खराबा-घरटान् घरटा, बेजरब, लांडगेतोड, रसद, गारद, बैल टोकून नेले, धर्म मार्तंडगिरी, गिन्यान, दिलदिलासा, धाबे दणाणणें, धास्तावलेला, भाळला, चलो दिल्ली, गोमटें, मनगटें चावणें, भीक नको-कुत्रा आवर, नियत.

या गोष्टींत कांहीं पौराणिक संदर्भ आहेत ते कोणते ? त्याच्यामुळें गोष्टीस कशी आकर्षकता आली आहे बघा.

अजितसिंहास राज्याभिषेक केल्यानंतर दुर्गादासाला इराणांत पसार झालेल्या अकबराला पत्र लिहावयाचें झालें तर तें तो कसें लिहील ?

मराठ्यांनीं दुर्गादासाला मदत केली असती तर काय झालें असतें त्याचें वर्णन पान ९-१० वर वाचा. चांगलें वाचून झाल्यावर तसेंच वर्णन करण्याचा स्वतः प्रयत्न करा.

---

२. मानभावाची पोरः—होळकरांची रक्षा, होळकरांची दौलत कशी झाली ? गारगोटी व हिरे यांचा दृष्टान्त लेखकानें गद्यांत अगदीं पद्या-सारखा रंगविला आहे. कसा तो पहिल्या परिच्छेदांत पहा.

दुर्गादासाची गोष्ट सांगतांना लेखकानें गोष्टीच्या मध्यांत सुरकांडी मारली होती. आतां या गोष्टीस लेखकानें अगदींच निराळ्या रीतीनें सुरवात केली आहे. तुम्हाला तुमची गोष्ट लिहितांना या युक्त्या लक्षांत ठेवल्या पाहिजेत. रक्षा शब्द लक्षांत ठेवा.

कुळकथा अजब आहे, कर्तबगारी अपूर्व आहे, असें प्रथमच सांगून टाकल्यावर कोण कान टवकारणार नाहीं तें ऐकण्यास ?

यशवंतरावाच्या कर्तबगारीविषयीं कथालेखकानें आपलें मत पान १७, परिच्छेद २ वर दिलें आहे. तें पहा, व एका वाक्यांत तें लिहा.

होळकरांच्या भाग्यभानूस ग्रासून टाकणारे राहु केतु कोण ?

यशवंतरावाच्या पश्चात् तुळसाबाईची पहिली कर्तबगारी कोणती ? या कर्तबगारींत कर्तबगारी कोठें म्हणजे कशांत आहे ? पान १८ पहा.

तुळसाबाईचें स्वभावचित्र व तिच्या देहयष्टीचें वर्णन करा. पान१९पहा.

तिची दुसरी कर्तबगारी कोणती? त्याचा परिणाम तिच्याच कर्तबगारी-वर कोणता झाला ?

वाचकाला आपल्या विश्वासांत घेण्यास कथालेखकाला अनेक युक्त्या लढवाव्या लागतात. पान १९, परिच्छेद २, 'तंत्रांत' या एका शब्दांत ती युक्ति सांठविली आहे. कशी ती अभ्यासा.

पान १८, परिच्छेद ३ मध्यें असाच शब्द आहे तो हुडकून काढा.

तुळसाबाईच्या हातीं राज्यधुरा आली त्या वेळची होळकर दरबारची परिस्थिति कशी होती ?

तुळसाबाईची सवत कोण ? तिनें दौलतरावाशीं कोणता तह केला ? त्या तहाचे परिणाम काय झाले ? तिनें मैनाबाईस कारभारांतून हुसकून कसें लाविलें ?

अमीरखानाचें वर्णन पान २२, परिच्छेद १, ओळ शेवटची पहा. एका वाक्यांत त्याचें चित्र डोळ्यापुढें उभें राहातें कीं नाहीं ?

या गोष्टींत लेखकानें अनेक व्यावहारिक सिद्धान्त सांगितले आहेत. ते शोधून काढून लिहून दाखवा.

तुळसाबाईचा नाश करण्याकरतां "दौलतरावाच्या सुपीक डोक्यांतून निराळीच शक्कल निघाली" असें लेखक म्हणतो. ही शक्कल कोणती ? त्यांतून ती कशी पार पडली ?

तुळसाबाईनें बाजीरावाकडे शिष्टाई केली ती ऐतिहासिक दृष्ट्या कशी बरोबर होती ? ती कां फसली ? इतिहासाच्या दृष्टीनें बाजीरावाची त्यांत कोणती चूक होती ?

इंग्रजांविषयीं मराठी दौलतदारांचें मत काय होतें ? त्यांची इच्छा सफल होण्याचा मोका कां व केव्हां आला ? तुळसाबाईवर याच वेळीं कोणता प्रसंग ओढवला ? त्यांतून ती कशी निभावली ? कोणाच्या आश्रयानें ?

मराठ्यांना चितपट करण्याचा इंग्रजांचा नेहमींचा डाव कोणता ? तो ऐन वेळीं तुळसाबाईच्या अंगाशीं कसा आला ? कोणी आणला ? कोणत्या प्रसंगानें ?

होळकर घराण्याच्या इमानदारीचें ब्रीद तुळसाबाईला स्वस्थ बसूं देईना, म्हणून तिनें काय केलें तें पहा. (१) पेशव्याची मिलाफी. (२) पेंढाऱ्यांच्या पुढाऱ्याशीं संगनमत. पण (३) प्रतिकूल परिस्थितीमुळें व इंग्रज दोस्तीचा तह करण्यास उद्युक्त झाल्यामुळें वरकरणी तह. पण हें सगळें राजकारण फोडा व झोडा'नें फिसकटलें ! तें कसें तें सांगा. यासंबंधांत कथा-लेखकानें म्हटलें आहे कीं "हें घोडें येथेंच पेंड खात होतें !" हें घोडें कोणतें व पेंड कोणती ?

वरील तहानंतर राजकारणानें निराळीच पलट खाल्ली ! ती कोणत्या प्रसंगानें ? या प्रसंगीं तुळसाबाईनें कसा ताठरपणा दाखविला ?

तुळसाबाईचा अंत कसा झाला ?

"कंपनी सरकारचा 'पाहुण्याच्या काठीनें साप ठेचण्या'बद्दलचा

लौकिक अलौकिक आहे!" हें वाक्य कोणत्या संबंधांत आलें आहे? पाहुण्याच्या काठीनें साप ठेचणें म्हणजे काय?

तुळसाबाईच्या मृत्यूनंतर होळकरांचें स्वातंत्र्य अंतर्धान कसें पावलें?

---

३. काला पहाडः— गोष्टी हरप्रकारच्या असतात; तरी पण युद्धाच्या गोष्टी मनाला चटका लावतात, नाहीं का? घनघोर युद्धाच्या भयंकर रण-कंदनाच्या वातावरणाचें अवगुंठन या गोष्टीवर आहे. पहिलाच परिच्छेद वाचा. कोणाची गोष्ट आहे ही? या गोष्टीच्या नांवाकरतां दोन शब्द तुम्हांला येथेंच सांपडतील; आणि 'काला पहाड' याऐवजीं हें नांव तुम्हांला आवडेलहि. पण मग काला पहाड हेंच नांव लेखकानें कां निवडलें तें हुडकून काढा.

चित्राभोंवतीं वेलबुट्टी काढतात, ती चित्राला शोभा देते. चित्राची पार्श्वभूमि चित्राला उठाव आणते, तें आकर्षक करते. प्रस्तुत चित्र कोणाचें आहे? पार्श्वभूमीवर कोणत्या सांवल्या आहेत? वेलबुट्टी कशी रेखाटली आहे? वातावरणाच्या भडक रंगांचे झोतच्या झोत गोष्टीवर सोडल्यानें पहिल्यापासून अखेरपर्यंत गोष्टींत तंगी निर्माण झाली आहे. गोष्टी-वेल्हा-ळांना हीं तंत्रें सांभाळावीं लागतात. तुम्ही ज्या ज्या वेळीं पुरवणीवाचन वाचतां तेव्हां या गोष्टी निरखीत चला; टांचणें करीत जा. फार उपयोगी पडतील तीं तुमच्या स्वतःच्या लेखनव्यवसायांत.

'धोंडाजी वाघ म्हणजे वाघच होता!' हें एकच वाक्य,—पण टाकाच्या एकाच फेंकीनें तें शब्दचित्र झालें आहे. पहा, आठवा वाघ. वाघाचें क्रौर्य, हिकमतीपणा, औदार्याचा अभाव, त्याच्या भोंवतालचें घनदाट जंगल, करवंदाची जाळी हें सारें ध्यानीं घ्या. आणि मग करा धोंडोबाची व वाघोबाची तुलना! कोणाला वाटेल वाघ या शब्दावर नुसती शाब्दिक कोटी केली आहे लेखकानें—म्हणून नीरस आहे. पण ती सर्वथैव सरस व

सार्थ आहे ना ? पुढची कोटी बघा. "हे पवारांचे वाघ झाले ते वाघच राहिले!" म्हणजे काय ? यासंबंधांत एक तुकारामबोवांची उक्ति आहे ती कोणती ? 'गोखल्यांचे रास्ते झाले' ही ऐतिहासिक गोष्ट वाचा.

मराठ्यांच्या गतकालीन इतिहासाच्या अवलोकनानें या लेखकाच्या लिखाणांत एक प्रकारची विषण्णतेची छाया, औदासिन्याची छटा व निराशेचें वातावरण पुष्कळदां दिसतें. त्यांचें 'शिवशाहीचा अस्त' हें पुस्तक अवश्य वाचा. पान ३१, परिच्छेद ४ था, यांतील शेवटचें वाक्य वरील गोष्टीचें निदर्शक आहे.

वाघाच्या आयुष्याची सुरवात बघा.

वाघाच्या कृतघ्नतेच्या कृत्यांची यादी करा. 'सैतानी लुटालूट करून रेटून जमा केलेल्या खंडणीचा करवीरकराच्या राजाज्ञानें एकट्यानेंच ढेकर दिला, तेव्हांपासून वाघाचा काळ संपुष्टांत आला.' या विधानाच्या पुष्ट्यर्थ घडलेल्या घटनांची यादी करा.

वाघाच्या अखेरच्या काळांतील त्याचे शत्रु कोणते ? शत्रूंच्या चुकीचा त्यानें कसा फायदा घेतला ? त्याला या कामीं कोण व कसें साहाय्यभूत झालें ? गोखल्याला त्यानें ऐन घाटांत कसें गांठलें ?

परिच्छेद ३, पान ३७ पुनःपुन्हा वाचा. गोष्ट कशी भरधांव वेगांत येते बघा. त्याच्यांत गति, अंतर, नादानुकारी शब्द, घाई, हातघाई—व या सर्वांचे परिणाम—सर्व कांहीं आहे.

पान ३७,३८ वर घनचक्कर युद्धाचें वर्णन आहे. वाचून तुम्हांला तें कितपत पुनः लिहितां येतें तें बघा. अप्पाच्या तलवारीचें वर्णन पहा.

'बापू पोरका झाला, पण तो या घनघोर प्रसंगांतून उजळून निघाला' असें लेखकानें म्हटलें आहे, त्याचा अर्थ काय ?

धोंडोपंताचें मस्तक धोंडाजी वाघानें नेलें, या घटनेचा परिणाम बापूच्या मनावर कसा झाला तें लेखकाच्या शब्दांत सांगा.

शत्रूजवळ वाघाची प्रतिष्ठा केवढी होती; त्याची किंमत किती होती

म्हणून म्हटलें आहे ? रुपयांत त्याची किंमत सांगून लेखकानें वाघाची प्रतिष्ठा मोलली आहे. त्यांतील विनोदगर्भ गांभीर्य लक्षांत येतें ना ?

बेटकुळी तटाटून फुगली तरी किती फुगणार ? असें वाघाच्या बाबतींत लेखक म्हणतात. जुनी गोष्ट आठवते का ह्या बेटकुळीची ?

मुखंड, जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, एकठाय, अरत्रीं परत्रीं, छातीचा कोट, भाऊगर्दी, धांग, टाकोटाक, नतिजा, ढेकर देणें, भलताच हात मारणें, वह्ली, मोप, हिसका दाखविणें, रात्रता, दादागिरी, बलदंड, मुलूख मारणें, या शब्दांचे अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.

शब्दचित्रें : आपपर भावदृष्टि मिटली, सफाई तलवार, कांपीत सुटली

आणखी शब्दचित्रें हुडकून काढा.

देसायाचें स्वभावचित्र थोडक्यांत रेखाटा.

---

४. कुलस्वामिनीः— प्रत्येक गोष्ट वाचतांना तिची सुरवात व शेवट कसा आहे तें नेहमीं लक्षांत ठेवीत जावें. या गोष्टीच्या सुरवातीस आपण एकाद्या फार जुन्या वर्तमानपत्रांतील एकादी बातमी तर वाचीत नाहीं ना असा अंदेशा येतो न येतो तोंच कथानकाच्या बैठकीशीं आपण परिचित होतों.

"बेबंदशाही" (औंधकर) हें नाटक वाचलें किंवा पाहिलें आहे का तुम्हीं ? "राजा, वैऱ्याची रात्र आहे—जागा रहा !" हें त्या नाटकांतील वाक्य आहे.

या काल-रात्रीं छत्रपति प्रतापसिंह महाराजांना पडलेल्या स्वप्नांतील कोणत्याहि तीन चित्रांचें चित्रण करा.

स्वप्नांत संजीवित झालेली सयशेर भवानी-मातेच्या स्वरूपांत तळ

लागली. लेखकाची ही कल्पनेची भरारी अत्युच्च व धारदार आहे. श्वास कोंडून, अनिमिष नेत्रांनीं, सर्व शक्ति कानांत एकत्रित करून, कान टवकारतात आपले ती आतां काय सांगणार तें ऐकायला. हा एक नाट्यप्रसंगच आहे.

“ पुंड पेशवा पळाला; सातारकर छत्रपतींचा जय झाला ! ” या घोषणेचा प्रतिध्वनि मात्र निराळाच उमटला ! हें शास्त्रोक्त नाहीं पण इतिहासोक्त मात्र आहे. कसें तें विशद करा. हा प्रतिध्वनि कोणता होता ?

पाठीवर पाय व पोटावर पाय म्हणजे काय ?

एकाद्या मानसिक अवस्थेचें वर्णनच करतां येत नाहीं; पण तिची मनोमय साक्ष पटते. अशा वेळीं वाचकांनाच सांगून टाकावें कीं, त्या अवस्थेची कल्पना तुम्हीच करा. वर्णन अपुरें असून त्याला पूर्णता येते. असे प्रसंग प्रस्तुत गोष्टींत आहेत. कोणते ते हुडका. छत्रपति प्रतापसिंहमहाराज व सेनापति बाळासाहेब यांना गिरफदार करून एकाच पालखींत कोंबून बसाविण्यांत आलें. या बांक्या प्रसंगींहि सेनापतींनीं छत्रपतींविषयीं आदर कसा दाखविला पहा ! याचें नांव बुद्धिपुरस्सर स्वामिनिष्ठा.

इंग्रजांनीं त्यांना गिरफदार केलें खरें ! पण त्यांतसुद्धां त्यांच्या कुटिल कारस्थानी राजनीतीचें वैशिष्ट्य आहेच. परिच्छेद २, पान ४९ पहा. हें वैशिष्ट्य कोणतें तें सांगा.

क्रिस्टॉलचें स्वभावचित्र रेखाटा.

करुणरसाचीं निदर्शक खालील वाक्यें पहा—

| | | |
|---|---|---|
| पान ५२. | प्रस्तुत प्रसंग — काळोखी फासणारा आहे. | परिच्छेद १ |
| ५२. | नेहमींच — — — — संपले. | ३ |
| ५१. | आधींच वनवासांत — कुऱ्हाडः कोसळली. | १ |
| ४९. | त्याचा गुन्हा — विश्वासू सेनापति होता. | ३ |
| ४८. | प्रतापसिंह महाराजांच्या पाठीवर — वाऱ्यांत शिरले. | १ |
| ४७. | पंड पेशवा पळाला —.कंपनी सरकार सर झालें. | १ |

जातांजातां लेखकानें क्षत्रियनीति सांगितली आहे— तीं वाक्यें उद्धृत करा.

पा। ४६, परिच्छेद १ ला पहा—

"शत्रूची पहांट" किंवा "राजा, वैऱ्याची रात्र आहे,–जागा रहा!" यांपैकीं कोणतें नांव तुम्ही या गोष्टीस द्याल का? लेखकानें 'कुलस्वामिनी' हें नांव कां पसंत केलें आहे?

तांडवनृत्य म्हणजे काय? भगीरथ प्रयत्न म्हणजे काय?

गोष्टीचा शेवट बहारदार आहे; कारण तो फार परिणामकारी आहे.

---

५. अमर अमरसिंहः— या गोष्टीची मौज अशी आहे कीं गोष्टीची सुरवात गोष्टीच्या अंतानें केली आहे. शेपूट अगोदर काढून मग मांजराचें चित्र काढण्यापैकीं आहे हें! पण ही कला आहे. ती साधली पाहिजे.

पाठलागाचें वर्णन बघा. हा चित्रपट चलत्–चित्रपट आहे ना? आणि तो मूकहि नाहीं. तो कसा?

कुंवरसिंह या ८० वर्षांच्या म्हाताऱ्याच्या कर्तबगारीचें वर्तन बघा. आपल्या स्वातंत्र्याच्या काळांतील हे वारे आपणांस आतां तरी घ्यावयास नकोत का?

'गड आला पण सिंह गेला!' मधील शेलारमामा आठवतो का? कुंवरसिंहाचें काय चुकलें? ऐन रंगांत आलेला त्याचा डाव कशानें फसला?

त्याचें अंतकाळचें भाषण ऐका; नि अमरसिंहानें त्याला त्या वेळीं दिलेलें अभिवचन पहा.

पावनखिंडीची बाजी प्रभूची आठवण करून देणारा आहे प्रसंग हा.

'अमरसिंह स्वतः तर अमर राहिलाच, पण त्यानें भावालाहि अमर केलें!' असें म्हटलें तर तें बरोबर ठरेल का? कारणें सांगा.

खालील वाक्यांचा अर्थ विशद कराः—

कुंवरसिंहाचा हा हुकमी पत्ता अशा तऱ्हेनें बेपत्ता झाला.

जनतेवर दहशत बसविण्याकरतां कंपनीसरकारनें काय उपाय योजले?

अर्थ लिहा व वाक्यांत उपयोग कराः—

ज्याचें नांव तें, सळो कां पळो, नाकावर टिच्चून, खळ्या खणणें, मगरीनें गिळलेलें माणिक, उखाड देणें, दंड थोपटणें.

---

६. पाणीः— दारा व शहाजहाँ या पितापुत्रांमधील प्रेमाचें वर्णन लेखकाच्या शब्दांत करा.

सामूगडच्या युद्धासाठीं निघालेल्या दाराच्या स्वारीचें वर्णन करा.

दारा व औरंगजेब या दोघां भावांमधील भेद लेखकानें फार उत्कृष्ट रीतीनें दाखविला आहे, तो वाचून तुम्ही तसेंच लिहिण्याचा प्रयत्न करा.

दाराच्या अपजयाचा कारणें सांगा.

२९ मे १६५८ या सामूगडच्या युद्धाच्या दिवसाचें आग्रा शहरांतील तंग वातावरणाचें वर्णन करा.

पराभवानंतर झालेल्या दाराच्या मनःस्थितीचें वर्णन करा.

कपटी औरंगजेबानें आपल्या यशानंतर मुरादशीं व आपल्या पित्याशीं कसें वर्तन केलें?

दारा फरारी झाल्यावर औरंगजेबाशीं मुलाखत होण्याकरतां शहाजहाननें काय काय केलें?

शेवटीं नाउपाय म्हणून शहाजहानला आलेल्या प्रसंगांस कोणत्या रीतीनें तोंड द्यावें लागलें?

औरंगजेबाला आग्र्याचा किल्ला बापाविरुद्ध लढवून घेण्याची येवढी घाई कां झाली ?

शेवटीं किल्ला कोणत्या युक्तीनें सर करण्याची शकल निघाली ?

शहाजहानचें औरंगजेबास लिहिलेलें शेवटच्या पत्राच्या अगोदरचें पत्र हृदयाचें पाणी पाणी करून सोडणारें आहे. त्यांत अन्तःकरणाला हालविणारें कोणतें वाक्य आहे ?

औरंगजेबानें कोणत्या अटींवर बापाचें म्हणणें मान्य केलें ?

त्यानंतरचा प्रसंग फारच हृदयद्रावक आहे. कसा तो सांगा.

गोष्टीचा शेवट पुनःपुन्हां वाचा. त्याचा अर्थ समजावून घ्या.

पान ७६, ७५, ६७, ६५, ६३ यावरील परिच्छेद २, २, १, १, ३ हीं शब्दचित्रें स्मरणांत ठेवा.

वाक्यांत उपयोग कराः— रकमेस येणें, खता, उगवत्या सूर्यास वंदन करणें, पर्वतासारखें हास्य होणें.

---

७. कळसः— संभाजीच्या वधाचा परिणाम महाराष्ट्रांत काय झाला ? खुद्द औरंगजेबाला त्याची झळ कशी लागली ?

छत्रपति संभाजी महाराजांचा स्वभाव व त्यांची कारकीर्द यांचें उत्कृष्ट वर्णन एका परिच्छेदांत लेखकानें केलें आहे. तें लक्षपूर्वक वाचून खालील प्रश्नांचीं उत्तरें द्याः—

तकलुपी राजकारण कोणतें ? संभाजीच्या प्रकृतीचें (स्वभावप्रकृतीचें) वर्णन करतांना लेखकानें कोणतें विशेषण वापरलें आहे ? घरीं–दारीं निघडलेल्या परिस्थितीचें वर्णन एकाच वाक्यांत लेखकानें केलें आहे, तें वाक्य उद्धृत करा. या परिस्थितीशीं संभाजीनें कशी टक्कर दिली ? संभाजीच्या आकांक्षा कोणत्या होत्या ?

आतां औरंगजेबाचें स्वभावचित्र पहा. यांतील कांहीं वाक्यें तर पाठ करण्यासारखींच आहेत.'इतिहासांत नमुन्यादाखल निर्माण झालेली व्यक्ति', 'त्याच्या हृदयाचे रंग प्रसंगाप्रसंगानें बदलत', 'त्याच्या समशेरीला क्रौर्याची आणि शौर्याची दुहेरी धार असे, व ती ऊडक धर्मनिष्ठेच्या म्यानांत म्यान केलेली असे', 'स्वार्थ हाच त्याचा परमार्थ', 'यांना तसूतसूनीं ठार केलें' वगैरे वगैरे.

संभाजी महाराजांच्या वधाचें हें हृदयद्रावक प्रकरण, औरंगजेबाचें क्रौर्य व सत्ता-मदान्धता यांचें वर्णन लेखकानें कशाकरतां केलें आहे? अत्यंत बिकट परिस्थिति, सर्वत्र निराशेचा अंधार, कमालीचा क्रूर बलाढ्य शत्रु या सर्वांशीं टक्कर देणारा सन्ताजी हा कसा अफाट शूरवीर होता हें लेखकास तुम्हांस पटवून द्यावयाचें आहे.

'चन्द्रसूर्याला ग्रासूं पाहणाऱ्या......जगड्व्याळ ढोल धरणीवर कोसळतो.' हें वाक्य मराठे व मोगल यांची कल्पना बरोबर आणून देतें. वाक्याचा अर्थ लेखकानें स्वतःच विशद केला आहे, तें वाचा. दोघांची तुलना तुम्ही आपल्या शब्दांत करून बघा.

छत्रपति संभाजीच्या मृत्यूनंतर मागें लागलेलें सुलतानी सुदर्शन चुकविण्यासाठीं मराठ्यांनीं कोणते मनसुबे केले व कारवाई करून ते कसे पार पाडले तें सांगा.

मोगलांनीं मराठ्यांच्या काळजालाच हात घातला तेव्हां मराठे खरे चेवले (जिवावर उदार झाले) तो प्रसंग कोणता? मग मोगल बादशहाला मराठ्यांचा हिसका दाखविण्याचा बेत कोणी केला? हा बेत कोणता होता?

सन्ताजीजवळ प्रसंगावधान व हिकमतीपणा फार! तुळापुरीं जातांना दिव्याच्या घाटाखालीं तो कोणत्या दिव्यांतून कसा पार पडला?

तुळापुरीं बेशक घातलेल्या बादशहाच्या तंबूवरील छाप्याचें वर्णन वाचा. 'वेळ आली होती पण काळ आला नव्हता, नाहीं तर बादशहाची.....' हें वाक्य शक्य तों लेखकाच्या शब्दांत पुरें करा.

खुद्द औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापणें हा सन्ताजीच्या साहसी पराक्रमाचा कळस खरा ! पण तो येथेंच थांबला नाहीं. त्याची स्वामिनिष्ठा ... ! त्यानें पुढें काय केलें ?

... सन्ताजीच्या पराक्रमाचें मराठ्यांच्या बादशहानें प्रथम चीज कसें केलें ! प... त्याच वेळीं नेमका मराठ्यांच्या एका दुर्गुणाचा फांस सन्ताजीच्या ग...ळ्याभोवतीं कसा आंवळला गेला ? तो कोणता ? हा दुर्गुण कोणता ?

सर सेनापतीचीं वस्त्रें मिळाल्यावर सन्ताजीनें मोगलाविरुद्ध कोणता ...ट घडवून आणविण्याचें ठरविलें ?

कासीमखानाला सन्ताजीनें कसा खता केला ? तीच दशा त्यानें आणखी कोणाकोणाची केली ?

आपसांतील फुटीच्या फटींतूनच शत्रूला शिरकाव करूं देऊन त्या फटीचें भगदाड करण्याची संधि शत्रूस वारंवार देऊन मराठ्यांनीं आपली दौलत घालविली. हा धडा आम्ही कधीं शिकणार ? फूट ही झूट आहे हें आम्हांस केव्हां समजणार ? जूट–एकजूट–तिची ज्योत महाराष्ट्रांत केव्हां पाजळणार ? कां या फुटीचा तोच तोच धडा व त्याचा हा 'श्रीग'चा (धडा) आम्ही अखेरपर्यंत गिरवीत राहणार ? असेंच जणुं का... सन्ताजीचा आत्मा तुम्हांआम्हांस अंतराळांतून विचारीत आहे असें नाहीं का वाटत हा परिच्छेद वाचून ?

आतां सन्ताजी, धनाजी ह्यांचीं स्वभावचित्रें बघा. हें चित्र पहा आणि तें चित्र पहा. रामचंद्रपंत अमात्यानें सन्ताजीस कोणता उपदेश केला ?

मोगल दरबारांतील अहिरावण–महिरावणांचीं डोकीं मारून सरसेनापति सन्ताजी छत्रपति राजारामाच्या दरबारीं दाखल झाला ! हे अहिरावण–महिरावण कोण ? त्या वेळच्या सन्ताजीच्या मनःस्थितीचें वर्णन करा.

धनाजीचा नक्षा सन्ताजीनें कसा उतरविला ? या कृत्यास तुम्ही राजाज्ञाभंग म्हणाल काय ? कारणें सांगा. याच प्रसंगांत सन्ताजीची राजनिष्ठा पुरेपूर दिसून येते. कशी तें सांगा.

सन्ताजी मेचून न वागणारा सदैव ताठ आणि त्याची स्वामिनिष्ठाहि राठ ! कसें तें विचार करा.

राजकारणाच्या तेढ्या तिढ्यांत गवसून गगनांतून कोसळलेल्या ताऱ्या-प्रमाणें सन्ताजी गतप्रभ झाला. हा राजकारणाचा तेढा तिढा कोणता ?

महापराक्रमी सन्ताजीचें मुंडकें अखेर कोणीं उडविलें ?

सन्ताजीचें शिरकमल बादशहाच्या पुढें सादर करून त्याजकडून खुश-खबरखान ही पदवी मिळविणाऱ्यास तुम्ही कोणती पदवी बहाल कराल ?

गोष्टीचा शेवट पहा; कसा हृदयद्रावक आहे !